ब्राह्मण मुत्सद्दी व योद्धे

भाग १ ला

ग्रंथकार व प्रकाशक,

सीताराम रघुनाथ तारकुंडे

माजी पोस्टमास्तर व सरपंच, ग्रामपंचायत, हडपसर

आणि

'मराठ्यांची पूर्वपीठिका' व 'क्षत्रिय घराण्यांचा इतिहास'

भाग पहिला व दुसरा या पुस्तकांचे कर्ते.

मुद्रक

दत्तात्रय गणेश खांडेकर,

'लॉ प्रिंटिंग प्रेस,' १३१७ कसबा पेठ, पुणें.

सन १९३२.

किंमत १ रुपाया.

प्रस्तावना

आम्हीं स. १९२८ सालीं **क्षत्रिय घराण्यांचा इतिहास, भाग १ ला,** व गेल्या वर्षीं सदरहू पुस्तकाचा दुसरा भाग प्रसिद्ध केला. हल्लीं आम्ही **" ब्राह्मण मुत्सद्दी व योद्धे, भाग १ ला "** हा ग्रंथ देशबांधवांस सादर करीत आहोंत. मराठी साम्राज्य पूर्वेस बंगाल, उत्तरेस राजपुताना, पश्चिमेस अरबी समुद्र व दक्षिणेस मद्रास इलाखा या सीमेपर्यंत पसरलें होतें. हें एवढें साम्राज्य ज्या ज्या योद्धयांनीं स्थापन केलें त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याकरितां आम्ही हा इतिहास त्यांच्या स्मारकार्थ सादर करीत आहोंत. क्षत्रिय घराण्यांचा इतिहास, भाग १।२, ह्यांस ज्या ज्या संस्थानिकांनीं पुस्तकांच्या प्रती घेऊन आम्हांस साह्य केलें, त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. क्षत्रिय घराण्यांचा इतिहास, भाग २ रा, ह्यास खालील गृहस्थांनीं सहानुभूति दाखविली, म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोंत. श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार, श्रीमंत सरदार तात्यासाहेब मेहेंदळे, रावसाहेब बाबासाहेब देशपांडे, रावबहादूर पी. सी. पाटील, प्रोफेसर अग्रि. कॉलेज, रा. सा. जे. पी. त्रिवेदी, एल्. सी. ई., प्रोफेसर, ॲग्रि. कॉलेज, प्रोफेसर दत्तो वामन पोतदार इ० हा ग्रंथ तयार करते वेळीं भारत इतिहाससंशोधक मंडळाच्या व मराठी ग्रंथालयाच्या चालकांनीं आम्हांस त्यांच्या संग्रहीं असलेलीं जीं पुस्तकें पुरविलीं, त्यांबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. क्षत्रिय घराण्यांचा इतिहास, भाग १ व २ ह्यांस संस्थानिकांनीं आश्रय दिला म्हणूनच हा ग्रंथ प्रसिद्ध करतां आला. ह्या ग्रंथासहि तसा आश्रय मिळाला तर आम्ही सदर ग्रंथाचा दुसरा भाग प्रसिद्ध करूं.

ह्या पुस्तकांत समाविष्ट केलेल्या संस्थानिकांपैकीं जितक्या संस्थानिकांचे फोटो आम्हांस महत्प्रयासानें मिळवितां आले तितके ठिकठिकाणीं घातले

आहेत. बाकीच्यांचे फोटो आम्हांस प्रयत्न करूनही न मिळाल्यामुळें ते घातले नाहींत ह्याबद्दल दिलगिरी वाटते.

ही प्रस्तावना पुरी करून हातावेगळी करीत असतां आम्हांस एक आनंदाची बातमी कळविण्यास संतोष वाटतो. ती बातमी ही कीं, श्रीमंत चिंतामणराव उर्फ आप्पासाहेब सांगलीकर ह्यांस बादशहांच्या वाढदिवसानिमित्त **'राजा'** ही पदवी वंशपरंपरा मिळाली. तरी पुन्हा एकदां सदरहू राजेसाहेबांचें अभिनंदन करून ही प्रस्तावना पुरी करतों.

वैशाख वद्य १३ शुक्रवार
शके १८५४.
पोस्ट हडपसर जि० पुणें.

सीताराम रघुनाथ तारकुंडे

आधारभूत पुस्तकांची यादी

१. कै० बाळकृष्णराव हरिहर पटवर्धन यांनीं लिहिलेली व कै० वासुदेव वामनशास्त्री खरे ह्यांनीं छापलेली हरिवंशाची बखर.
२. कै० गोविंद विनायक आपटे ह्यांनीं लिहिलेला पटवर्धन घराण्यांचा इतिहास.
३. कै० बाळाजी प्रभाकर मोडककृत दक्षिणेंतील मुसलमान राज्याचा इतिहास, भाग १.
४. सदर ग्रंथकर्तेकृत कोल्हापूर राज्याचा इतिहास, भाग १.
५. सदर ग्रंथकर्तेकृत पटवर्धन, सावनूर, नरगुंद इ० इतिहास.
६. रा० रा० गोविंद सखाराम सरदेसाईकृत मराठी रियासत, उत्तर विभाग, भाग १ व २.
७. डॉक्टर श्री. व्यं० केतकरकृत मराठी ज्ञानकोश, विभाग ६ ते २१.
८. कै० धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धेकृत "परशरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम" उर्फ चरित्र.

बृहन्महाराष्ट्रांतील क्षत्रिय घराण्यांचा इतिहास, भाग २ रा ह्या पुस्तकावरील वृत्तपत्रांचे अभिप्राय

केसरी ४ ३-१९३२.

बृहन्महाराष्ट्रांतील क्षत्रिय घराण्यांचा इतिहास (भाग दुसरा) (लेखक व प्रकाशक–सीताराम रघुनाथ तारकुंडे, हडपसर, जिल्हा पुणें किं. १२ आणे). रा. तारकुंडे हे इतिहासाचे व्यासंगी व शोधक आहेत. त्यांनीं बृहन्महाराष्ट्रांतील क्षत्रिय घराण्यांचा पाहिला भाग कांहीं दिवसांमागें प्रसिद्ध केल्यानंतर त्याच्या पुढचा हा दुसरा भाग वाचकांच्या हातीं दिला आहे. या भागांत जाधव घराणें, तंजावरचें भोसल्यांचें घराणें व होळकर घराणें, शिर्के घराणें, डिग्रजचें चव्हाण घराणें व माने घराणें यांची हकीकत आली आहे. मधून मधून ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचीं चित्रेंहि घातलीं आहेत. जाधवांचीं महाराष्ट्रांतील घराणीं घेतलीं तर त्यांचा आरंभ देवगिरीच्या जाधवापासून आढळतो. त्यानंतर माळेगांवचे जाधव व वाघोलीचे पिलाजी जाधव यांचा उदय मराठी राज्यांत झाला. माळेगांवचे जाधव हे धनाजी जाधवाचे वंशज होत. त्यांच्या वंशांत अमरसिंह हा पराक्रमी निघाला. तो पानिपतच्या युद्धांत हजर होता. त्यानें युद्धसमाप्तीनंतर परत आल्यावर आपला पिता शंभुसिंग यांच्या स्मरणार्थ एक लक्ष रुपये खर्चून शिवाचें सुंदर मंदिर बांधलें. विश्वासरावाचें प्रेत त्यानेंच मिळवून त्यास शास्त्राप्रमाणें अग्नि देवविला. तो पेशवाईअखेरीपर्यंत जिवंत असून पेशव्यांनीं केलेल्या सर्व लढायांत त्यांजबरोबर होता. हा वृत्तांत पुष्कळांना नवीनच वाटेल. स्वराज्याच्या काळांत महाराष्ट्राच्या कलाकौशल्यांत व सौंदर्यांत भर घालण्याचा

उद्योग लहान मोठे सरदार कसा करीत असत याची यानें कल्पना येईल. तंजावरच्या भोसले घराण्याचा यांत आलेला संक्षिप्त इतिहास इतरत्र क्वचितच वाचावयास सांपडेल. महाराष्ट्रांतील घराण्यांचा थोडक्यांत इतिहास लिहिण्याचें रा. तारकुंडे यांनीं चालविलेलें कार्य स्तुत्य व उत्तेजनार्ह आहे यांत शंका नाहीं.

———

क्षत्रिय घराण्याचा इतिहास (भाग दुसरा)

ज्ञानप्रकाश, ता. २४ ७-१९३१.

बृहन्महाराष्ट्रांतील क्षत्रिय घराण्यांच्या इतिहासाचा हा दुसरा भाग रा. सी. र. तारकुंडे यांनीं लिहून प्रकाशित केला आहे. सुमारें दोन वर्षांपूर्वीं त्यांनीं या इतिहासाचा पहिला भाग लिहून प्रकाशित केला होता त्याचें आम्हीं अभिनंदनपूर्वक स्वागत केलेंच आहे. प्रस्तुत भागही तसाच उपयुक्त आहे. यांत आघव, तंजावर, होळकर, शिर्के, चव्हाण, माने वगैरे आठ घराण्यांचा इतिहास दिला आहे. या घराण्यांतील शूर पुरुषांचा इतिहासाशीं निकट संबंध असल्यामुळें त्यांचा वृत्तांत वाचतां वाचतां कित्येक अद्भुत प्रसंगांचा देखावा दृष्टीपुढें उभा रहातो. सामान्य वाचकांनासुद्धां त्यायोगानें कौतुक व आदर वाटल्यावांचून रहात नाहीं. मग आज या घराण्यांचे जे विद्यमान वंशज आहेत त्यांना आपल्या पूर्वजांचा इतिहास पाहून धन्यता वाटावी यांत आश्चर्य नाहीं. या धन्यतेबरोबरच पूर्वजांप्रमाणेंच, परिस्थित्यनुसार, आपले आयुष्यक्रम आपण उज्ज्वल करूं अशी यांच्यांत सदिच्छा उत्पन्न झाली तर हा इतिहास लिहिणाराचे उद्देश सफल होऊन त्यांचे परिश्रमही सत्कारणीं लागल्याप्रमाणें होणार आहे. रा. तारकुंडे यांची वृत्तांत देण्याची पद्धत अगदीं सुबोध असून तो देतांना त्यांनीं केवळ ऐतिहासिक दृष्टीच अखंड राखली आहे. घराण्याची इतिहासपूर्वकालीन

स्थिति व इतिहासकालांतील त्यांचें कर्तृत्व असाच पुस्तककर्त्यांनीं आपल्या लेखनाचा क्रम राखल्याप्रमाणें वृत्तांत सुसंगत रीतीनें ध्यानांत रहाण्याची उत्कृष्ट सोय झाली आहे; आणि प्रत्येक घराण्याचा इतिहास त्यांनीं अगदीं आजतारखेपर्यंत आणून पोहोंचविला आहे. रा. तारकुंडे यांनीं गेलीं दहा बारा वर्षें ऐतिहासिक पुस्तकें लिहिण्याचा हा जो उपक्रम चालविला आहे, तो निःसंशय प्रशंसनीय होय. वाचकांकडून त्यांना योग्य प्रोत्साहन मिळेल अशी आम्हांस आशा आहे. पुस्तक येथील लॉ प्रिंटिंग प्रेसमध्यें छापलें असून त्याची किंमत १२ आणे आहे. पृष्ठसंख्या १००.

क्षत्रिय घराण्यांचा इतिहास (भाग दुसरा)

विजयी मराठा, ता. २३-११-१९३१

(ले. व प्र. सीताराम रघुनाथ तारकुंडे पो. हडपसर जि. पुणें किं. १२ आणे.) श्री. तारकुंडे या ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध मराठी लेखकांनीं लिहिलेल्या ‘ क्षत्रिय घराण्यांचा इतिहास ’ या पुस्तकाचा पाहिला भाग बराच लोकप्रिय झाल्यामुळें, त्यांना त्यानंतर थोड्या अवधींतच दुसरा भाग प्रसिद्ध करण्याची संधी आली, ही समाधानाची गोष्ट होय. या दुसऱ्या भागांत जाधव, तंजावर घराणें, होळकर, शिर्के, डिग्रजचे चव्हाण, वाघोलीकर जाधव, माने या घराण्यांचा साद्यंत, साधार व संशोधनपूर्ण इतिहास संग्रहित केला आहे; तो प्रत्येक संशोधकानें व क्षत्रिय मराठ्यानें एकवार तरी अवश्य वाचावा. श्री. तारकुंडे हे वयोवृद्ध झाले असूनहि त्यांचा मराठ्यांच्या इतिहासाचा व्यासंग व उत्साह पूर्वींसारखाच आहे, ही अभिनंदनीय गोष्ट होय. प्रत्येक ब्राह्मणेतरानें हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवून श्री. तारकुंडे यांच्या परिश्रमाचें चीज करावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

अनुक्रमणिका

शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५	१	सेन्य	सैन्य
१९	२३	पुण्याच्या	पुतण्याच्या
२३	२२	स्टुअर्ड	स्टुअर्ट
६०	९	प्रसंगी	असंगी
६१	६	उत्तज	उत्तम.

ब्राह्मण मुत्सद्दी व योद्धे

भाग १ ला

जमखिंडी संस्थान.

पटवर्धन घराण्यांचा मूळ पुरूष हरभटबाबा. हरभटबाबांस दोन्ही गोष्टींचा पूर्ण अभाव होता. त्या दोन गोष्टी म्हणजे संतति व संपत्ति. यांचें मूळ रहाण्याचें ठिकाण रत्नागिरीजवळील कोतवडें गांव. तेव्हां त्यांनीं संतति व संपत्ति यांप्रीत्यर्थ पुळें येथील गणपतीची आराधना करण्यास सुरवात केली. त्यांनीं १२ वर्षें पुळयाच्या गणपतीपाशीं दुर्वारस पिऊन पुरश्चरण केलें. पुढें त्यास गणपतीनें दृष्टांत दिला कीं, 'तुझी सेवा मला पावली. तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील.' नंतर हरभटबाबाला देशावर जाण्याची इच्छा झाली. नंतर ते आपली पत्नी लक्ष्मीबाई इजला बरोबर घेऊन देशावर निघाले. वाटेंत त्यांस इचलकरंजीकरांचा मूळ पुरुष नारो महादेव भेटला. नारो महादेव जोशी यांनीं पूर्वींच संताजी घोरपडे यांच्या पदरीं राहून मुत्सद्दीपणा व शौर्य दाखविल्यामुळें त्याची योग्यता फारच वाढली. ती इतकी कीं, घोरपड्यांच्या पदरीं त्यास मोठा सरदारीचा अधिकार मिळाला. हरभटजीस नारोपंताचें उपाध्येपण मिळालें.

गणपतीच्या कृपेनें हरभटजीस सात पुत्र झाले, ते रामचंद्र, महादेव, भास्कर, गोविंद, कृष्ण, त्रिंबक आणि बाळकृष्ण हे होत.

रामचंद्रपंत हे जमखिंडी संस्थानचे मूळ पुरुष. त्यांस नारोपंत जोशाच्या येथील पूजेअर्चेचा कंटाळा आला. रामचंद्र हे आपले बंधु

गोविंद यांस बरोबर घेऊन पेशव्यांच्या पदरीं राहिले. श्रीमंत पेशवे सरकारच्या पदरीं या वरील बंधुद्वयांनीं घोड्यांवर बसणें, तिरंदाजी करणें, निशाण मारणें, तलवार, भाला, बोथाटी वगैरे कामांत प्रावीण्य संपादिलें. श्रीमंत बाजीराव बल्लाळ यांनीं गोविंदपंताची हुशारी पाहून इंद्रोजी कदम बांडे यांची फडणिशी इ. स. १७३० त सांगितली. (पुढें गोविंदपंतांच्या चरित्रांत ह्याबद्दल ज्यास्त सांगूं). रामचंद्र हरी हे चिमाजी आप्पाकडे चाकरीस राहिले. स.१७३९त चिमाजीआप्पा ह्यांनीं वसईवर स्वारी केली. या स्वारींत रामचंद्र हरी ह्यांनीं मोठ्या शूरत्वानें शत्रूचा मारा सोशित प्रथम किल्ल्यांत शिरून किल्ल्यावर पेशव्यांचें निशाण लावलें. ह्या पराक्रमाबद्दल श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे ह्यांनीं रामचंद्र हरीस अडीच हजार रावतांचा सरंजाम देऊन वस्त्रें दिलीं. पुढें श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत सवाई जयसिंगावर स्वारी केली. श्रीमंतांनीं ह्या स्वारींत मुद्दाम आपले बरोबर रामचंद्र हरी यास घेतलें. पेशव्यांची व जयसिंगाची भयंकर लढाई होऊन त्यांत जयसिंगाचा पूर्ण पराभव झाला. ह्या लढाईंत रामचंद्र हरी ह्यांनीं फार शौर्य गाजविलें. या लढाईंत श्रीमंतांनीं रामचंद्र हरी याचें शौर्य व धैर्य पाहून त्यास सरदारी पोषाख देऊन बावीसशें स्वारांच्या पथकावर त्याची नेमणूक केली. जयसिंगाची व पेशव्यांची लढाई झाली. त्यांत रामचंद्र हरी यांनीं फारच पराक्रम केल्यावरून श्रीमंत पेशवेबंधु संतुष्ट झाले. जयसिंगाबरोबर तह झाला. पुढें जयसिंगाच्या मनांत असा विचार आला कीं, कांहीं तरी कुरापत काढून पेशव्यांची फजिती करावी. पुढें एके दिवशीं श्रीमंत बाजीराव पेशवे व जयसिंग गोष्टी बोलत असतां जयसिंगानें बाजीरावास असें विचारलें कीं, “ आम्हांकडील एक भालेकरी व तुम्हांकडील एक भालेकरी अशी लढाई व्हावी. तुम्हांकडील भालेकरी यानें आमचे भालेकरी यास मारल्यास आम्ही चौथाई राज्य तुम्हांस देतों. ” असें ठरून त्यानें एक रजपूत भालेकरी तिकडून पाठवून दिला. श्रीमंत पेशवे ह्यांनीं

रामचंद्र हरी यास आपला भालेकरी नेमून त्यास पाठवून दिलें. नंतर उभयतांची लढाई सुरू झाली. रामचंद्र हरी याजवर श्रीगजाननाची कृपा. रामचंद्र हरी याचा भाला अकस्मात रजपूत याच्या मर्मस्थानीं लागून तो ठार झाला. तेव्हां श्रीमंतांकडील शहाजानें नौबती वाजविल्या. श्रीमंतांनीं रामचंद्र हरी यास आपल्या लष्करांत मोठ्या सन्मानानें आणिलें.

रामचंद्र हरीविषयीं दुसरीहि एक गोष्ट इतिहासांत लिहिली आहे, ती अशीः—

एके दिवशीं जयसिंग व श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांच्या गोष्टी चालल्या असतां श्रीमंतांस खूष करण्याकरितां जयासिंगानें आपल्या तंबूपुढें दोन मदोन्मत्त हत्तींची झुंज लाविली. ही मजा पाहण्याकरितां जयसिंगाच्या सैन्यांतील व पेशव्यांच्या सैन्यांतील हजारों लोक तंबूभोंवतीं जमले होते. त्या दोन हत्तींपैकीं एक हत्ती एकदम मंडळींच्या अंगांवर आला. त्या वेळीं त्या हत्तीस धरून त्याला त्याच्या जागेवर बांधण्याची एकाचीहि छाती होईना. तेव्हां 'खरा शूर असेल तोच या हत्तीस बांधील' असें सर्व म्हणाले. इतक्यांत रामचंद्र हरी यानें बरचीभाल्यासह घोड्यावर स्वार होऊन, सदरहू हत्तीस जेरीस आणून त्यास त्याच्या जागेवर बांधिलें.

ह्या पटवर्धन घराण्यांचें पाणीच कांहीं विलक्षण. ह्यांस अपमान म्हणून कधींच सहन होत नसे. रामचंद्रपंत हे नुकतेच चिमाजी आप्पाच्या सैन्यांत नौकरीस राहिले होते. ते एके दिवशीं श्रीमंत बाजराव पेशवे ह्यांच्या कचेरीस गेले. त्यांस श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांनीं ताजीम दिली नाहीं. रामचंद्रपंतांस ह्या अपमानामुळें अतिशय क्रोध आला व ते तात्काळ कचेरींतून निघून घरीं आले. श्रीमंत बाजीराव चिमाजआिप्पास म्हणाले कीं, ' रामचंद्रपंतास क्रोध कां आला व तो कचेरींतून उठून कां गेला ? ' चिमाजीआप्पा ह्यांनीं उत्तर दिलें, 'तुम्हीं त्यास ताजिम दिली नाहीं !'

श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांनीं चिमाजीआप्पास त्याची समजूत करुन घेऊन येण्यास सांगितलें. चिमाजीआप्पा ह्यांनीं त्याची नानाप्रकारें समजूत केली, परंतु रामचंद्रपंत ऐकेनात. अखेर श्रीमंत बाजीराव पेशवे स्वतः गेले व त्यास कचेरींत घेऊन आले.

इ. स. १७४९ त रामचंद्र हरी आपल्या पथकासह पेशव्यांबरोबर अहमदशहा अबदाली व बुंदेलखंडांतील राजे यांशीं लढून अंतर्वेदींतील बंदोबस्त करित असतां एकाएकीं उदराची भावना होऊन ब्रह्मावर्तानजीक शिवराजपूर येथील छावणांत आक्टोबर महिन्यांत मरण पावले. त्यावेळीं परशरामभाऊंचें वय १० वर्षांचें होतें. रामचंद्रपंत मरण पावल्याच्या योगानें श्रीमंतांसुद्धां सर्वांस फार वाईट वाटलें. हरभटबावाचे बंधु कृष्णंभट म्हणून होते. त्यांस पुरुषोत्तम म्हणून एक अज्ञान मुलगा होता. रामचंद्रपंतांनीं पुरुषोत्तमास आपल्या लष्करांत घेऊन त्यास निशाण मारणें, भाला फेंकणें, घोडा भरधांव टाकणें, दांडपट्टा वगैरे सर्व हुन्नरांमध्यें तरबेज केलें. रामचंद्रपंतांनीं पुरुषोत्तमपंतास अनामत, तसलमात, दुबेरजा वगैरे जमाखर्चाची माहिती करून दिली. हा पुरुषोत्तम रामचंद्रपंताबरोबर प्रत्येक लढाईंत हजर असे. यामुळें तो लढण्याच्या कामांत अतिशय प्रवीण झाला. आतां ओघानेंच पुरुषोत्तमपतांनीं परशरामभाऊंस युद्धोपयोगी कामांत व व्यावहारिक कामांत तरबेज केलें. पुरुषोत्तमरावांच्या शिक्षेंत परशरामभाऊंस सरदारी बाण्याचें व खऱ्या वीराचें योग्य वळण चांगल्या रीतीनें लागलें. भाऊ अल्पवयी असल्यामुळें त्याच्या पथकाचें काम पुरुषोत्तमदाजीच पहात असत.

श्रीमंत नानासाहेब पेशवे ह्यांची स्वारी कर्नाटक प्रांतीं सावनूरकरांशीं युद्ध करण्यास निघाली. इतर सरदारांप्रमाणें पुरुषोत्तमदाजीहि आपलें पथक व रामचंद्रपंताकडील पथक घेऊन निघाले. परशरामभाऊचें वय ह्यावेळीं केवळ १४ वर्षांचें होतें; परंतु परशरामभाऊंनीं युद्धास नेण्याविषयीं पुरुषोत्तमदाजीपाशीं फारच हट्ट धरला. त्यांनीं श्रीमंतांचे व सर्व सरदारांचें

सैन्य अडविलें. अखेर पुरुषोत्तमदाजींनीं परशरामभाऊंचें पथक त्यांच्या स्वाधीन करून त्यास आपल्या बरोबर घेतलें. हें सावनूरचें घनघोर युद्ध सारखें तीन महिने चाललें होतें. भाऊ अल्पवयी असतांहि त्यांनीं शौर्याची शिकस्त करून बिलक्षण रीतीनें शत्रुसैन्याची कत्तल केली. ह्यामुळेंच सावनूरकरांचा मोड झाला. या युद्धांत परशरामभाऊंनीं जें युद्धकौशल्य दाखविलें, तें पाहून मोठमोठ्या मी मी म्हणविणाऱ्या वीरांनीं तोंडांत बोटें घातलीं. ते वीर चकीत होऊन युद्धचमत्कार पहात तटस्थ उभे राहिले. कित्येकांस भारती युद्धांतील चिमकुल्या अभिमन्यु वीराचें स्मरण झालें. श्रीमंतांनीं हा विलक्षण प्रकार स्वतः अवलोकन करून, " शाबास मुला, शाबास. या लढाईचें यश तुजकडे आहे " असें म्हणून ते अतिशय खूष होऊन त्यांनीं त्यास वस्त्रें देऊन त्याचा बहुमान केला आणि कोरेगांव हा गांव बक्षिस दिला व सन १७५४ त त्या गांवची सनद परशरामभाऊस करून दिली. तो गांव अद्यापि त्यांच्या वंशजाकडे चालला आहे. भाऊंच्या अल्पवयांतच हा जय मिळाला; तेणेंकडून भाऊंस पुढील युद्धाच्या कामांत पराक्रम करण्यास फार उत्तेजन मिळालें.

सन १७६० त परशरामभाऊ व गोपाळराव पटवर्धन यांनीं ५,००० फौजेनिशीं निजामच्या दवलताबाद किल्ल्यावर हल्ला केला. ही घनघोर लढाई सारखी दोन महिने चालली होती. ह्या दोघा वीरांनीं तो किल्ला अखेर निजामाकडून जिंकून घेतला.

ओघानेंच आम्ही एका गोष्टीचा उल्लेख करतों, म्हणजे पुढील गोष्टींचा वाचकांस उलगडा होईल. पेशव्यांच्या राज्याच्या दक्षिणेस व आग्नेयेस पेशव्यांस दोन प्रबळ शत्रु उत्पन्न झाले, ते दोन शत्रु हेः—

कोल्हापूरचे राजे शिवाजीच्या वंशजापैकीं असून स्वतंत्र होते. ते पेशव्यांस जुमानीत नसून पेशव्यांच्या शत्रूंशीं आंतून स्नेह ठेवीत. इतकेंच नव्हें, तर त्यांनीं पेशव्यांच्या राज्यांत दंगे करावेत, बंडें करावींत व पेशव्यांस भंडावून सोडून सळो का पळोसें करावें.

दुसरा शत्रु म्हणजे म्हैसूरच्या मूळच्या हिंदु राजाच्या सैन्यांतील पंधरावीस शिपायांवरचा नाईक हैदरअल्ली नांवाचा एक मनुष्य होता. त्यानें बरेच लोक जमवून मोठें बंड करून व म्हैसूरच्या हिंदु राजास पदभ्रष्ट करून त्याची गादी बळकाविली. त्यानें कित्येक पाळेगारांपासून जुलुमानें खंडणी घेऊन आसपासचीं संस्थानें तो एकामागून एक आपल्या राज्यास जोडूं लागला. इ. स. १७६४ मध्यें त्यानें सर्वत्र धामधूम सुरू केली. त्या हैदरअल्लीनें बेदनूर संस्थानावर स्वारी करून तें हस्तगत करून आपल्या राज्यास जोडिलें.

तेव्हां कोल्हापूरकर व हैदरअल्ली यांजवर शह बसण्याकरितां थोरले माधवरावसाहेब यांनीं पटवर्धनांस इ. स. १७६१ च्या अखेरीस मोठी फौज ठेवण्याकरितां मिरजेचा किल्ला दिला. त्याचप्रमाणें दुसरीं कांहीं ठाणीं व जकात वगैरेचें उत्पन्न हीं पटवर्धनास दिलीं. पुढें इ. स. १७६५ त ८,००० स्वार ठेवण्याकरितां २५ लाख उत्पन्नाच्या मुलखाचा सरंजाम मिळाला. त्यांपैकीं २,४०० स्वार खुद्द परशुरामभाऊंनीं ठेवून बाकीचे स्वार अवांतर पटवर्धन मंडळींनीं मिळून ठेवावे, असा पेशव्यांनीं ठराव केला. पेशव्यांनीं दिलेला हा पटवर्धनांचा मुलूख दक्षिण महाराष्ट्रांतील धारवाड, बेळगांव व सोलापूर ह्या जिल्ह्यांत पसरलेला होता. या सर्व प्रदेशांत मिरजेच्या आसपासची जमीन व कोल्हापूरच्या पूर्वहद्दीवरील प्रांत अत्यंत सुपीक आहे. वाचकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, अद्यापपावेतों पटवर्धन सरदारांच्या वांटण्या झाल्या नव्हत्या; सर्व पटवर्धन मंडळी एकविचारें लढाईचीं वगैरे कामें करीत असत. हैदरअल्लीनें सावनूरच्या नवाबाच्या राज्यावर स्वारी केली. सावनूरच्या नवाबानें हैदराविरुद्ध थोरले माधवरावसाहेब यांजकडे मदत मागितली. थोरले माधवरावसाहेब ह्यांनीं पटवर्धन, रास्ते, मोरो बल्लाळ, आनंदराव भिकाजी वगैरे सरदार हैदरावर पाठविले. ह्या सर्व सरदारांच्या फौजा ४०,००० पावेतों जमल्या. सावनूरच्या नवाबाकडे असलेली सर्व फौज ह्या फौजेस येऊन मिळाली.

मागाहून श्रीमंत माधवराव हे २०,००० स्वार आणि १५,००० पायदळ घेऊन कर्नाटकांत येऊन पोहोंचले. नंतर परशरामभाऊ, गोपाळ गोविंद वगैरे पटवर्धन वीरांनीं आपली फौज कृष्णेच्यापलीकडे नेली. पटवर्धनांच्या सैन्यावर हैदराचा सरदार फझल उल्लाखान चालून आला. भयंकर रणकंदन सुरूं झालें. पटवर्धनांनीं खानसाहेबांच्या सैन्याची भयंकर कत्तल केली.

पटवर्धन व रास्ते हानगल मुक्कामीं असतां त्यांच्यासमीपच हैदरअल्ली २०,००० स्वार व ४०,००० पायदळ घेऊन त्यांच्या समीपच येऊन राहिला. पटवर्धन व रास्ते हैदरअल्लीच्या सैन्यावर तुटून पडले. तेव्हां हैदरअल्लीनें आपली फौज तेथून हलवून ह्या एवढ्या कारस्थानास सावनूरचा नबाब आहे असें जाणून त्यानें सावनूराजवळ वर्धा नदीसमीप आपली फौज आणली. बिचारा सावनूरचा नबाब हैदरअल्लीच्या कचाट्यांत सांपडला. तेव्हां त्यानें आपला दिवाण खंडेराव ह्यास हैदराकडे तह करण्यास पाठविला. ही बातमी पटवर्धनांस कळतांच त्यांनीं सावनूरच्या नबाबास सक्त ताकीद दिली कीं, तुम्ही हैदराशीं तह वगैरे कराल तर आम्ही हैदरअल्लीचा पराभव करून तुमचें संस्थान खालसा करून टाकूं. नंतर हैदरअल्लीनें असा विचार केला कीं, मराठ्यांशीं युद्ध करावयाचें तर विचार करून मोठ्या सावधगिरीनें केलें पाहिजे. नंतर त्यानें आपलें सैन्य हालवून तें सात कोस पलीकडे नेलें.

गोपाळ गोविंद, परशरामभाऊ वगैरे सरदार मंडळींनीं चिक्बाळापूर, नंदगड, दोड्डबाळापूर, चन्नरायगड वगैरे ठिकाणें हस्तगत केलीं. नंतर पटवर्धन सरदार कैवारास आले आणि हैदरअल्लीचे सरदार चंद्रोजी जाधव व बाळाजीपंत हे पटवर्धनावर चालून आले. मोठी निकराची लढाई झाली. चंद्रोजी जाधव व बाळाजीपंत हे पटवर्धनाच्या हातीं जिवंत सांपडले. याप्रमाणें इकडे लढाई चालू असतां हैदरअल्ली श्रीमंत माधवराव पेशव्यांचा

समाचार घेण्यास निघाला. त्रिंबकराव मामांनीं गोपाळराव व परशराम-भाऊ यांस श्रीमंतांच्या सैन्याला ताबडतोब येऊन मिळण्यास लिहिलें. पटवर्धन सरदार श्रीमंतांच्या सैन्याला येऊन मिळतांच उभय सैन्यांच्या भयंकर लढाया सुरू झाल्या.

हैदरअल्ली मोठा शूर असून उत्तम सेनापति होता. त्याच्याजवळ २०,००० स्वार व ४०,००० पायदळ होतें. मराठे व मुसलमान ह्या दोन्ही सैन्यांचा सामना होऊन दोन्ही बाजूंचे लोक जिवाची पर्वा न बाळ-गितां एकमेकांवर चवताळून गेले. घनघोर संग्राम माजून धुळीनें, धुरानें व गोळीबारानें दशदिशा धुंद होऊन दणाणून गेल्या. कोणी कोणास दिसे-नासें झालें. दोन्ही सैन्यें एकमेकांत मिसळून गेलीं. श्रीमंत माधवराव पेशवे स्वार होऊन स्वकीय सैन्यासमोर विजेसारखे चमकत होते. हैदरअल्लीहि आपल्या सैन्यास उत्तेजन देत इकडून तिकडे भरधांव घोडा फेंकीत होता. त्या दिवशीं पटवर्धन उत्तम प्रकारें लढले. हैदरअल्लीच्या लोकांनींहि बहुत पराक्रम केला. परंतु मराठ्यांच्या सैन्यापुढें त्यांचा निभाव न लागून ते लोक रंजीस आले. शेवटीं हैदरअल्लीनें मराठ्यांशीं इ. स. १७६४ त खालील-प्रमाणें तह केला:—

१ हैदरअल्लीनें मराठ्यांस रोख ३२ लक्ष रुपये खंडणी द्यावी.

२ घोरपड्यांचा हैदरानें घेतलेला मुलूख त्यांस परत द्यावा.

३ सावनूरच्या नबाबापासून खंडणी घेऊं नये व त्याच्या मुलखास उपद्रव देऊं नये.

सावनूरकर नबाबाबरोबर नरसिंगराव धायगुडे यास देऊन नबाबास त्याच्या गादीवर बसविलें. पटवर्धन सरदारांनीं मुलखाच्या बंदोबस्ताकरितां फौज ठेवून पटवर्धन सरदार आपल्या राज्यांत गेले व श्रीमंत माधवराव पेशवे पुण्यास गेले.

हैदरअलीनें पेशव्यांशीं तह केला खरा, पण त्या पराकाष्ठेच्या मानी, महत्वाकांक्षी व शूर हैदरास ह्या तहाच्या योगानें आपला अपमान झालसें वाटून त्यास चैन पडेना. त्यानें अगदीं गुप्त रीतीनें आपणाबरोबर १३,००० गारदी, ४,००० स्वार व २५ तोफा इतकें सामान घेऊन इ. स. १७७० त तो सावनूरजवळ येऊन दाखल झाला. त्याचा सावनूरच्या नबाबावर राग होता, म्हणून त्यानें त्याचें प्रथम सावनूर हस्तगत केलें व नंतर गुत्तीच्या किल्ल्यावर हल्ला केला. त्याच्या व मुराररराव घोरपड्यान्च्या भयंकर लढाया सुरू झाल्या. मुराररराव घोरपडे हा साडेतीन महिने मोठ्या निकरानें व शूरत्वानें गुत्ती किल्ल्यावर लढला; परंतु अखेरीस धान्याचा सांठा खलास झाला, ह्यामुळें मुराररराव घोरपड्यास गुत्तीचा किल्ला हैदरअल्लीच्या स्वाधीन करणें भाग पडलें.

हैदरानें गुत्तीचा किल्ला सर केल्याची बातमी माधवराव पेशव्यांस कळतांच त्रिंबकराव विश्वनाथ याजबरोबर हुजूरची फौज देऊन पटवर्धन सरदार व आनंदराव रास्ते यांस हैदरअल्लीवर चालून जाण्याची श्रीमंतांनीं आज्ञा केली.

श्रीमंतांचें आज्ञापत्र येतांच परशरामभाऊ, गोपाळराव गोविंद, वामनराव गोविंद, गंगाधर गोविंद, निळकंठ त्रिंबक, इत्यादि पटवर्धन मंडळ आपापलें सैन्य घेऊन म्हैसूरचा मार्ग धरतें झालें. पटवर्धन सरदारांची व रास्ते व त्रिंबक विश्वनाथ यांची भेट कोपाळ येथें झाली. लौकरच श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे हे निवडक ३५,००० स्वारांनिशीं म्हैसूराकडे वळून बाळापूर, कोल्हार, नंदगड, मनवगळ, बेंगळूर, चन्नपट्टण इत्यादि ठिकाणें त्यांनीं मोठ्या शौर्यानें सर केलीं. थोड्याच दिवसांनीं सरदार पटवर्धन, रास्ते व त्रिंबक विश्वनाथ यांची व पेशव्यांची फौज एकत्र जमली.

पटवर्धनांचीं पथकें आणि पेशव्यांची फौज एकामागून एक किल्ले सर करीत चालली. हैदरअल्ली मधून मधून पेशव्यांच्या फौजेवर हल्ला करी;

परंतु प्रत्येक वेळीं त्याचा पराभव होत असे. शेवटी हैदरानें गनिमी कावा लढविला. तो रात्रीं बेरात्रीं पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करी; परंतु ह्यांतहि त्याला फारसें यश येत नसे. १५ पहाडी किल्ले आणि २५ भुईकोट किल्ले माधवरावांच्या ताब्यांत आले.

ह्या युद्धांत गोपाळराव गोविंद, परशरामभाऊ इत्यादि वीरांनीं हैदराच्या सैन्यास अत्यंत जर्जर केलें.

पेशव्यांच्या पराक्रमी सैन्यापुढें आपलें कांहीं चालत नाहीं, प्रत्येक लढाईंत आपला पराजय होत आहे व एकामागून एक किल्ले पेशव्यांच्या स्वाधीन होत आहेत हें पाहून हैदरअल्ली अगदीं वैतागून गेला. आपल्या ह्या दुर्दशेस, अपकीर्तीस व पराजयास विशेष कारणीभूत हे पटवर्धन सरदारच आहेत आणि त्यांचे बारा वाजवीन तरच नांवाचा हैदर होईन अशी त्यानें प्रतिज्ञा केली.

नंतर हैदरानें आपलें सैन्य अगदीं गुप्त रीतीनें पेशव्यांच्या व पटवर्धनांच्या सैन्यापासून तीस चाळीस कोस दूर अंतरावर नेलें. पटवर्धन मंडळ एकटें गाठून तें गैरसावध असेल त्यावेळेस त्याच्यावर अकस्मात् गफलतीनें छापा घालावा अशी संधी तो पाहूं लागला. ही संधी हैदरअल्लीला बऱ्याच दिवसांत सांपडली नाहीं. त्यानें गुप्त हेरांस निरनिराळीं रूपें देऊन पटवर्धनांच्या हलचालीची बातमी काढण्याचा प्रयत्न केला. इकडे पटवर्धन सरदार हैदर आपल्यास भिऊन कोठें तरी दडी मारून बसला असें मनांत आणून अगदीं गैरसावधपणें वागूं लागले. पटवर्धन सरदारांचा तळ पेशव्यांच्या सैन्याच्या अगदीं दूर पडला. हैदराच्या गुप्त हेरांनीं ही हकीकत हैदरास कळविली. पटवर्धन सरदारांनीं आपल्या सैन्याचा तळ बुदिविहाळाजवळ दिला होता. हैदरानें आपल्याबरोबर १३,००० गारदी, ४,००० स्वार आणि २५ तोफा इतकी सामुग्री घेऊन मजल दर मजल करीत त्यानें पांच

घटका रात्रीं पटवर्धन सरदारांच्या सैन्यावर छापा घातला आणि एकदम तोफा डागण्याचा हुकूम फर्माविला. नंतर हैदराच्या सैन्यानें पटवर्धनांवर तोफांचा भडिमार व बाणांची वृष्टि सुरू केली. आधींच काळाकुट्ट अंधार. डोळ्यांत बोट घातलें तर दिसावयाचें नाहीं. धुरानें व धुळीनें आकाश व्याप्त होऊन पटवर्धनांच्या सैन्यांत एकच धांदल उडून गेली. त्यावेळीं पटवर्धनांचें सैन्य फारच अव्यवस्थित होतें. कोणी घोड्यावर जीन घालूं लागला, कोणी हत्तीवर अंबारी व नौबत लादूं लागला, कोणी चिलखत चढवूं लागला व कोणी बंदुकी भरूं लागला. पटवर्धन सरदारांच्या सैन्यांत अशी धामधूम सुरू आहे तों हैदराकडील तोफांच्या भडीमारानें अनर्थपात माजला. कोणाचीं अंगें होरपळून गेलीं. तंबूराहुट्यांस आगी लागून त्यांतून प्रचंड ज्वाळा निघूं लागल्या. कित्येक ठिकाणीं आगीचा एकच डोम उसळला. कांहीं तंबू जळून खाक झाले. हजारों सैनिक अग्नीच्या ज्वाळांनीं ठार झाले. रणभूमीवर जळून खाक झालेल्या सैनिकांच्या प्रेतांचा सडा झाला. हैदराकडील तोफांचे आवाज ऐकतांच गोपाळराव गोविंद, आनंदराव रास्ते वगैरे सरदार मंडळी घोड्यांवर बसून प्रथम लष्कर बाजाराच्या आघाडीस येऊन उभी राहिली. पटवर्धन सरदारांची भयसूचक सैन्य जमविण्याची नौबद झडूं लागली. नौबदीचा आवाज ऐकून जसजसे लोक जमत, तसतसें त्यांस उत्तेजन देऊन पुढें चाल करण्याविषयीं हूल चालविली; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, काळोखांत दुसरा कांहीं सुमार न सांपडल्यामुळें केवळ नौबदीच्या आवाजाच्या धोरणावरच हैदरअल्लीकडील तोफांचा भडीमार विशेष होई व त्यामुळें जसजसें पटवर्धनांचें सैन्य नौबदीजवळ जमे, तसतसें त्यांतील लोक हैदराच्या गोळ्यांच्या वृष्टीनें पटापट मरून पडत. परंतु अशा आगीच्या वर्षावांत परशरामभाऊ पटवर्धन, त्रिंबकराव मामा पेठे, आनंदराव रास्ते, गोपाळराव पटवर्धन व माधवराव कृष्ण पटवर्धन हे स्थिर उभे राहिले. गोपाळरावांचें अंग तोफेचा गोळा लागून बरेंच भाजलें.

माधवराव कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर यांच्या घोड्याच्या तोफेच्या गोळ्यानें चिंधड्या उडाल्या व ते तोफेचा गोळा लागून ठार झाले. परशरामभाऊंवर दोनदां बाणांचा व गोळ्यांचा भडीमार झाला. त्यांत त्यांचा घोडा जळून खाक झाला व त्यांचें अंग होरपळून गेलें. परंतु अशी त्यांची अवस्था झाली असतांहि त्यांनीं जवळच्या स्वारांचा घोडा घेऊन त्याजवर आरूढ होऊन ' हिम्मत मरदा मदत खुदा', 'धीर धरा, धीर धरा.' अशीं वीरश्रीचीं भाषणें करीत हा पुरुषसिंह तोफांच्या भडीमारांत व बाणांच्या वृष्टीमध्यें स्वसैन्यास उत्तेजन देत होता. मध्यरात्रीपासून पहांटेपर्यंत हैदराकडील सैन्याची पटवर्धन सरदारांच्या सैन्यांवर बाणांची व तोफांची वृष्टी होत होती. पहांट होतांच हैदरास वाटलें कीं, तोफांच्या गोळ्यांनीं व बाणांच्या वृष्टीनें पटवर्धन सरदार व त्यांचें सैन्य ठार झालें असेल. अशा समजुतीनें अवशिष्ट सैन्याची कत्तल उडवावी व कोणी चुकून एखादा पटवर्धन सरदार जिवंत राहिला असेल त्यास कंठस्थान घालावें ह्या हेतूनें दिन दिन करीत हैदरअल्ली स्वकीय सैन्यासहवर्तमान मोठ्या वेगानें येऊं लागला आणि पटवर्धनांच्या सैन्यापैकीं सुमारें दीड हजार सैनिक, सातआठशें घोडेस्वार व हजार एक बाजारबुणगे ठार झाले असून सुमारें चौदा हजार स्वार व पस्तीस हजार पायदळ समरांगणावर बिजलीसारखें चमकत असून सरदारांपैकीं फक्त एकच सरदार ठार झाला असल्यानें बाकीचे सरदार जारीनें लढाईची तयारी करीत आहेत हें पाहून हैदराची गाळण उडाली. आतां हे मराठे आपणांस (म्ह० हैदरास) सैन्यासह गारद करून टाकतील; तेव्हां जितकें लौकर निसटतां येईल तितकें बरें, असा विचार करून तो आपल्या सैन्यासह कडुराकडे निघून गेला. पटवर्धनांचे स्वार, पायदळ व बाजारबुणगे किती ठार झाले तें वर लिहिलेंच आहे. यांशिवाय गोपाळराव पटवर्धनाचे नामी नामी ८० घोडे जळून गेले. कोतवालच्या हत्तीच्या ठिकऱ्या उडाल्या. कांहीं सामान

व वहातुकीच्या बैलगाड्या, उंट व तट्टे जळून खाक झाली. मात्र जामदारखाना सुरक्षित राहिला होता, तो घेऊन सर्व पटवर्धन सरदार, त्रिंबकरावमामा पेठे व आनंदराव रास्ते राहिलेल्या सैन्यासह पेशव्यांच्या सैन्यास येऊन मिळाले.

पेशव्यांची व हैदराची कैक दिवस लढाई जुंपून राहिली असून उभय पक्षांच्या चकमकी जागोजाग झडत होत्या. असें असतां पटवर्धन सरदारांनीं फार सावधगिरीनें रहावयाचें तें न राहतां ते गैरसावध राहिले. याच्या योगानें त्यांचा नाश झाला. पटवर्धनांच्या जिवावर आली होती, पण शेंपटावर गेली ही ईश्वरी कृपाच होय.

इकडे श्रीमंत माधवराव पेशवे यांस राजयक्ष्मा या नांवाचा रोग होऊन त्यांची प्रकृति बेताल होत चालली. म्हणून श्रीमंतांनीं संपूर्ण फौजेचा अधिकार पटवर्धनभाऊबंद, त्रिंबकराव मामा पेठे, रास्ते सरदार, त्रिंबक विश्वनाथ वगैरे सरदारांस देऊन ते पुण्यास निघून गेले.

हैदरअल्ली मोठा शूर, धाडशी व दीर्घ प्रयत्न करणारा होता. श्रीमंत पेशवे आजारी होऊन पुण्यास निघून गेले ही वार्ता त्याच्या कानीं पडतांच त्यास आनंद होऊन तो पुनः मराठ्यांच्या मागें लागला. हैदरअल्लीनें बरोबर १,५०० गारदी, २,००० पायदळ, ७०० स्वार आणि ३ तोफा इतका सरंजाम तो घेऊन निघाला. प्रथम त्यानें जानोजी धुळप याच्या किल्ल्यास वेढा घातला. हा हैदराचा छापा १३ दिवसपावेतों होता. त्या हैदराच्या छाप्यावर परशरामभाऊ पटवर्धन व गोपाळराव पटवर्धन यांनीं जाऊन हैदराच्या फौजेचा अगदीं नाश केला; हैदराकडील महान् पराक्रमी ४०० योद्धे ठार केले व ५०० स्वार समरांगणीं जायबंदी केले. त्याच्या ४ तोफा व ५०० घोडे काबीज केले. हैदरअल्लीचा गोट लुटून फस्त केला.

या लढाईंत पटवर्धनांकडील फक्त ५० माणसें जखमी झालीं. यशवंतराव घाडगे कुमठेकर सरंजामी ठार झाला.

हैदरअल्लीचा मुलगा टिपू यास ही पराजयाची बातमी समजतांच तो आपल्या बापाच्या साह्यास धांवून आला. दोघे पितापुत्र एक झाले. पटवर्धन मंडळ व त्रिंबकराव मामा त्या पितापुत्रांवर एकदम चाल करून केले. पटवर्धनांनीं राजापूर व राचिटी हीं ठाणीं सर करून घेतलीं. चांभारटेंकडीचा बळकट पहाडी किल्ला तोफांच्या भडिमारानें काबीज केला व गुरुमकोंडा किल्लावर पेशव्यांचें निशाण चढलें.

इतक्यांत पटवर्धन सरदारांतला शूर योद्धा गोपाळराव पटवर्धन उदराच्या व्यथेनें आजारी पडून मिरजेस गेला. तेथें तो तिसरे दिवशीं १७७१ च्या फेब्रुवारी महिन्यांत मृत्यु पावला. दुःखाची गोष्ट ही कीं, अद्याप गोपाळरावचा बाप गोविंद हरी हा हयात होता. त्यास अनावर दुःख झालें. गोपाळरावाची ही बातमी ऐकून परशरामभाऊ पटवर्धन यास अनिवार दुःख झालें.

पुण्यास माधवराव पेशव्यांची प्रकृति दिवसेंदिवस फारच बिघडूं लागली. तेव्हां परशरामभाऊ पटवर्धन, त्रिंबकराव मामा पेठे, आनंदराव रास्ते, इत्यादि मंडळींनीं असा बेत केला कीं, श्रीरंगपट्टणावर स्वारी करून हैदरास नामशेष करून टाकावा. परशरामभाऊ पटवर्धन, आनंदराव रास्ते, नीळकंठ त्रिंबक पटवर्धन, वामन गोविंद पटवर्धन, गंगाधर गोविंद पटवर्धन, रघुनाथ निळकंठ पटवर्धन, मुराररराव घोरपडे, जानोजीराव घुळप इत्यादि योद्धे आपापली फौज घेऊन श्रीरंगपट्टणाकडे निघाले. ही बातमी हैदरास कळतांच तोहि आपल्या जय्यत फौजेनिशीं पटवर्धनाबरोबर सामना करण्याकरितां मोठ्या त्वेषानें बाहेर पडला. त्रिंबकराव मामांनीं पेशव्यांकडील सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळीचें आधिपत्य परशुरामभाऊ व त्यांचे भाऊबंद दुसरे पटवर्धन यांच्याकडे देऊन व दुसऱ्या टोळीचें आधिपत्य स्वतःकडे घेऊन तिसरी टोळी कृष्णराव बळवंत यांच्या ताब्यांत दिली. पेशव्यांच्या फौजेची व हैदराची गांठ मोती तलावावर पडली. हैदराचें

सैन्य आटोक्यांत येतांच पेशव्यांच्या सैन्यानें त्याजवर एकदम तोफा सुरू केल्या. हैदरअल्ली व त्याचा शूर पुत्र टिपु सुलतान ह्यांनींहि आपल्या सैन्यास उत्तेजन देऊन पेशव्यांच्या सैन्यावर बाणांची व गोळ्यांची वृष्टी चालविली. तोफांच्या भडिमारानें व बाणांच्या वृष्टीनें दशदिशा दणाणून गेल्या. आकाशपाताळ एक होऊन गेलें. उभयपक्षांकडील सैन्यें हातघाईवर येऊन शेंकडों सैनिक ठार होऊं लागले. सर्वत्र प्रेतांच्या राशी दिसूं लागल्या व रक्ताचे पाट वाहूं लागले.

ही मोतीतलावाची लढाई सारखी चार दिवस अहोरात्र चालली होती. परशरामभाऊंनीं या लढाईंत आपल्या युद्धकौशल्याची व बाहुबलाची कमाल करून सोडिली. भाऊंनीं करोलसह घोडे चालवून हैदराच्या सैन्यास त्राहि त्राहि करून सोडिलें. ह्या प्रसंगीं पटवर्धन योध्यांनीं आपली तरवार इतक्या सफाईनें चालविली कीं, प्रत्यक्ष त्याचा शत्रु जो हैदरबहादर त्यानेंहि भाऊंचें अमोघ सामर्थ्य पाहून तो तोंडांत बोट घालून राहिला. कृष्णराव धायगुडे यांनीं हैदराच्या सैन्याभोंवतालचा आपल्या सैन्याचा दिलेला गराडा चार दिवसपावेतों हालविला नाहीं. हैदरअल्लीला अघाडीस परशरामभाऊंचा मार सोसावा लागला व पिछाडीस त्रिंबकरावमामांनीं तोफा डागण्याचा सपाटा सुरू केल्यामुळें त्याच्या सैन्याची मागची बाजू जळून खाक होऊं लागली. ह्या लढाईंत हैदराचें अतिशय नुकसान झालें. ह्याचा सर्व तोफखाना, हत्ती, निशाणें, हौदे, घोडे, खजीना व जवाहीर हीं पेशव्यांच्या सैन्याच्या हातीं लागलीं. हैदराचे १,५०० स्वार ठार झाले व पुष्कळ सरदार पेशव्यांच्या हातीं लागले. त्याचें असंख्य पायदळ समरभुमीवर ठार झालें.

पेशव्यांच्या सैन्याचीहि अतोनात नासाडी झाली. परशरामभाऊंचे दुसरे चुलत बंधु निळकंठ त्रिंबक कुरुंदवाडकर हे शत्रूशीं झुंजत असतां छातींत गोळी लागून ठार झाले. ह्याशिवाय पुष्कळ स्वार, पायदळ ठार

झालें. परंतु पेशव्यांच्या तिन्ही टोळ्यांतील लोक जोरावर आहेत, असें पाहून हे बापलेक २५ स्वारांनिशी घायगुड्याची फळी फोडून श्रीरंगपट्टणास जीव घेऊन पळाले. हैदरानें त्रिंबकराव मामाबरोबर तहाचें बोलणें लाविलें. हैदरअल्ली आपणास शरण आला आहे, त्याअर्थी आतां त्याजवर शस्त्र चालविणें न्याय्य नाहीं असें जाणून भाऊ व मामा हे तह करण्यास कबूल झाले. त्यांनीं लढाई तहकूब करून श्रीरंगपट्टणाच्या पश्चिमेस कावेरीच्या उत्तरतीरीं आपल्या सैन्याचा तळ दिला व तहाच्या अटी कळविल्या. हैदरानें तहाच्या अटींच्या कागदाच्या चिंधड्या केल्या व चैत्र शु० प्रतिपदेच्या दिवशीं म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशीं त्रिंबकराव मामाच्या गोटावर पट्टणाहून तोफांचा भडिमार केला.

परशरामभाऊ आदिकरून पेशव्यांकडील मंडळींनीं हैदरअल्लीचा निमकहरामपणा पाहून त्याजबरोबर पुन्हां लढाई सुरू केली. श्रीरंगपट्टणचा किल्ला मजबूत असून हैदराकडील ३,००० स्वार व १,००० पायदळ, शिवाय गारदी लोकांची कडेकोट तयारी, ह्यांमुळें पट्टणचा किल्ला पेशव्यांच्या लौकर स्वाधीन होईना. परशरामभाऊ व त्रिंबकराव मामा हे ४० दिवसपर्यंत किल्ल्यास वेढा घालून बसले. परशरामभाऊंच्या व त्रिंबकराव मामा पेठे यांच्या तोफांची महावृष्टि बेटांवरून पट्टणावर जारीनें होऊं लागली. श्रीरंगपट्टणांत एकच धांदल उडून गेली. तोफांचे गोळे धो धो शब्द करीत शहरांतील महालांवर आदळून कैक इमारती लोटांगणें घालूं लागल्या. नागरीकजनसमूह भयचकित होउन गेला. पट्टणमध्यें एकहि माणूस फिरकेनासें झालें.

किल्ल्याभोंवतीं व शहराभोंवतीं पेशव्यांच्या सैन्याचा विस्तार लांबवर पसरलेला असून तोफांच्या भडिमारानें दिग्मंडळ दणाणून गेलें व सर्वत्र धूरच धूर होऊन गेला.

हैदरअल्ली व टिपू ह्यांनींहि आपल्या जिवाची पर्वा न करतां ते पेशव्यांशीं लढले. त्यांनीं आपल्या सैन्यास नानाप्रकारें उत्तेजन दिलें. परंतु सव्वा महिना युद्ध चाललें; खानाचे पुष्कळ लोक रणांगणीं ठार झाले; सर्व फौज जर्जर होऊन गेली; अल्लीचे सरदार, मानकरी त्रस्त झाले. त्यानें महमद अल्ली कुमदान व फिरंगी फुलचारीकर यांनीं या आणीबाणीच्या प्रसंगीं साह्य करावें म्हणून आपलेकडील अनुभविक योद्धे व मुत्सद्दी पाठविले; परंतु त्यांनीं साह्य देण्याचें नाकारिलें.

श्रीरंगपट्टणचा किल्ला पेशव्यांच्या सैन्यानें बहुतेक सर करून त्या मुलखाची खंडणी घेण्याचीहि मामांनीं सुरवात केली. तेव्हां हैदरअल्लीनें परशरामभाऊ, त्रिंबकरावमामा पेठे, आनंदराव रास्ते इ. मंडळींशीं तहाचें बोलणें लावलें. परंतु इसापनीतींतल्या गोष्टीप्रमाणें गोष्ट झाली. लांडग्यानें मेंढरांचा फडशा पाडला. धनगराचा पोर ' लांडगा, लांडगा ' म्हणून जीव खाऊन ओरडूं लागला. तरी लोकांचा त्याच्यावर विश्वास बसेना. त्याचप्रमाणें परशरामभाऊ पटवर्धन इ. मंडळींचा विश्वास घातकी हैदरावर बसेना. पटवर्धन, रास्ते, पेठे इत्यादि मंडळींनीं हैदराशीं तसेंच युद्ध चालू ठेविलें. श्रीरंगपट्टणचा किल्ला पेशव्यांचें सैन्य सर करणार, हैदर व टिपु यांचा पाडाव होणार अशी वेळ आली. इतक्यांत श्रीमंत थोरले माधवरावसाहेब यांचें परशरामभाऊ पटवर्धन, आनंदराव रास्ते, त्रिंबकरावमामा पेठे इत्यादि योद्धे मंडळीस निकडीचें पत्र आलें कीं, 'आमचा अंतकाळ समीप आला; पळाचाहि विलंब न लावतां जरूर थेऊर मुक्कामीं येणें.' नंतर त्रिंबकरावमामा पेठे, आनंदराव रास्ते, परशरामभाऊ आदिकरून पटवर्धन मंडळी यांचें अगदीं गुप्त खलबत झालें कीं, अशा दुर्धर प्रसंगीं दुराग्रह न धरितां हैदराच्या विनंतीप्रमाणें त्याजबरोबर आपणांस अनुकूल असा तह ठरवावा, व सत्वर श्रीमंतांच्या भेटीस जावें.

हैदरअल्लीशीं पुढीलप्रमाणें तह ठरला:—

(१) शिवाजीच्या वेळीं कर्नाटकचा जितका मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत होता तितका मुलुख हैदरानें मराठ्यांस द्यावा.

(२) गरमकोंडा व मदगिरी हे किल्ले पेशव्यांच्या ताब्यांत असावे.

(३) लढाईच्या खर्चाबद्दल हैदरानें छत्तीस लक्ष रुपये पेशव्यांस द्यावे.

(४) हैदरानें पेशव्यांस दरसाल चौदा लक्ष रुपये खंडणीबद्दल द्यावेत.

(५) हैदरानें सावनूरच्या नवाबास यत्किंचितही इजा देऊं नये.

असो. परशरामभाऊ पटवर्धन, त्रिंबकरावमामा पेठे व आनंदराव रास्ते इ० योद्धे मंडळींनीं हैदराकडून छत्तीस लक्ष रुपये रोख घेऊन हैदराशीं सतत चार वर्षें चाललेलें युद्ध इ. स. १७७२ च्या सप्टेंबर अखेरीस शेवटास लागलें.

त्रिंबकरावमामा पेठे, परशरामभाऊ आदिकरून पटवर्धन मंडळी, आनंदराव रास्ते इ० योद्धे थेऊरास आले. त्यांनीं श्रीमंत थोरले माधवरावांस हैदराची सर्व हकीकत सांगितली. श्रीमंतांस अत्यंत समाधान वाटलें. श्रीमंत माधवराव पेशवे १८ नोव्हेंबर १७७२ त परलोकवासी झाले. पुढें सखाराम बापु व राघोबादादा यांनीं सातार्‍याहून पेशवाईचीं वस्त्रें आणून डिसेंबर महिन्यांत नारायणरावास पेशवाईच्या गादीवर बसविलें.

नंतर परशरामभाऊ आदिकरून पटवर्धन मंडळी आपला फौजफाटा घेऊन आपल्या जहागिरीस मिरजेस गेली. इकडे श्रीमंत नारायणराव पेशवे ह्यास गादीवर बसून पुरते आठ महिने झाले नाहींत तोंच त्यांचा खून झाला. राघोबादादा ह्यांनीं बजाजी पुरंदरे यांस सातार्‍यास पाठवून पेशवाईचीं वस्त्रें आणवून आपण स्वतः पेशवाईच्या गादीवर बसला. इकडे पुण्यांत अशी दंगल

च अव्यवस्था माजलेली ऐकून हैदर व निजाम उल्मुलुख यांस परमानंद झाला. निजामानें मोंगलाईत असलेलीं पेशव्यांचीं ठाणीं आपल्या कबजांत घेऊन तेथें असलेले पेशव्यांचे लोक हाकून दिले. त्याचप्रमाणें हैदरहि पेशव्यांच्या लोकांच्या मागें लागला. त्यानें कर्नाटक येथें असलेलीं पेशव्यांचीं ठाणीं घेऊन त्यांवर आपला सुभेदार नेमला.

हें वर्तमान राघोबादादा पेशवे ह्यास कळतांच त्यानें आपलें सर्व सैन्य घेऊन कर्नाटकाकडे मोर्चा वळविला. राघोबादादा ह्याची चाहूल लागतांच हैदरानें आपल्या सुभेदाराची दुसरीकडे नेमणूक करून पेशव्यांचीं ठाणीं मोकळीं करून दिलीं.

राघोबादादा कर्नाटकांत गेला नाहीं तोंच इकडे पुण्यांत सखारामबापु, हरीपंततात्या फडके, नाना फडणवीस इत्यादि मंडळींनीं एक मसलत चालविली. ती अशी कीं, नारायणरावांच्या मृत्युसमयीं त्याची स्त्री गरोदर होती. तिजला सखाराम बापू, नाना वगैरे मंडळींनीं मोठ्या बंदोबस्तानें पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविलें व तिच्या नांवचीं पत्रें चोहोंकडे पाठवून तात्या, बापू व नाना हे त्रिवर्ग कारभार पाहूं लागले.

इकडे मिरजेस राघोबादादांनीं परशरामभाऊस पत्न पाठविलें कीं, तुम्हीं आपल्या सर्व सरंजामानिशी आम्हांस येऊन मिळावें. कारभारी मंडळींनींहि भाऊस पत्न पाठविलें कीं, तुम्हीं आपली सर्व फौज घेऊन पुण्यास निघून यावें. भाऊंस उडत उडत बातमी कळली होती कीं, सखारामबापू, हरीपंततात्या इत्यादि मंडळींनीं गरोदर असलेल्या गंगाबाईस मोठ्या बंदोबस्तानें पुरंदरावर ठेवून तिच्या नांवानें राज्यकारभार चालू केला. भाऊंस पेंच पडला कीं, दादाचा पक्ष धरावा, तर जनापवाद असा आहे कीं, पुण्याच्या खुनाच्या बाबतींत दादांचें अंग असलेंच पाहिजे. कारभाऱ्यांच्या कारस्थानांत शिरावें, तर दादा मोठे शूर असून ते कारभाऱ्यांच्या कारस्थानांचा उच्छेद करून टाकून कित्येक कारभाऱ्यांस कंठस्नान घालतील अथवा

त्यांच्या नरडीचा घोंट घेतील. तेव्हां वेलासहि दुखवावयास नको व बाळकासही दुखवावयास नको म्हणून भाऊंनीं एक युक्ति योजिली. गंगाबाईस कारभाऱ्यांनीं पुरंदरच्या किल्ल्यांत सुरक्षित ठिकाणीं ठेवलें होतें. भाऊंनीं गुप्त रीतीनें आपले बंधु गंगाधर गोविंद व कान्हेरराव त्रिंबक यांजबरोबर निवडक शूर फौज देऊन त्यांस कारभाऱ्याकडे पाठविलें व आपण दादासाहेबांच्या स्वारींत हजर झाले.

इकडे सर्व लोकांचें लक्ष पुरंदर किल्ल्याकडे लागलें. वैशाख शुद्ध सप्तमीच्या दिवशीं गंगाबाई प्रसूत होऊन त्यांस पुत्ररत्न झालें. कारभाऱ्यांस परमानंद होऊन मुलाचें नांव सवाई माधवराव ठेवण्यांत आलें व चोहोंकडे शर्करा वांटण्यांत आली. चाळीसाव्या दिवशीं कारभाऱ्यांनीं साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणवून रघुनाथरावदादांच्या पक्षाकडील सर्व मंडळीस कैद करून शिंदे, होळकर, नागपूरकर भोसले, गायकवाड, पटवर्धन, हैदरअल्ली, निजाम इत्यादि राजेरजवाड्यांस माधवराव नारायण यांच्या नांवाचीं पत्रें गेलीं कीं, "अतःपर रघुनाथरावदादा यांच्या शिक्क्याचीं पत्रें कोणींहि मानूं नयेत. रघुनाथरावदादा हे बंडवाले असून जर कोणी त्यांचा पक्ष स्वीकारील अथवा त्यांस साह्य करील, तर त्याला सरकारांतून योग्य शासन होईल. पेशव्यांच्या गादीस खरे व कायदेशीर वारस माधवराव नारायण हेच होत."

रघुनाथरावदादांच्या पक्षाचा बीमोड करून त्यांस कैद करण्याकरितां नानांनीं हरिपंततात्या फडके यांच्याबरोबर निवडक ४०,००० फौज देऊन त्यांस दादासाहेबांवर पाठविलें. भाऊंनीं आपल्या स्वामीभक्तीस जागून तात्यांस पूर्ण साह्य करावें, आणि दादासाहेबांचा चांगला समाचार घ्यावा अशाविषयीं त्यांस गुप्तपणानें पत्रें पाठविलीं.

इकडे कर्नाटकांत दादासाहेबांस ह्याची गुणगुण कळली. तावडतोब आपल्या फौजेसहित त्यांनीं आपला मोर्चा पुण्याकडे वळविला. मार्गामध्यें त्यांस हरीपंत भेटले. त्यांची व दादासाहेब यांची लढाई सुरू झाली.

भाऊहि दादासाहेबांबरोबर होते. गंगाबाईस पुरंदर मुक्कामीं १८ एप्रिल १७७४ त पुत्ररत्न होऊन कारभाऱ्यांनीं साताऱ्याहून वस्त्रें आणवून त्यास पेशव्यांच्या गादीवर बसविलें. ही सुवार्ता भाऊंस कळतांच त्यांनीं उघडपणें दादासाहेबांचा पक्ष सोडून ते आपल्या सैन्यासह हरीपंतास येऊन मिळाले. बहुतेक सरदार आपापल्या सैन्यांसह फडक्यास येऊन मिळाले. दोन्हीकडील सैन्यें निकरानें लढूं लागलीं. ही लढाई अशेरीच्या मैदानांत झाली. त्रिंबकरावमामास गोळी लागून ते जखमी झाले व दादासाहेबांच्या सैन्याच्या हातीं लागले. गंगाधरराव रास्ते यांना भयंकर जखमा लागून ते अगदीं घायाळ झाले. भाऊंची व महमद इसाक यांची भयंकर लढाई झाली. भाऊनीं पुष्कळ गोळया इसाकवर झाडल्या; परंतु इसाकच्या अंगांत चिलखत असल्यामुळें भाऊंचा मार लागू न होतां तो निसटून गेला. भाऊंचे चुलतबंधु वामन गोविंद पटवर्धन हे भाऊंच्या सैन्यांत होते. त्यांनींहि त्या दिवशीं आपल्या शौर्याची शर्थ केली. राघोबादादा मोठ्या आवेशानें जिवाची पर्वा न करतां लढला. परंतु दादासाहेबांचे कांहीं लोक भराभर एकामागून एक निघून तात्यांच्या सैन्यांत सामील झाले. दादासाहेबांच्या सैन्यांतील उरलेले लोक पळूं लागले. नंतर दादासाहेबहि पळूं लागले. दादा पळूं लागतांच भाऊ व तात्या ह्यांनीं त्यांचा पाठलाग चालविला.

ह्या पाठलागांत भाऊंचे चुलतबंधु वामनराव पटवर्धन आणि दुसरे पटवर्धन सरदार होते. नंतर दादा हैदराबाद, बेदर इ. ठिकाणीं पळून गेले. भाऊ व दादा ह्यांनीं त्यांना तेथेंहि गांठलें. नंतर नेमाड, माळवा, उज्जयनी, कोटा, मंडळेश्वर, ओंकारमांधाता, महेश्वर, धार इ. ठिकाणें दादांनीं गांठलीं. तितक्याहि ठिकाणीं भाऊंनीं व तात्यांनीं त्यांचा पिच्छा पुरविला. जेथें जेथें दादा मदत मागावयास जात, तेथें तेथें तात्या व भाऊ असावयाचेच. तात्यांनीं व भाऊंनीं दादांस दे माय धरणीं ठाव असें केलें. दादा

अगदीं रडकुंडीस आले. असे हाल सोशीत दादासाहेब नर्मदा उतरून अलीकडे आले आणि असेरी, बऱ्हाणपूर, खानदेश, कोंकण इ. ठिकाणीं त्यांनीं पलायन केलें. तेथेंहि तात्या व भाऊ त्यांच्या मागें दत्त म्हणून उभेच. अखेर दादानीं कल्याण मुक्कामीं येऊन इंग्लिशांचा आश्रय केला. हा प्रकार इ. स. १७७५ त घडला.

इ. स. १७७६ च्या नोव्हेंबर महिन्यांत भाऊंचे चुलतबंधु वामन गोविंद पटवर्धन हे दादांबरोबर लढत असतां तापीच्या दक्षिण तीरावर वरणगांव येथें लढाईंत ठार झाले.

इकडे भाऊ राघोबादादांच्या पाठलागांत गुंतले आहेत ही संधी साधून हैदर व कोल्हापूरकर ह्यांनीं पेशव्यांच्या मुलखांत लुटालूट, जाळपोळ इ. प्रकार चालविले व पूर्वीं पेशव्यांबरोबर झालेले सर्व तह धाब्यावर बसवून पेशव्यांचा मुलूख घेण्याचा सपाटा चालविला. भाऊंचे चुलतबंधु पांडुरंग गोविंद व भाऊचे पुतणे कान्हेरराव त्रिंबक ह्यांनीं आपल्याबरोबर कांहीं सैन्य घेऊन करवीरकरांचा व म्हैसूरकरांचा समाचार घेण्यास ते निघाले.

प्रथम त्यांनीं करवीरकरांशीं युद्ध सुरू केलें. करवीरकरांचा व त्यांचा तह झाला. नंतर हे बालवीर हैदराच्या मागें लागले. त्यांच्या व हैदराच्या सैन्यांची लढाई सावशी कमडोळी येथें इ. स. १७७७ त सुरू झाली. हैदराकडे ६,००० पायदळ, ९,००० स्वार आणि ९ तोफा इतका सरंजाम होता. त्यामानानें पटवर्धनांचें सैन्य फारच थोडें होतें. उभय सैन्यांचा सामना होतांच पटवर्धनांचे लोक किंचित् कच खाऊं लागले. परंतु पटवर्धन सरदारांचा बाणा शत्रूस पाठ दाखविण्याचा नसल्यामुळें हे लढवय्ये वीर आपापल्या पथकांसह एका गर्दीमध्यें घुसून त्यांनीं आपली तरवार चालवून कापाकापी करण्यास आरंभ केला. ह्या लढाईंत पटवर्धनांचें सैन्य थोडें असून हैदराचें सैन्य पुष्कळ असल्या कारणानें पटवर्धनांचे लोक पटापट

मरून पडूं लागले. कोन्हेराव त्रिंबक ह्यांच्या छातींत गोळी लागून ते ठार झाले. पांडुरंगराव गोविंद पटवर्धन यांच्या भाल्याची फेंक एकसारखी चालूं असतां त्यांचा घोडा एकाएकी बुजून उभा राहिला. महमद कुमदान यानें ही संधी साधून त्यांच्या पाठींत भाला खुपसून व तरवारीनें गर्दन छाटून त्यांस ठार केलें. श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन यांच्या पाठींत गुरजाचा धप्पा लागून ते ठार झाले. वासुदेव धोंडदेव पटवर्धन हेहि लढाईत ठार झाले.

राघोबादादा कल्याण मुक्कामीं इंग्लिशांच्या आश्रयास गेले हें वर सांगितलेंच आहे. तेथल्या इंग्लिश लोकांनीं त्यास मुंबईस आपल्या गव्हर्नराकडे नेलें. साष्टी, मुंबईजवळचीं कांहीं बेटें, वसई व गुजराथेंतील कांहीं प्रांत मिळून १९ लक्षांचा मुलूख घेण्याचें कबूल करून त्यांनीं आरास येथें मराठ्यांवर चाल केली. ह्या लढाईत मराठ्यांनीं इंग्लिशांचा पराभव केला. तेव्हां इंग्लिश व मराठे यांचा १७७६ त पुरंदर येथें तह झाला. त्यांस इंग्लिशांनीं राघोबाचा पक्ष घेऊं नये व त्यास आमच्या स्वाधीन करावें, याबद्दल नाना, बापू वगैरे कारभाऱ्यांनीं साष्टी, भडोच वगैरे सहा लक्षांचा मुलूख इंग्लिशांस द्यावा असें ठरलें.

परंतु ह्या तहाप्रमाणें इंग्लिश लोक राघोबादादांस कारभारी मंडळीच्या स्वाधीन करण्यास टाळाटाळ करूं लागले.

पुढें राघोबाचें व इंग्लिशांचें कारस्थान झालें. त्यांत असें ठरलें कीं, इंग्लिशांनीं राघोबादादास पेशवाईच्या गादीवर बसवावें. या कामगिरीबद्दल राघोबादादानें इंग्लिशांस चौथा हिस्सा राज्य द्यावें. इंग्लिश या गोष्टीस कबूल झाले. इ. स. १७७८ च्या अखेरीस कॅप्टन स्टुअर्ड (इष्टूर फाकडा), कर्नल इगर्टन, जनरल गॉडर्ड, कॅप्टन म्याके इ. योद्धे लढाईच्या तयारीनें पुण्याकडे निघाले.

इकडे कारभाऱ्यांनीं पटवर्धन सरदार, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, धुळप, रास्ते, फडके इत्यादि सरदारांस इंग्लिशांशीं सामना कर-

ण्यास सज्ज करून ठेविलें. राघोबादादांच्या वतीनें भांडणारें इंग्लिश सेनापति जनरल गॉडर्ड पलटणें घेऊन पनवेलीवरून खोपवलीस येतांच त्यांच्या मागोमाग शिंद्याची फौज बडोद्याच्या रोखानें खोपवलीजवळ येऊन इंग्लिशांच्या फौजेपुढें आडवी उभी राहिली. पेशव्यांचा तोफखाना घेऊन धुळप व रास्ते बोरघाटाखालीं येऊन धडकले. हरीपंत फडके आणि तुकोजी होळकर ह्यांनीं सह्याद्रीचें टोंक धरिलें. गॉडर्डसाहेबांची रसद वाटेंतल्या वाटेंत मारून मुंबईची वाट बंद करण्याकरितां १२,००० फौजेनिशीं परशरामभाऊ घाटाच्या मधोमध उभा राहिला.

क्याप्टन मॅके पनवेलीहून रसद आणीत होते. परशरामभाऊंनीं त्याच्यावर एकदम हल्ला केला. मॅकेहि या समयीं शुरत्वानें लढले; परंतु परशरामभाऊपुढें त्यांचा नाइलाज होऊन सर्व रसद भाऊंना देणें भाग पडलें. दुसऱ्या दिवशीं मॅके ह्यानें मध्यान्ह रात्रीं अगदीं गुप्तपणें खोपोवलीस येऊन राहिलेलें सामान मोठ्या हुशारीनें गॉडर्ड साहेबांच्या छावणींत पोहोंचतें केलें.

नंतर तीन पलटणी, दहा तोफा व बरेच स्वार ब्राऊनसाहेबाबरोबर देऊन त्याची रवानगी पनवेलीस रसद आणण्याकरितां झाली. परशरामभाऊंनीं वाटेंतच ब्राऊनसाहेबावर हल्ला करून रसद आणणारे सगळे बैल पकडून हरीपंत फडक्याकडे रवाना केल. इंग्लिशांची अगदीं दुर्दशा उडून गेली. इंग्लिशांनीं मोठ्या सावधागिरीनें मुंबईहून दारूगोळा, दाणावैरण व धान्य वगैरे आणलें. परशरामभाऊंनीं त्यांतलें बरेंच सामान लुटून आणलें.

आपले डेरे गेले, राहुट्या गेल्या, बंदुका गेल्या, दारूगोळ्याचा भाऊनें नाश करून टाकिला; याच्या योगानें गॉडर्डसाहेबाची गाळण उडाली. पेशव्यांच्या सैन्यापुढें आपणास जय येणें मुष्कील आहे हें जाणून त्यानें आडबाटेनें मुंबईचा रस्ता धरला.

गॉडर्डसाहेबानें मोठ्या तोफा व बुणगे खंडाळ्याहून खोपवलीस पाठविले, ते चौथे दिवशीं सुरक्षित पोहोंचले. तेव्हां आपणहि सुखरूप जाऊं

असें त्यांस वाटून ते निघाले. परंतु ते खंडाळा व कार्ले यांच्या दरम्यान येत आहेत इतक्यांत हरीपंत फडक्यानें त्यावर एकाएकीं हल्ला करून त्यांच्या २,००० गोळ्यांच्या पेट्या लुटून फस्त केल्या. ह्या वेळीं होळकर कुसुरडें घाटाजवळ होते व परशुरामभाऊहि १२,००० स्वारांनिशीं भिमाशंकराजवळ होते. गॉडर्डसाहेब अशा पेचांत पडले आहेत, इतक्यांत क्याप्टन स्टुअर्ट (इष्टुर फाकडा) कट्टया सरंजामानिशीं कार्ल्याजवळ येऊन ठेपला. हा महान् पराक्रमी योद्धा असून त्यानें आपल्या बरोबर आणलेलें सैन्य कवायत शिकलेलें असून मोठें शूर होतें. क्याप्टन स्टुअर्ट यांनी एकदम फैर झाडण्यास सुरवात केली. त्याच्या सैन्याचा जमाव मोठा असून एकसारखी सरबत्ती सुरू झाली. आगीचा मारा जबर, यामुळें पेशव्यांच्या सैन्याची त्रेधा उडून गेली. होळकर, धुळप, रास्ते, पटवर्धन, फडके इत्यादिकांनीं आपल्याकडून होती तितकी पराकाष्ठा केली; परंतु स्टुअर्टच्या भडीमारापुढें त्यांचा कांहींच उपाय चालेनासा झाला. ह्यावेळीं फक्त पाटीलबोवांनीं (महादजी शिंदे यानें) आपलीं कवायती पलटणें पुढें केलीं; पण त्याच्या एकट्याच्या सैन्यास इंग्लिश सेनापती दाद देईनात. इतक्यांत पानशांचा तोफखाना पेशव्यांच्या सैन्यास येऊन मिळाला. याच्या योगानें पेशव्यांच्या सैन्यास धीर आला. इंग्लिशांच्या कवायत शिकलेल्या सैन्यास तोडीस तोड देण्याकरितां महादजी शिंद्यानें आपले कवायती कंपू इंग्लिशांसमोर उभे केले. होळकर, रास्ते, पानसे यांनीं इंग्लिशांवर दारूगोळ्यांचा पाऊस पाडला. महादजी शिंदे आणि परशरामभाऊ पटवर्धन यांनीं आपलीं पथकें पुढें करून तोफांचा भडिमार चालविला. खुद्द पेशव्यांचें व त्यांच्या सरदारांचें मिळून सव्वा लाख सैन्य होतें. तोफांशीं तोफा लागून त्यांचे गोळे इंग्लिशांच्या सैन्यावर आदळूं लागले. धुरानें दिशा धुंद होऊन गेल्या. भयंकर अंधकार पडून धडाधडा शब्दांनीं दिग्मंडळ दणाणून गेलें. धुरामुळें इंग्लिशांस पेशव्यांकडील सैन्याचा कांहींच अदमास लागेना. पेशव्यांकडे लोक किती आहेत, त्याचा

अंदाज काढावा म्हणून कॅ० स्टुअर्ट बरेच दूर गेले; आणि एका उंच झाडावर उभे राहून दुर्बिणीनें पेशव्यांच्या सैन्याची टेहळणी करूं लागले. हें हरीपंत फडक्यांच्या नजरेस पडलें. तेव्हां त्यांनीं जवळ असलेल्या गोलंदाजाला क्याप्टन स्टुअर्ट यांस दाखवून सांगितलें कीं, हीच वेळ आहे, बत्ती दे. गोलंदाजानें ताबडतोब निशाण धरून तोफ डागली व कॅ० स्टुअर्ट झाडाच्या झाडावरच ठार केला. क्या० स्टुअर्ट जरी ठार झाला तरी इंग्लिशांच्या सर्व सैन्याचा अधिपति कर्नल पारकर यानें कर्नल मॅके, क० गॉडर्ड यांचा विचार घेऊन व आपल्या सैन्यास धीर देऊन युद्ध तसेंच पुढें चालविलें; परंतु कर्नल पारकर ठार झाला. गॉडर्ड साहेबांस तीन ठिकाणीं गोळ्या लागून ते जखमी झाले. तरी इंग्लिशांनीं धीर धरून लढाई चालूं ठेवली. परंतु इंग्लिशांस जय असा मुळींच मिळाला नाहीं. ह्या बोरघाटांतील मराठी सैन्याचा अधिपति शिंदा होता. ही बोरघाटांतील लढाई सारखी तीन वर्षें चालली होती.

अखेर महादजी शिंद्यांच्या विद्यमानें इंग्लिशांचा व मराठयांचा पुढीलप्रमाणें सालपे मुक्कामीं तह झालाः—

(१) पुरंदरचा तह झाल्यापासून इंग्लिशांनीं जो मुलूख मराठ्यांपासून घेतला असेल तो त्यांचा त्यांस परत द्यावा.

(२) भडोचजवळचा तीन लक्षांचा मुलूख पुरंदरच्या तहांत पेशव्यांनीं इंग्लिशांस देऊं केला होता, तो आतां इंग्लिशांनीं मागतां कामा नये.

(३) राघोबाचा पक्ष इतःपर इंग्लिशांनीं न घेतां दरमहा त्यास २५,००० रुपये खर्चास देऊन राघाबानें कोपरगांवीं रहावें.

राघोबादादांनीं पेशवाई मिळण्याकरितां हा एवढा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्यांस पेशवाई तर मिळाली नाहींच; पण बोरघाटांतील लढाईंत इंग्लिशांचे सुमारें चार साडेचार हजार व मराठयांचे तितकेच सैनिक ठार मात्र

झाले. राघोबादादानें यापुढेंहि कारस्थानावर कारस्थानें केलीं असतीं; पण तो १७८३ त कोपरगांवीं मृत्यु पावला.

इकडे सन १७८२ च्या डिसेंबर महिन्यांत हैदरअल्ली मृत्यु पावला. हैदरअल्ली अत्यंत शूर होता. तो प्रजेचें पालनहि चांगल्या प्रकारें करीत होता; परंतु त्याच्यांत मुत्सुद्दीपणाचा अभाव होता. तो जरी महमदी धर्माचा अनुयायी होता, तरी धर्मासंबंधानें हिंदु लोकांवर जुलुमजबरदस्ती करीत नसे. त्यानें जुलमानें कोणासहि धर्मांतर करावयास लावलें नाहीं.

हैदराच्यामागून त्याचा पुत्र टिपु सुलतान म्हैसूरच्या गादीवर बसला. तो गादीवर बसला तेव्हां बावीस तेवीस वर्षांच्या वयाचा भरज्वानींत होता. त्यानें कर्नाटक प्रांतांतील पेशव्यांचीं ठाणीं भराभर घेण्यास सुरुवात केली. सर्व कर्नाटकभर जाळपोळ, लुटालूट, हाणामाऱ्या इत्यादि सुरू केल्या. आपल्या राज्यांतील ब्रह्मवृंदांची तर त्यानें फारच दशा चालविली. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत समशेर घेऊन दीन दीन शब्दाची भयप्रद गर्जना करीत ह्या सुलतानरूपी सैतानानें सुंता करण्याचा सारखा सपाटा लावला. शेंकडों ब्राह्मण भ्रष्ट केले. दोन हजार ब्राह्मणांनीं जिभा हसडून प्राण दिले. दोन तीन हजार ब्राह्मणांनीं तुंगभद्रा नदींत उड्या टाकून आत्महत्या केल्या. कैक पतिव्रतांनीं कावेरी नदींत उड्या घेतल्या. कर्नाटकांत जे सरदार व देसाई वगैरे वतनदार होते, त्यांजपासून अधिक खंडणी मिळावी म्हणून त्यांच्यावर अतिशय जुलूम चालविले. त्यानें पेशव्यांचे व पटवर्धनाचे आप्त जे नरगुंदकर त्यांच्यावर हल्ला केला. नरगुंदकराच्या अति लावण्यवति कन्येस बळजबरीनें धरून नेऊन त्या मंदाधानें तिला भ्रष्ट केलें. नरगुंदकरांच्या बायकापोरांचा छळ केला. त्यांस कपालदुर्ग ह्या किल्ल्यांत कैदेंत टाकिलें. नरगुंदकरांचा कारभारी काळोपंत यास मुसक्या बांधून तो श्रीरंगपट्टणास घेऊन गेला. असो. हें वर्तमान पुण्यास ताबडतोब कळलें. तेव्हां नाना फडणवीस अत्यंत क्रोधायमान झाले. नानांनीं परशरामभाऊ

पटवर्धन, हरीपंत तात्या फडके, महादजी शिंदे, तुकोजीराव होळकर इत्यादि सरदारांस सैन्यासहित पुण्यास बोलाविलें. सर्व सरदार आपापलें सैन्य घेऊन आल्यावर नाना फडणवीसहि पेशव्यांचें सैन्य घेऊन आला व निजामहि आपलें सैन्य घेऊन मराठ्यांचे साहाय्यार्थ धांऊन आला. सर्व पेशव्यांच्या सैन्यास येऊन मिळाले. नंतर सर्व सरदार कर्नाटकांत आल्यावर पेशव्यांच्या सैन्यानें बदामी किल्ल्यावर ९ मे १७८६ रोजीं हल्ला केला. बदामी शहर अफाट मैदानांत पसरलें आहे. मध्यभागीं एक भव्य गढी आहे. भोंवतीं एक तट बांधलेला आहे. बाहेरल्या अंगास दोन्ही बाजूंस दोन बळकट किल्ले आहेत. मराठ्यांनीं प्रथम तटबंदी फोडण्याचा प्रयत्न केला. पटवर्धनांच्या व फडक्यांच्या सैन्यानें तोफांचा धडाका सुरू केला. शिंदे, होळकर, पटवर्धन, फडके, निजाम इत्यादिकांच्या सैन्यानें सारखा तटावर वीस दिवस तोफांचा भडिमार चालविला. परंतु बदामी किल्ल्याच्या तटानें त्यास दाद दिली नाहीं. इकडे तटाच्या आंतून किल्लेदारानेंहि तोफा चालू केल्या. येणेंकडून टिपूचे व मराठ्यांचे हजारों सैनिक ठार झाले.

बदामी किल्ल्याचा तट फोडण्याचा मराठ्यांनीं भगीरथ प्रयत्न केला; परंतु तटाची एक फूटभरसुद्धां जागा भंगली नाहीं. तेव्हां मराठ्यांनीं तट फोडण्याचा नाद सोडून देऊन शिड्या लावून ते तटावर चढले. तेव्हां किल्ल्यांतील ३५,००० लोक आंतल्या बाजूनें तटावर चढून मराठ्यांस तटाच्या आंत व बाहेर फेंकून देऊं लागले. तेव्हां मराठ्यांनीं तटावरील लोकांवर बंदुकांची सारखी वृष्टि चालविली. शिवाय जे जे सैनिक मराठ्यांच्या तावडींत सांपडत, त्यांस मराठे तटावरून बाहेर व आंत भराभर फेंकून देत. किल्ल्यांतील लोकांनीं शत्रूंच्या नाशार्थ एक युक्ति योजून ठेवली होती. ती अशी कीं, किल्ल्यासभोंवार दारूचे बुधले जागोजाग बदामीकरांनीं पुरून ठेवले होते. त्यांस त्यांनीं बत्ती दिली; परंतु ह्याच्या योगानें बदामीकरांचा व पेशव्यांच्या सैन्याचा असा दोघांचाहि नाश झाला. ही नासाडी

व अप्रतिष्ठा पाहून भाऊ, तात्या व महादजी शिंदे यांस अतिशय त्वेष आला. त्यांनीं वीरश्रीजनक भाषणांनीं टिपूच्या अघोर कृत्याचें चित्र सैनिकांच्या डोळ्यांपुढें उभें केलें. आज 'मारूं किंवा मरूं' असा उत्साह त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केला. दृढनिश्चय, एकोपा आणि हिय्या यांचा मराठी सैन्यानें अंगिकार केला. मग संपूर्ण सैन्यानें एकच हूल करून किल्ले-दारांच्या भडिमारास व दारूच्या भडक्यास न जुमानतां बदामीवर एकदम चाल केली. कांहीं लोकांनीं किल्ल्याच्या तटावर उभे असलेल्या लोकांवर गोळ्यांचा पाऊस पाडला, तर कांहीं सैनिक किल्ल्याच्या तटावर उभे अस-लेल्या शत्रूच्या लोकांस तटाच्याबाहेर व आंत झुगारून देऊं लागले. बाकीचें सर्व सैन्य निरनिराळ्या मार्गांनीं शिड्या लावून एकदम आंत घुसलें. शत्रूच्या लोकांनीं तेथून पळ काढला. ते बदामीच्या बाहेर जे दोन किल्ले होते त्यांत शिरले. वाटेंत पेशव्यांच्या लोकांनीं जे शत्रूंचे सैनिक पळत होते त्यांचा पाठलाग चालविला. शत्रूचे सर्वच लोक पळपुटे किंवा भ्याड होते असें नाहीं.

ह्यांपैकीं कांहीं लोकांनीं तटावरून किल्ल्यांत पेशव्यांच्या सैन्यावर मोठमोठे दगड लोटले. बंदुकांचा व तोफांचा सारखा मारा चालविला. पेशव्यांच्या सैन्यानें त्याची बिलकूल पर्वा न करितां बदामी किल्ल्यांतील गढी व बदामीच्या तटासह बाहेरील दोन किल्ले काबीज केले. किल्लेदार शरण आल्यामुळें त्यास जीवदान दिलें. बदामीवर पंत प्रधानांचा विजयध्वज फडकाविला.

पेशव्यांनीं बदामीचा किल्ला हस्तगत केला ही बातमी ऐकून टिप्पू अति संतप्त झाला. त्यानें आपल्या सैन्याची जय्यत तयारी करून तो मरा-ठ्यांच्या सैन्यावर निघाला. परंतु सावनूरच्या मैदानांत मराठ्यांच्या सैन्याचा तळ, त्यांच्या तोफा, दारूगोळा पहातांच त्याचें धैर्य खचलें. त्याचे हातपाय

गळाले. तेव्हां त्यानें तुकोजी होळकरास मध्यस्थ घालून खालीलप्रमाणें मराठ्यांशीं सन १७८७ त तह केला:—

(१) टिपूनें मराठ्यांस कित्तूर, नरगुंद, आणि बदामी हे तीन किल्ले द्यावेत.

(२) लढाईच्या खर्चाबद्दल टिपूनें मराठ्यांस ४५ लक्ष रुपये द्यावेत.

(३) सावनूरच्या नबाबास टिपूनें आपल्या राज्यांतील कांहीं भाग द्यावा.

टिपूनें मराठ्यांशीं तह केला खरा. परंतु भर उमेदींत असलेल्या टिपू सुलतानाला हा आपला अपमान झाला असें वाटून तो मनांतल्या मनांत सारखा जळफळूं लागला. परंतु हैदर आणि टिपू हे पराक्रमी होते, दृढनिश्चयी होते, हिकमती होते; परंतु त्या दोघा बापलेकांच्या ठायीं मुत्सद्दीपणाचा पूर्ण अभाव होता. योद्धयाच्या अंगीं वरील सर्व गुण आहेत आणि मुत्सद्दीपणा नाहीं तर वरील सर्व गुण मातिमोल होऊन जातात.

आतांपर्यंत एकटे मराठेच टिपूचे शत्रू होते; परंतु आतां त्यानें निजामाशीं शत्रुत्व केलें. तुमचा आमचा शरीरसंबंध व्हावा म्हणून त्यानें निजामाला शिष्टाचाराचीं पत्रें लिहिलीं, शिष्टमंडळें पाठविलीं, परंतु टिपू सुलतानाचें कुळ हलकें आहे अशा समजुतीनें निजाम टिपूशीं शरीरसंबंध करण्यास बिलकूल राजी नव्हता. अखेर टिपू निजामाला शरीरसंबंध करण्याबद्दल धमकीचीं पत्रें पाठवूं लागला. या कारणानें निजामाचें व त्याचें बरें नव्हतें. इंग्लिशांचा मित्र जो त्रावणकोरचा राजा त्याजवर टिपू नेहमीं हल्ले करी. या कारणानें त्याचें व इंग्लिशांचें वैमनस्य होतें.

सावनूरच्या तहान्वयें टिपूनें कित्तूर मराठ्यांस दिलें होतें; परंतु आतां त्यानें एकदम कित्तुरावर हल्ला करून तें त्याजपासून हिसकून घेतलें. पुण्यास

कारभाऱ्यांस ही बातमी कळली. नाना फडणविसास टिपूचें व निजामाचें आंतून शत्रुत्व आहे ही गोष्ट माहीत होती. त्यांनीं निजामास व इंग्लिशांस पुणें मुकामीं पाचारण केलें. त्या तिघांनीं सर्वांचा शत्रु जो टिपु सुलतान त्याचा उच्छेद करण्याचा बेत केला. वरील तिघांचा आपसांत असा करार झाला कीं, वरील त्रिवर्गांनीं मिळून टिपूवर स्वारी करावी. टिपूकडून जो मुलूख व जी खंडणी येईल ती तिघांनीं सारखी वांटून घ्यावी. शिवाय स्वतंत्र रीतीनें कोणीं मुलूख मिळविल्यास तो ज्याचा त्यानें घ्यावा.

मराठ्यांनीं आपल्या संयुक्त सैन्याचें आधिपत्य परशरामभाऊ पटवर्धन यास दिलें. निजामानें आपल्या सैन्याचें आधिपत्य स्वतःच पत्करलें. इंग्लिशांनीं आपल्या सैन्याचें आधिपत्य कॅप्टन लिट्ल ह्यास दिलें.

परशरामभाऊ दहा हजार स्वार व तीन हजार पायदळ घेऊन पुण्याहून निघाले. ते इ. स. १७९० च्या ऑगस्ट महिन्याच्या अकराव्या तारखेस कृष्णा नदी उतरले आणि वाटेनें लहानसहान ठाणीं घेत घेत १८ व्या तारखेस धारवाडचा किल्ला व शहर ह्यांवर हल्ला केला. धारवाडच्या किल्ल्यावर बदरीजमालखान हा किल्लेदार होता. भाऊंचा वडील पुत्र रामचंद्र अप्पा हा भाऊच्या मदतीस आला. ह्या धारवाडच्या लढाईत इंग्लिश व मराठे मोठ्या शौर्यानें लढले. कॅ० लिट्ल ह्यांनीं तटावर चढून मोठ्या शौर्यानें ती पेठ हस्तगत केली. परंतु ह्या लढाईत त्यांस जबर जखमा लागल्यामुळें त्यांनीं किल्ला रामचंद्र आप्पाच्या स्वाधीन करून ते छावणींत निघून गेले. पुढें बदरीजमालखानानें पेशव्यांच्या सैन्याशीं मोठी भयंकर लढाई करून रामचंद्र अप्पासाहेबाकडून तो किल्ला पुनः घेतला. परंतु रामचंद्र अप्पानें पुनः भयंकर लढाई करून बदरीजमालखानाकडून तो किल्ला परत घेऊन त्या किल्ल्यावर मराठ्यांचा झेंडा रोंविला.

बदरीजमालखान मोठा शूर व धाडशी होता. भाऊ धारवाडाहून पुढें कूच करीत असतां बदरीजमालखानानें पांच हजार लोकां-

निशीं भाऊंवर छापा घातला. भाऊ व त्यांचे लोक सावध होतेच. त्यांनीं बदरीजमालचे पुष्कळ सैनिक ठार केले. बदरीजमाल घायाळ होऊन पळत असतां त्यास पकडून आपल्याबरोबर घेतलें आणि त्याच्या जवळील द्रव्य, धान्यसामुग्री व युद्धसामुग्री हस्तगत केली. नंतर परशरामभाऊनें जवळचा कुशाळगड नामक किल्ला हस्तगत केला.

इकडे लॉर्ड कॉर्नवालीस ह्यांनीं श्रीरंगपट्टणावर स्वारी करून त्या किल्ल्यास वेढा घातला. परंतु टिपु सुलतानानें श्रीरंगपट्टणच्या व म्हैसूरच्या आसपासचा मुलूख जाळून टाकला. इंग्लिशांजवळची धान्यसामुग्री व वैरण सर्व खलास झाली. इंग्लिशांच्या सैनिकांचे प्राण अन्नावांचून पटापट जाऊं लागले. त्यांनीं धारवाडाहून परशरामभाऊस दाणावैरण पाठविण्यास निकडीचीं पत्रें पाठविलीं व इकडे नाना फडणविसासहि पुण्याहून धान्यसामुग्री व दाणावैरणीची मागणी केली. धारवाडाहून व पुण्याहून धान्यसामुग्री व दाणावैरण पाठविली गेली व भाऊंनीं व नानांनीं ही बातमी लॉर्डसाहेबांस पोंचविण्याकरितां स्वारांच्या दोन टोळ्या म्हैसुराकडे ताबडतोब पाठविल्या. परंतु त्या स्वारांच्या टोळ्या वाटेंतच टिपूच्या पेंढाऱ्यांनीं व बेरडांनीं कापून काढिल्या. त्यामुळें नानांची बातमी लॉर्डसाहेबांस कळली नाहीं. नंतर थोड्याच दिवसांनीं परशरामभाऊ आपलें सैन्य, धान्य-सामुग्री व वैरण घेऊन लॉर्ड साहेबांस येऊन मिळाले. भाऊ येतांच इंग्लिश सैन्यास पराकाष्ठेचा आनंद झाला. भाऊ आल्याबरोबर त्यांनीं मरणोन्मुख झालेल्या इंग्लिश सैन्यास पोटभर अन्न चारलें व सहस्रावधि लोक काळाच्या दाढेंतून काढले. इतक्यांत पुण्याहून नाना फडणविसांनीं पाठविलेली मदत येऊन पोंहोचली व हरीपंततात्याचें सैन्यहि लॉर्ड साहेबांच्या मदतीस येऊन दाखल झालें. हरीपंत तात्याचें सैन्य येतांच लॉर्ड कॉर्नवालिस यांस उमेद येऊन त्यांनीं टिपूस श्रीरंगपट्टणांतून हाकून देऊन त्यास वेढा घातला.

इंग्लिशांचें, पेशव्यांचें व भाऊचें असें त्रिवर्गांचें सैन्य श्रीरंग-पट्टणास राहिल्यास लौकरच धान्य-सामुग्री व वैरण यांचा तुटवडा पडून

सर्वांसच उपासमारीनें मरण येईल म्हणून इंग्लिश व तात्या यांच्या विचारानें भाऊ कॅ. लिट्ल यांस त्याच्या सैन्यासह बरोबर घेऊन म्हैसूरच्या उत्तरेकडील मुलूख जिंकीत चालले. मध्यें अत्यंत शूर म्हणून गाजलेल्या ३०० लोकांच्या टोळीनें भाऊवर हल्ला केला. भाऊनें त्यांतील बहुतेक लोकांस ठार मारून जवळच असलेल्या चित्रदुर्ग किल्ल्याकडे मोर्चा फिरविला. चित्रदुर्ग किल्ला दुर्भेद्य असून शिवाय त्या किल्ल्यावरील बंदोबस्त पक्का आहे हें जाणून भाऊंनीं तो किल्ला काबीज करण्याचा नाद सोडून देऊन पुढें कूच केलें. नंतर भाऊनें बेदनूर प्रांत हस्तगत केला व नजीकचा होळीआनोर किल्ला लढून घेतला. नंतर तुंगभद्रा नदीच्या कांठानें जात असतां शिमोगा किल्ला लागला. तो काबीज करण्याकरितां भाऊनें त्या किल्ल्यास वेढा दिला.

इतक्यांत भाऊला बातमी लागली कीं, जवळच्या दाट झाडींत कोणी रेझासाहेब नांवाचा टिपूचा महान् पराक्रमी सरदार ८०० स्वार, ७,००० पायदळ व १० तोफा इतका सरंजाम घेऊन उतरला आहे. तेव्हां रेझासाहेबांची हालचाल पहाण्याकरितां भाऊंनीं आपला पुत्र रामचंद्र आप्पा व क्यापटन लिट्ल यांस तिकडे पाठविलें.

रेझासाहेब उतरला होता तें ठिकाण अति भयप्रद होतें. तें तुंगेच्या तटापासून कांहीं अंतरावर असून नजीक किर्र झाडी होती. उजव्या बाजूस तुंगा नदी, डाव्या बाजूला एक सुळक्यासारखी टेंकडी आणि अघाडीस व पिछाडीस बांबूची दाट झाडी होती. मागच्या बाजूनें मात्र थोडीशी वाट होती.

कॅप्टन लिट्ल व रामचंद्र परशराम ह्यांनीं रेझासाहेब व त्याचें उतरलेलें सैन्य ह्यांची फार बारकाईनें पहाणी केली. नंतर कॅप्टन लिट्ल व रामचंद्रअप्पा ह्यांनीं फैर झाडून पहिली सलामी दिली. रेझासाहेबानें ह्या

काळ्यागोऱ्या सैन्यावर बाणापाठीमागून बाण व गोळ्यापाठीमागून गोळ्या सुरूं केल्या. इकडे कॅप्टन लिट्ल व रामचंद्रआप्पा ह्यांनींहि बंदुकींच्या फैरी व तोफांचे गोळे रेझासाहेबांच्या सैन्यावर सोडले. भयंकर रणकंदन सुरूं झालें. दोहोंकडील शेंकडों लोक ठार झाले. शेंकडों लोक पाडाव झाले. इंग्रजी पलटणीवरील कित्येक कामगारहि जखमी झाले. रेझासाहेबानें कित्येक वेळां आप्पासाहेबांस मागें हटवावें; परंतु कॅ० लिट्ल व आप्पासाहेब ह्यांनीं पुनः रेझासाहेबांवर लगट करून सरशी करावी. असें चाललें होतें.

तिकडे भाऊनें शिमोगा किल्ला कबजांत घेऊन त्याच्या बंदोबस्ता-करितां आपले लोक ठेवून इकडे रामचंद्रआप्पा व रेझासाहेब यांचें युद्ध कसें काय चाललें आहे तें कौतुकानें पाहण्याकरितां आले.

इकडे रणांगणावर एकीकडे कॅ० लिटल व रामचंद्र आप्पासाहेब व दुसरीकडे रेझा हे जिवावर उदार होऊन लढत होते. रेझा हा वेगानें धांवत येऊन त्यानें रामचंद्रआप्पावर हल्ला केला आणि त्याला ठार करण्याविषयीं आपल्या लोकांस उत्तेजन दिलें. रेझासाहेबाचा हल्ला येतांच आप्पासाहेबानें जिवावर उदार होऊन हल्ला मागें परतविण्याचा दीर्घ प्रयत्न चालविला. परंतु ही गोष्ट आप्पासाहेबाच्या आवांक्याबाहेर आहे असें कॅ० लिट्ल यानें पाहून तो पुढें धांवला, आणि रेझासाहेबाला मागें हटवून त्याचा भयंकर परा-भव केला आणि ती जागा ताब्यांत घेतली.

इकडे पुण्याहून नाना फडणविसाचीं भाऊला पत्रांवर पत्रें येऊं लागलीं कीं, आतां पुढें कोठें न जातां श्रीरंगपट्टणास लॉर्ड कॉर्नवालीस-साहेब यांच्या मदतीस होईल तितक्या त्वरेनें जाऊन, टिपूची मोहीम शेव-टास न्यावी. शिवाय इकडे लॉर्ड कॉर्नवालिससाहेबांनींहि भाऊंच्या सहाय्या-शिवाय टिपूच्या वेढ्याचें काम शेवटास जात नाहीं, असें पक्कें समजून भाऊंनीं पट्टणास त्वरित येण्याविषयीं निकडीचे निरोप पाठविले. या कारणा-

स्तव भाऊंनीं तेथलें युद्ध थांबवून लॉर्ड कॉर्नवालिससाहेब यांस साहाय्य करण्याकरितां ते फौजेसह श्रीरंगपट्टणास आले.

इकडे श्रीरंगपट्टणाच्या किल्ल्यांत टिपू कोंडला गेल्यावर तो अगदीं दीन झाला आणि त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें भाऊशीं तह केलाः—

(१) आपल्या मुलुखांपैकीं निम्मा मुलूख निजाम, इंग्लिश व पेशवे ह्यांस द्यावा.

(२) एक कोटी पासष्ट लक्ष रुपये दंडादाखल रोख या तिघांच्या स्वाधीन करावे.

(३) आपले दोन मुलगे ओलीस द्यावे.

असा दक्षिणेंत दिग्विजय करून भाऊ पुण्यास आले.

भाऊच्या कपाळावरच विधीनें, एक पळाचीहि विश्रांति न मिळतां, लढाई लिहिली होती!!

पटवर्धन श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत गुंतले आहेत हें पाहून कोल्हापूरकरांनीं पेशव्यांच्या राज्यांत अतिशय दंगा माजविला. नानांनीं भाऊंस कोल्हापूरकरांचें पारिपत्य करण्याविषयीं आज्ञा दिली. भाऊंचे चिरंजीव रामचंद्रराव आप्पा ह्यांनीं कोल्हापूरकरांवर चालून जाण्याचा हट्ट घेतला. होय-नाहीं करतां करतां अखेर भाऊंनीं रामचंद्रआप्पास परवानगी दिली. रामचंद्रराव आप्पासाहेब ह्यांनीं आपल्याबरोबर भरपूर सैन्य व युद्धोपयोगी सामान घेऊन कडेकोट बंदोबस्तानें ते युद्धास निघाले. त्यांच्या सैन्याची व कोल्हापूरकरांच्या सैन्याची अळतेगांवाजवळ गांठ पडली. फिरंग्याचीं पलटणें गांवांत शिरतांच त्यांनीं पेठा लुटण्यास सुरवात केली. जनार्दनपंत सुभेदार ह्यांनीं तोफांचा भडिमार चालविला. रामचंद्ररावआप्पांनीं एकसारखी गोळ्यांची व बाणांची वृष्टि करून कोल्हापूरकरांच्या सैन्यास जर्जर केलें. कोल्हापूरकरांस ह्या लढाईची हकीगत कळतांच त्यांनीं सर्जेराव घाटग्याच्या हाताखालीं पुष्कळ सैन्य व भरपूर युद्धोपयोगी सामान देऊन सर्जेराव घाटग्याच्या मदतीस

रत्नाकरपंत दिवाण ह्यांस दिलें. कोल्हापूरकरांचें सैन्य रामचंद्रावआप्पावर तुटून पडलें. ह्या झटापटींत आप्पासाहेबांच्या डोक्यास बंदुकीची गोळी लागून मोठी जखम झाली. त्याच्या योगानें ते घायाळ होऊन पडले. कोल्हापूरकरांनीं शिरगांवपर्यंत पटवर्धनांच्या सैन्याचा पाठलाग केला. विठ्ठल धोंडदेव आणि बाबा फडणीस ह्यांनाहि या लढाईत भयंकर जखमा लागल्या. सर्जेराव घाटग्यानें आप्पासाहेबांस पालखींत घालून कोल्हापूरच्या महाराजांकडे नेलें.

महाराजांनीं आप्पाचा बहुमान करून त्यांस वस्त्रें दिलीं व पांच गांव बक्षीस दिले. ही बातमी भाऊंस कळतांच हा कोल्हापूरकरांनीं आपला अपमान केला असें त्यांच्या मनानें घेतलें. मग भाऊंनीं सैन्य जमा केलें. त्यांत गंगाधर गोविंद पटवर्धन, बाबासाहेब पटवर्धन, रघुनाथराव नीळकंठ पटवर्धन आणि चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन इ० योद्धे होते.

कृष्णेच्या पलीकडे गेल्यावर उदगांव येथें भयंकर संग्राम सुरूं झाला. गंगाधर गोविंद पटवर्धन यांनीं सारखा तोफांचा भडिमार कोल्हापूरकरांवर चालविला. टेंबलाईच्या माळावर कोल्हापूरकरांची पुष्कळ नासाडी झाली. नंतर कोल्हापूरकरांनीं भाऊंशीं खालीलप्रमाणें तह केला:—

कोल्हापूरकरांनीं तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी. त्यांनीं पुनः दंगाधोपा माजवूं नये म्हणून दोन सरदार ओलीस द्यावे.

सन १७९२त महादजी शिंदे यानें आपलें अवाढव्य कवायत शिकलेलें लष्कर, फ्रेंच योद्धयांकडून तयार केलेला तोफखाना, इ० सैन्य घेऊन वानवडीवर तळ दिला. नाना फडणवीस यांनीं भाऊला तांतडीचा निरोप पाठविला कीं, आपण आपलें सैन्य, तोफखाना घेऊन यावें. त्याप्रमाणें भाऊ आपल्या सर्व सैन्यानिशीं पुण्यास आले. नानाला असा संशय आला कीं, हा महादजी श्रीमंत सवाई माधवराव पेशवे ह्यांना फितवून आपणांस कैद करील.

महादजी शिंदे ता. १२ फेब्रुवारी स. १७९४ इ० रोजीं नवज्वरानें मरण पावला. अर्थात् नानाची भिती नाहींशी झाली. महादजी शिंदा मेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं परशुरामभाऊच्या बरोबरीचा व टिपूच्या लढायांमध्यें ज्यानें अतोनात पराक्रम करून भाऊस परमावधीचें साह्य केलें तो हरीपंत तात्या फडके स. १७९४ त रोजीं मृत्यू पावला. हरीपंताच्या मृत्यूनें नानाचा उजवा हात गळाला. हरीपंत वारल्यावर त्याची सरदारकी त्यांचे चिरंजीव बाबा फडके यांस मिळाली.

खर्ड्याची लढाई. बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाई मिळतांच त्यांनीं चौथाई व सर देशमुखी या बाबीकरितां निजामाच्या मुलखावर स्वाऱ्या करून निजामावर ती बाब लादली. पुढें थोरले बाजीरावापासून थोरले माधवरावाच्या अखेरीपर्यंत निजामाशीं ज्या ज्या पेशव्यांच्या भयंकर व आणीबाणीच्या लढाया झाल्या त्या सर्वांचें मुख्य कारण निजामावर लादलेली चौथाई व सरदेशमुखी ही बाब होय.

नारायणरावाच्या खुनापासून ते टिपूच्या इ. सन १७९२ च्या लढायांपावेतों कारभाऱ्यांस निजामाशीं खंडणी मागण्याचा अवसरच मिळाला नाहीं. आतां मात्र नाना फडणविसानें पेशव्यांचे निजामच्या दरबारीं असलेले वकील गोविंदराव काळे यांच्या मार्फत निजामाला चौथाई व सरदेशमुखी-बद्दल तगाद्यांवर तगादे लावले. निजामानें याचा दोन महिन्यांनीं, चार महिन्यांनीं निकाल करतों अशा गोविंदराव काळ्यास थापा दिल्या व गुप्त रीतीनें त्यानें लढाईची तयारी चालविली. गोविंदराव काळे निजामा-कडील हकीगत वरचेवर पुणें दरबारीं कळवीत असत. अखेर गोविंदराव काळे यांनीं निजामास तावडतोब तीन कोटी तीस लक्ष रुपये चौथाई व सरदेशमुखीबद्दल द्यावे म्हणून मागणी केली. आतां मात्र निजाम उघडपणें गोविंदराव काळ्यास उलट्या गोष्टी सांगूं लागला. त्यानें वऱ्हाडच्या उत्प-न्नाची वांटणी नागपूरकर भोसल्यास देण्याचें बंद केलें व मराठे सरदारांस

पेशव्यांविरूद्ध फितुर करण्याचा प्रयत्न चालविला. त्यानें मुसारेमू ह्या युरोपियन योद्धयाकरवीं २३ कवायती पलटणें तयार करविलीं. निजामाची एकंदर फौज, घोडेस्वार व पायदळ मिळून एक लक्ष दहा हजार होती. निजामानें आपला तोफखाना अगदीं सज्ज करून ठेवला. बंदुकीचीं काडतुसें, तोफांस लागणारी दारू यांचा भरपूर सांठा केला. भरपूर वैरण, धान्यसामुग्रि, चार पांच हजार बैलगाड्या इ० व्यवस्था केली. अशी युद्धाची तयारी इकडे केली असून धूर्त निजामानें पुणें दरबारीं समेटाचीं बोलणीं चालूं ठेवलींच होतीं. पुणें दरबारनें आपल्या सर्व सरदारांस सैन्य घेऊन बोलाविलें.

इकडे पुणें दरबारानेंहि जारीनें युद्धाची तयारी चालविली. महादजी शिंदे यांनीं आपली सर्वच फौज पुण्यास आणिली नव्हती. ह्यानें आपली निमी फौज उत्तर हिंदुस्थानांत जिवबादादा बक्षी केरकर याच्या ताब्यांत ठेवली होती. नानांनीं ती फौज दौलतराव शिंद्याकडून पुण्यास आणविली. शिंद्याची जी फौज पुण्यास होती तिची डिबाईन नामक योद्धयानें कवायतीची उजळणी घेऊन उत्तम प्रकारची तयारी करविली. शिवाय पेशव्यांची जी फौज पुण्यास होती ती बॉईड नामक नोकराकडून कवायत वगैरे शिकवून तयार कराविली. शिंद्यानें आपल्या सर्व फौजेची कवायत गुलटेकडीजवळ श्रीमंतांस व नानास करून दाखविली. ता. ८ नोव्हेंबर इ. सन १७९४रोजीं निजाम आपले सर्व फौजेसह बेदरहून निघून मांजरा नदीच्या काठाकाठानें मराठ्यांच्या मुलखाकडे येऊं लागला. श्रीमंतांची स्वारी नानासह मोहिमेवर जाणार होती. बाजीराव, चिमणाजी आप्पा व अमृतराव हे आनंदवल्लीस होते. ते श्रीमंतांच्या व नानाच्या पश्चात कांहीं कारस्थान करतील म्हणून नानांनीं त्या त्रिवर्गास शिवनेरी किल्ल्यांत ठेवून तेथें मोठा बंदोबस्त करून ठेविला. प्रथम हुजरात गारपिरावर डेरेदाखल झाल्यानंतर ८ डिसेंबरास नाना व १४ डिसेंबरास खुद्द श्रीमंत डेरे दाखल झाले. तुकोजी होळकर दहा हजार फौजेसह पुण्यास दाखल झाले. स्वारीस निघण्यापूर्वीं श्रीमंतांनीं

जवाहिरखाना, जामदारखाना वगैरे सर्व सिंहगडावर ठेविलें. नंतर रघोजी भोंसले हे पंधरा हजार सैन्यासह श्रीमंतांस येऊन मिळाले. रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, माळेगांवकर जाधव, राजेबहाद्दर, घोरपडे, पाटणकर, पंतप्रतिनिधि, निंबाळकर, वाघोलीकर जाधव इत्यादि सरदार आपापल्या सैन्यांसह पुण्यास श्रीमंतांस येऊन मिळाले. गोविंदराव गायकवाडानें आपलें दहा हजार सैन्य आपल्या सेनापतीबरोबर पुण्यास रवाना केलें. नानांनीं प्रत्येक सरदाराचा सल्ला या मोहिमेविषयीं विचारला होता. नंतर सर्व लष्कर एकाच मार्गानें न जातां दाणावैरणीच्या सोयीसाठीं निरनिराळ्या मार्गांनीं कुच करीत चाललें होतें. तिकडे निजाम बेदराहून धारुरास येऊन तेथून परांड्याच्या बाजूनें निघाला. त्याच्या एका टोळीनें जोगाईचें आंबें या क्षेत्राचा विध्वंस केला; दुसरीनें बारसी, पानगांव वगैरे गांवें लुटलीं. याचें उट्टें काढण्यासाठीं मराठ्यांच्या पेंढाऱ्यांनीं निजामाच्या मुलुखांत लुटालूट चालविली. श्रीमंतांनीं आपला मुक्काम पुण्याहून दौंडास व दौंडावरून नगरास नेला. वाटेंत खडकत येथें जिवबादादा बक्षी हे उत्तर हिंदुस्थानांतील शिंद्यांची फौज घेऊन आले. दहा हजार कवायती कंपूवर ते मुख्य असून त्यांच्या हाताखालीं मुसापेरों होता. शिंद्याचें घोडदळ पंधरा हजार असून तें देवजी गवळ्याच्या हाताखालीं होतें. सर्व सरदारांची व खुद्द पेशव्यांच्या सैन्याची संख्या एकंदर एक लक्ष तेरा हजार झाली. निजाम मोहरीचा घाट उतरून खर्ड्याच्या किल्ल्यानजीक खैरा नदीवर येऊन उतरला. तेव्हां शिंदे व भोंसले यांचा श्रीमंतांस निरोप आला कीं, नबाब खैरा नदीवरून उठून परांड्याच्या रोखें निघून जाणार. तसें झाल्यास मसलत लांबणीवर पडेल. तरी त्यास अडविण्यास आम्ही त्याजवर जातों. ही मसलत श्रीमंत व नाना ह्यांना पसंत पडून त्यांनीं परशराम भाऊबरोबर आणखी फौज व तोफा देऊन त्यांस आघाडीवर पाठविलें. अघाडीच्या सर्व सरदारांस त्यांनीं आणखी असा हुकूम केला होता कीं, फौजेच्या

हालचाली व मसलती सर्व भाऊंच्या आज्ञेप्रमाणें कराव्या. ५ मार्च १७९५ रोजीं बाबा फडके भाऊला येऊन मिळाले. नंतर शिंद्यांचा सेनापती जिवबा-दादा बक्षी शिंद्याची सर्व फौज घेऊन भाऊंस येऊन मिळाला. नंतर लगेच नागपूरकर भोंसले व होळकर हे भाऊस आपल्या सैन्यांसुद्धां सामील झाले. ता. १२ मार्च १७९५ बुधवारीं प्रातःकाळींच खर्ड्यास भयंकर रणकंदन होणार अशीं चिन्हें दृष्टीस पडूं लागलीं. निजाम खर्ड्याहून निघून परांड्यास जाण्यास निघाला. हें पाहून भाऊ हे फडके, शिंदे, होळकर व नागपूरकर भोंसले यांच्यासह त्याजवर चालून गेले. भोंसले हे भाऊच्या उजवीकडे व शिंदे डावीकडे होते. मराठ्यांचें सैन्य लढाईच्या तयारीनें कडेकोट बंदोबस्तानें उभें राहिलें. जवळ एक टेंकडी होती. तिच्यावर चढून जाऊन हें सैन्य निजामाच्या सैन्याची टेहळणी करूं लागलें. इतक्यांत नबाबाकडील सरदार असदअल्लीखान व भारामल्ल हे रेमंडच्या सत्रा हजार कवायती सैन्यांसह भाऊवर चालून आले. त्याची व भाऊची झटापट झाली. त्यांत भाऊंस उजव्या बाहुट्यावर व कपाळावर तरवारीचे वार बसून सर्व अंग रक्तबंबाळ झालें व भयंकर जखमा झाल्या. त्यानंतर लालखान नांवाच्या एका मुसलमान सरदारानें त्यांचा घोडा मारून पट्टयाचे वार चालविले. भाऊंनीं पाहिले दोन वार आपल्या पट्टयानें चुकविले; पण लालखानाच्या तिसऱ्या वारानें त्यांच्या पट्टयाचा खोबळा तुटला व ते निःशस्त्र झाले. इतक्यांत भाऊचे चिरंजीव रामचंद्र अप्पा यांनीं लालखानास तो भाऊंवर चवथा वार करीत असतांना ठार केलें; परंतु त्याच्या सैन्याच्या मदतीस अफीलखान कर्नूलकर व सलाबतखान एलीचपूरकर हे आले व त्यांनीं मराठ्यांस मागें हटविलें व भाऊ उभे होते ती टेंकडी काबीज केली. या लढाईत विठ्ठलराव पटवर्धन ठार झाले. इकडे मुसा रेमूचीं पलटणें व मोंगलांची इतर फौज यांनीं भाऊंच्या डाव्या बाजूस असलेल्या शिंद्यावर चाल केली. त्यावेळीं शिंद्याच्या फौजेनें मोंगलावर तोफांचा भयंकर भडी-

भार केला. पेरॉ यानें आपल्या ३५ तोफा एका टेंकडीवर ठेवल्या होत्या. तेथून त्यांची सरबत्ती मोंगलांवर केली. ह्याचवेळीं भोंसल्याकडूनहि रेमूवर बाणांची सारखी वृष्टि सुरू झाली. रेमूवर उजवीकडून व डावीकडून भयंकर मारा होऊं लागल्यामुळें तो मागें हटूं लागला. शिंद्याकडील लोकांनीं नबाबाचें तोंड मागें सारलें. तेव्हां सर्व मराठे एक होऊन नबाबावर चालून गेले. सरकारची हुजरातसुद्धां चाळीस हजार तरवार उठली. नबाबाच्या फौजेवर बंदुकींचा भडीमार अपूर्व झाला. नबाबाचे बहुतेक सैनिक ठार झाले. जिवबादादा बक्षी यांनीं तीनशें तोफांचा खटारा पुढें लावला आणि बावीस हजार नळी पलटणाची उभी केली. तोफांचा धडाका सुरू झाला. संध्याकाळचा दिवस ६ घटका राहिला. मग पानसे ह्यांनीं १७ मोठ्या तोफा पुढें आणल्या. एकेक तोफ एवढी मोठी होती कीं, प्रत्येक तोफेस ओढावयास २०० बैल लागत असत. पानशांनीं आपल्या मोठ्या तोफा सुरू केल्या. नंतर काळोख पडला. मराठ्यांच्या सैन्यानें मशाली व हवाया लावून लढाई चालविली. विठ्ठलपंत सुभेदार यांनीं बाणांचें छत करून निजामाच्या सैन्यावर सोडलें. तिकडे निजामहि मोठ्या आवेशानें लढत होता. मराठ्यांनीं हरहर महादेव अशी गर्जना करून निजामाच्या सैन्यावर हल्ला केला. निजामाकडील पठाण लोकांनीं मराठ्यांवर उलट हल्ला करून पुष्कळ मराठे ठार केले. भयंकर रणकंदन माजलें. इतक्यांत निजामानें आपला हत्ती खर्ड्याच्या किल्ल्याकडे वळविला. मश्रुल्मुल्कहि लढाई टाकून देऊन पळाला. आपला धनी पळाला हें पाहून निजामाचें सैन्य जिकडे वाट सांपडेल तिकडे पळूं लागलें. मराठ्यांनीं त्याचा पाठलाग करून सातशें आठशें घोडे पाडाव केले. निजामाकडील युरोपियन योद्धा रेमंड यानें आपल्या उत्तम कवाईत शिकविलेल्या तेवीस पलटणी मराठ्यांपुढें उभ्या केल्या. त्यानें आपल्या सैन्याभोंवतीं मशाली, टेंभे, हवया, भुईनळे इत्यादिकांच्या प्रकाशांत मराठयांशीं लढाई चालविली. मराठयांकडील युरोपियन

योद्धा पेरॉन हा आपलें कवायती सैन्य घेऊन त्यास सामना देण्यास सिद्ध झाला. उभयतांच्या कवायती सैन्याची भयंकर लढाई झाली. उभयपक्षीं हजारों वीर रणांगणों पतन पावले. तरी रेमंडनें धीर खचूं न देतां युद्ध चालविलें.परंतु त्यास दारूगोळ्याची वगैरे कांहीं मदत नव्हती. इकडे पेरॉनला दारूगोळ्याची वगैरे कशाचीच कमतरता नव्हती. शिवाय पेरॉनच्या पाठीशीं पटवर्धन, रास्ते, त्यांचे मालक शिंदे, भोंसले, गायकवाड वगैरे योद्धे आपापल्या सैन्यानिशीं तयार होते. अखेर रेमंडचें धैर्य खचून तो रणांगणांतून निघून गेला. शिंद्याच्या कंपूची मारगिरी सकाळच्या चार घटका दिवसापासून रात्रीच्या बारा घटकांपर्यंत निजामाच्या सैन्यावर चालली होती. गायकवाड, घोरपडे, जाधव, राजेबहादूर, नागपूरकर भोंसले, विंचूरकर, पाटणकर, प्रतिनिधि ह्या वीरांनीं काडीचीहि कसूर न करितां मोठया शौर्यानें रणांगणीं झुंज केली. मराठयांच्या पेंढाऱ्यांनीं निजामाचें लष्कर चोहोंकडून घेरून लुटून फस्त केलें. तेव्हां निजाम घाबरून खर्ड्याच्या गढींत शिरला. निजामाच्या तोफा, दारूगोळ्याच्या सुमारें ४०० गाड्या, धान्य, वैरण वगैरे सामान मराठयांच्या हातीं लागलें. दुसऱ्या दिवशीं मराठयांनीं गढीस वेढा दिला. आंत निजामाचें अन्नपाण्याशिवाय हाल होऊं लागले.

वर सांगितल्याप्रमाणें निजामाचें सर्व धान्य–वैरण लुटल्यामुळें त्याच्या सैन्याची अन्नपाण्यावांचून फारच दशा झाली. शिवाय विहिरी, तलाव, ओढे वगैरेंवर मराठयांचे पहारे बसले. निजामाच्या सैन्यास एक वाटीभरसुद्धां पाणी मिळेना. निजामाच्या लष्करास एक रुपयास अच्छेर धान्य व वाटीभर पाण्यास एक रुपया पडूं लागला ! खर्ड्याच्या गढीस मराठयांनीं वेढा दिल्यामुळें आंतल्या मनुष्यांस बाहेर येतां येईना व बाहेरल्या मनुष्यांस आंत जातां येईना. खुद्द निजामास व त्याच्या बरोबर जीं पंचवीस तीस मनुष्यें आंत गेलीं होतीं त्यांसहि अन्नपाणी मिळेना. अन्नपाण्यावांचून त्यांचे प्राण कासावीस होऊं लागले. मराठयांनीं पुनः त्या किल्ल्यावर तोफा डागण्यास

प्रारंभ केला. तेव्हां निजामाकडून बोलणें आलें कीं, आम्ही तोफा डागीत नाहीं, तुम्हींहि तोफा बंद कराव्या. पुढें निजाम व मराठे यांचा खालील-प्रमाणें तह झाला:—

(१) पूर्वी सदाशिवराव भाऊंनीं उदगीरच्या लढाईत जिंकलेला मुलुख होता त्यांपैकीं परांड्यापासून तहत तापी नदीपर्यंतचा जितका मुलूख गेल्या ३५ वर्षांत निजामास परत देण्यांत आला असेल तो सर्व त्यानें पेशव्यांना तसाच परत द्यावा.

(२) गंगथडीमध्यें घांसदाण्याचा भोंसल्यांचा हक्क आहे त्याबद्दल भोंसल्यांस निजामानें ३ लाख १८ हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून द्यावा. तसेंच भोंसल्याची वऱ्हाडच्या वांटणीपैकीं बाकी तुंबली आहे, तीबद्दल त्यास निजामानें २९ लक्ष रुपये द्यावे; व पुढें वऱ्हाडांत भोंसल्याचा अंमल पूर्ववत् चालू ठेवावा.

(३) चौथ व सरदेशमुखीच्या बाकीबद्दल निजामानें पेशव्यांना तीन कोटी रुपये द्यावे.

(४) मशीर-उल्–मुल्क यांस पेशव्यांच्या स्वाधीन करावें.

मग तहाच्या यादीवर परस्परांची मखलाशी होऊन निजाम भागानगरास गेला, व मशीर–उल्–मुल्क व सर्व सरदारांसह श्रीमंत पुण्यास आले.

खर्ड्याच्या लढाईत पटवर्धनांनीं जो पराक्रम केला, त्याबद्दल श्रीमंत खुष होऊन त्यांनीं परशरामभाऊ व त्यांचे बंधुवर्ग (चिंतामणराव आणि रघुनाथ निळकंठ) यांस १७९५ सालीं सनद करून दिली. एकंदर सरंजाम २५,५२,१०० रुपयाचा असून २१,९३,२७७-६-६ चा मुलूख लावून दिला. याच सालीं चिंतामणराव पांडुरंग यांस नवी सनद व नवा तैनात जाप्ता मिळाला.

श्रीमंत पुण्यास आल्यावर त्यांनीं सर्व सरदारांस आपापल्या जहागिरींत जाण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणें सर्व सरदार आपापल्या जहागिरीस निघून गेले.

येथून पुढें मात्र मराठी साम्राज्याच्या ऱ्हासास प्रारंभ झाला. सवाई माधवराव पेशवे हे भ्रमिष्टासारखे वागूं लागले. त्यांनीं १७९५ सालच्या दसऱ्याच्या दिवशीं शनिवारवाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी टाकली. नंतर तिसरे दिवशीं ते मरण पावले. दौलतराव शिंदे अर्धी मजल गेला होता त्यास मुद्दाम सांडणीस्वार पाठवून नाना फडणवीस ह्यानीं सैन्यासह परत बोलाविलें. परशरामभाऊ पटवर्धन आपले जहागिरीचे गांवीं तासगांवास गेले होते. त्यांस नानांनीं सैन्यासह परत बोलाविलें. त्याप्रमाणें भाऊ आपल्या सर्व सैन्यासह पुण्यास आले. नानाचें मन फारच गोंधळून गेलें. आपण जर शिंद्याच्या विचाराशिवाय बाजीरावास गादीवर बसविलें तर शिंद्याचा दिवाण बाळोबा तात्या हा बाजीरावास मिळवून घेऊन आपला व आपल्या सर्व मित्रांचा बाजीरावाकडून नाश करवील. शिंद्याच्या विचारानें बाजीरावास गादीवर बसविलें तर सर्व राज्यामध्यें शिंद्याचें प्रस्थ वाढून आम्हास (नाना फडणविसास) तो आपल्या हातचें खेळणें करील. अखेर परशरामभाऊ पटवर्धनाकडून शिवनेरी किल्ल्यांतून बाजीराव, चिमाजीआप्पा व अमृतराव यांस पुण्यास बोलावून आणविलें. नंतर नानांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें ठरविलें. बाळोबा तात्या कुंजीरास हें नानांचें कारस्थान कळतांच त्यांनीं कंपुवाल्याची सर्व फौज पुण्यावर आणिली. नानांस हें कळतांच त्यांनां पळून जाण्याची तयारी केली. परशरामभाऊ पटवर्धनास हें कळतांच त्यांनीं नाना फडणविसाची भेट घेतली व त्यांस आश्वासन दिलें कीं, 'सर्व पटवर्धन मंडळी व आमचें सैन्य ह्याच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत आम्ही तुमच्या केंसासही धक्का लागूं देणार नाहीं. शिवाय धैर्य धरून फौज जमा करूं व शिंद्याचा पराभव करूं ' अशाबद्दल भाऊंनीं पुष्कळ सांगितलें; परंतु नाना भित्रे अस-

त्यामुळें त्यांचा धीर सुटला. * परशरामभाऊंच्या हितोपदेशावर व त्यांच्या ३५ वर्षांच्या स्नेहपणावर पाणी सोडून नानांनीं बाजीरावाला भाऊंच्या स्वाधीन केलें व ते पुरंदराहून सातार्‍यास पळून गेले.

शिंद्याचे दिवाण बाळोबा तात्या कुंजीरपुढें भाऊ यांचा विचार ठरला कीं, सवाई माधवराव यांचें कुटुंब यशोदाबाई यांच्या मांडीवर चिमाजी आप्पास बसवून त्यास पेशवा बनवावा. बाळोबानें बाजीरावास कैद करून आपल्या लष्करांत आणून ठेवलें व चिमाजी आप्पास पुण्यास आणून भाऊंनीं दत्तविधान करविलें. त्यांनीं सातार्‍याहून पेशवाईचीं वस्त्रें आणवून चिमाजी माधवराव ह्यांस पेशव्यांच्या गादीवर बसविलें व आपण पंत प्रधानाचे मुख्य दिवाण झाले. ही गोष्ट ता. २६ मे सन १७९६ रोजीं घडली.

नाना फडणविसाच्या मुत्सद्दीपणाविषयीं व राज्यकारभाराच्या चातुर्याविषयीं भाऊची पूर्ण खात्री असल्यामुळें भाऊंनीं नानास सातार्‍याहून पुण्यास येण्याविषयीं नानाप्रकारें विनवण्या केल्या, त्यांच्या भेटी घेतल्या, परंतु शुद्ध अंतःकरणाच्या व निष्कपटी भाऊंवर नाना फडणविसाचा भरंवसा बसेना. तेव्हां भाऊंच्या मर्जींतून ते अगदींच उतरले. अखेर दोघांचें शत्रुत्व बेसुमार वाढलें. एकदां तर रागाच्या भरांत भाऊंनीं नाना फडणविसांचा वाडा जप्त करून आंतील ४० लक्ष रुपयांचें कापड दसर्‍याच्या दिवशीं सर्वांस वांटून टाकलें.

अखेर नानास धरण्याकरितां भाऊंनीं आपले चिरंजीव हरिपंत पटवर्धन यांच्या स्वाधीन ४,००० फौज केली आणि बाहिरोपंत मेहेंदळे व बिसाजीपंत बाडदेकर यांस बरोबर देऊन नानांस कैद करण्यास पाठविलें. हरीपंत पटवर्धन यांनीं सर्व सैन्य चार कोस मागें ठेवलें व आपण मेहेंदळे व बाडदेकर इ. मंडळी सातार्‍यास नाना ज्या वाड्यांत रहात होते तेथें आली व नाना

* मोडकक्रत इतिहास, पान ८९, दुसरा प्यारा.

ओसरीवर बसले होते त्यांच्याजवळ येऊन बसली. नाना मोठे धूर्त होते. त्यांनीं तात्काळ ताडलें कीं, ही मंडळी आपणास कैद करण्यास आली आहेत. नंतर त्यांनीं मंडळीचें उत्तम प्रकारें आगतस्वागत केलें व त्यांच्याशीं मोठ्या नम्रपणानें वागून लघुशंकेचें निमित्त करून मागल्या दारानें ते पालखींत बसून महाडास निघून गेले.

नाना फडणवीस मंडळीच्या हातावर तुरी देऊन निसटून गेले. तेव्हां ही मंडळी निराश होऊन पुण्यास आली. ह्या वेळीं पुण्यांत परशुरामभाऊ व दौलतराव शिंदा ह्या दोघांचें अति प्राबल्य वाढलें होतें. त्यांनीं बाबा फडक्याला युक्तीनें पकडून चाकणच्या किल्ल्यांत कैदेंत टाकलें. नानाचा परम स्नेही बापू लेले ह्यासहि कैदेंत टाकलें. नानाचा दुसरा स्नेही नारोपंत चक्रदेव ह्यास हरीपंत पटवर्धन धरणार, इतक्यांत तो निसटून गेला.

इकडे महाडास नाना फडणबिसांनीं आपणास पेशव्याची दिवाणगिरी मिळावी म्हणून खटपटी चालविल्या होत्या. त्यानें बाबुराव फडक्याला वश करून घेऊन पेशव्यांची खाजगी फौज आपल्याकडे ओढली. त्यानें बसल्या बसल्या २५,००० फौज जमविली. मशीर उलमुल्काच्या द्वारानें निजामाशीं संधान बांधून त्याची फौज आणविली. भोसले व तुकोजी होळकर यांस मोठ्या युक्तीनें आपलेकडे वळविलें. पटवर्धनांचे निरंतरचे हाडवैरी कोल्हापूरकर यांस चिथवून त्यांच्या करवीं पटवर्धनांच्या मुलुखांत दंगा चालविला. कोल्हापूरकरांनीं तासगांव लुटलें व भाऊंचा भव्य चंदनी वाडा लुटून जाळून फस्त केला. नानानें सखाराम घाटगे या नांवाच्या कोल्हापूरच्या सरदाराच्या लावण्यासंपन्न कन्येचें दौलतराव शिंद्यास आमिष दाखवून त्यास आपल्या बाजूस वळवून घेतलें. ह्या प्रसंगीं नानांनीं इंग्लिशांससुद्धां अनुकूल करून घेतलें होतें. शिवाय नानांनीं दौलतराव शिंद्याबरोबर असाहि करार केला होता कीं, जर तुम्ही दिवाण बाळोबातात्याला कैद करून बाजीरावास

गादीवर बसवाल तर मी तुम्हाला नगरचा किल्ला, दहा लक्षांचा मुलूख व परशरामभाऊची जहागीर इतकी देईन (मराठ्यांची बखर, भाग २८, कलमें ८–९–१०). हें एवढें अगडबंब कारस्थान नाना फडणविसानें रचलें होतें तरी तें गुप्त ठेवलें होतें. इकडे भाऊंनीं नानाला धरण्याकरितां शिंदे, होळकर व मोंगल लोक यांची रवानगी केली. या कारणानें वरील सरदारांस आपलें सैन्य पुण्यास आणण्यास चांगली संधि मिळाली. शिंद्यानें आपला दिवाण बाळोबातात्या कुंजीर यास ता. २७।१०।९६ इ. रोजीं अकस्मात कैद केलें; आणि परशराभाऊ पटवर्धनास कैद करण्याकरितां नारोपंत चक्रदेव याजबरोबर निजामाचें सैन्य देऊन त्यास गुप्त रीतीनें पाठविलें. नारोपंत चक्रदेवानें पुणें शहरांत शिरण्यापूर्वीं परशरामभाऊ पटवर्धन यास कोणत्या वेळीं धरतां येईल व त्याची फौज कोठें आहे वगैरे माहिती कळण्याकरितां दोन लखोटे लिहिले—एक आप्पा बळवंत याच्या नांवचा व दुसरा हरीपंततात्या फडके यांचे भाचे परशरामभाऊ वैद्य यांच्या नांवचा. हे दोन लखोटे दोन हेलकऱ्यांजवळ देऊन त्यांस पुण्यास पाठविलें. ते शहरांत आल्यावर आप्पा बळवंत मेहेंदळे यांच्या वाड्यांत गेले, व त्यांस जागे केलें. आप्पा बळवंत यांनीं आपला लखोटा घेतला व दुसरा परशरामभाऊंस दे असें हेलकऱ्यास सांगितलें. हेलकऱ्यानें तो लखोटा वैद्याच्या ऐवजीं पटवर्धनास दिला. परशरामभाऊंनीं लखोटा फोडून वाचून पाहिल्यावर त्यास नाना फडणविसाचें कारस्थान कळून आलें. परशरामभाऊ यांच्यांत कपट, विश्वासघात इत्यादि असते तर त्यांनीं वेष पालटून, घोड्यवर स्वार होऊन व पलायन करून दूर जाऊन एखाद्या अभेद्य किल्ल्याचा आश्रय केला असता, शिंदे, होळकर, निजाम व नाना फडणवीस यांची हड्डी नरम केली असती व नाना फडणविसाच्या कारस्थानाच्या ठिकऱ्या उडविल्या असत्या. भाऊंनीं अंगांत चिलखत घालून डोकीला मंदील बांधला. पायांत तुमान चढवून चढाऊ जोडा घातला. भरजरीच्या शेल्यानें कंबर कसली. पाठीशीं

ढाल बांधून जंबिया–बिचवा उजव्या बाजूस लटकविला आणि दोन हातांत दोन पट्टे चढवून त्या वीरश्रेष्ठानें घोड्यावर स्वार होऊन श्रीमंत चिमाजी माधव पेशवा ह्याचा प्राण वांचविण्याकरितां शनवारवाड्यांत धांव घेतली. भाऊंनीं पूर्वींच श्रीमंत चिमाजी माधवराव यांच्या संरक्षणार्थ शनवारवाड्यांत आपले दोघे चिरंजीव बाबा पटवर्धन व दाजीबा पटवर्धन यांच्या स्वाधीन कांहीं फौज देऊन त्यास ठेवलें होतें. भाऊंनीं प्रथम त्यांस जागे करून थोडक्यांत हकीकत सांगितली व त्यांस लखोटा दाखविला. बाबा पटवर्धन व दाजीबा पटवर्धन ह्यांनीं तत्काळ ५०० स्वारांचें पथक गोळा केलें. श्रीमंत चिमाजी माधवराव पेशवे ह्यांस जागे करून त्यांचा पोषाख त्यांच्या अंगांत घातला. श्रीमंत चिमाजी आप्पास घेऊन भाऊ वाड्यावाहेर पडाणार, इतक्यांत लखोटा फुटल्याची बातमी नारोपंत चक्रदेवास समजतांच त्यानें मश्रुन्मुल्कास सर्व हकीगत थोड्यांत सांगितली. त्यानें निजामाची ५०,००० फौज श्रीमंत चिमाजी माधवराव पेशवे व भाऊ यांस धरण्याकरितां शनवारवाड्याकडे रवाना केली. त्या फौजेनें शनवारवाड्यास गराडा दिला.

इकडे परशरामभाऊ एका खंद्या घोड्यावर स्वार झाला व श्रीमंत चिमाजी माधवराव ह्यास आपल्या पुढें घेऊन शेल्यानें कंबर कसली आणि तो ५०० लोकांसह वाड्याबाहेर पडला. आप्पा बळवंत व नारोपंत चक्रदेव ह्यांनीं मोंगलांची २५,००० फौज घेऊन त्यांस धरण्याकरितां ते निघाले. असा हा धांवपळीचा प्रकार सकाळपासून प्रहररात्रपर्यंत चालू होता. प्रहर रात्रीस भाऊ शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशीं येऊन थडकले. भाऊंनीं चिमाजीआप्पाला किल्लेदाराच्या स्वाधीन केलें. इतक्यांत नारोपंत चक्रदेव व २५,००० मोंगली फौज किल्ल्याच्या पायथ्याशीं येऊन थडकली. ह्या एवढ्या फौजेशीं भाऊ आपल्या चिमकुल्या फौजेसह लढूं लागला. कित्येक योद्धयांना ठार केल्यावर हा राजनिष्ठ वीर शत्रूच्या हातीं सांपडला. त्यास

नारोपंत चक्रदेव व आनंदराव रास्ते ह्यांनीं मांडवगण येथील किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

नंतर नाना फडणवीस व बाजीराव पुण्यास आले व त्यांनीं चिमाजी-आप्पाचें दत्तविधान अशास्त्र ठरविलें आणि बाजीरावाच्या नांवाचीं वस्त्रें साताऱ्याहून आणवून ता. २७ दिसेंबर १७९६ इ. रोजीं पेशव्याच्या गादीवर रावबाजीची स्थापना केली. नाना आपल्या फडणविशीच्या हुद्यावर पुनः विराजमान झाले.

बाजिराव पेशव्याच्या गादीवर बसला खरा. पण त्यास राज्यकारभाराचें बिलकूल ज्ञान नव्हतें, त्यानें राज्यांतील शहाणे, शूर व इमानी पुरुष कामावरून काढून टाकले. स्वतः दुर्व्यसनांत गढून गेला. भोंवतीं हलकट लोक, स्वतः दुर्बळ, आणि मिठें भाषण पण अंतर्यामीं कपट असें पाहून राज्यकारभार सोडून काशीस जाऊन राहण्याची नानांनीं बाजीरावास विनंती केली. परंतु त्याची ती विनंती त्यानें नाकारली.

बाजीरावानें पेशवाईच्या गादीवर बसविण्याबद्दल दौलतराव शिंद्यास दोन कोटि रुपये देण्याचें कबूल केलें होतें. त्या दोन कोटी रुपयांचा शिंद्यानें बाजीरावांस सारखा तगादा लावला. तेव्हां नानास कैद केल्याशिवाय इतकी रक्कम देणें शक्य नाहीं असें बाजीरावानें अखेर शिंद्यांस कळविलें. शिंद्यानें तें कबूल केलें. नंतर दौलतराव शिंदे नानाच्या घरीं वरचेवर जाऊन त्यानें नानाशीं वरकांतीं गोड भाषण करून नानास भारून टाकलें. पुढें दोनतीन महिने तो नानांच्या मर्जीप्रमाणें वागूं लागला. पुढें दौलतरावानें आपल्या छावणींत नानास भोजनाचें आमंत्रण दिलें तें नानांनीं स्वीकारलें. मेजवानीच्यापूर्वीं दोन दिवस नानांच्या पदरच्या विश्वासू मंडळींनीं जेवणास जाऊं नये म्हणून नानांस पुष्कळ सांगून पाहिलें; परंतु नानांनीं ऐकिलें नाहीं. त्याचवेळीं शिंद्याचा एक युरोपियन सेनापति मायकेल फेलोज यानें दौलत-

राव तुम्हांस कैद करणार नाहीं असें खातरजमेचें पत्र लिहून दिलें. शेवटीं ठरलेल्या दिवशीं सायंकाळीं पांच हजार अरब बरोबर घेऊन नाना वानवडीस निघाले. भवानी पेठेपर्यंत गेल्यावर फेलोजच्या खात्रीवरून नानांनीं त्या अरबांस जबरीनें परत फिरविलें. नंतर छावणीजवळ दाखल होतांच दौलत- राव शिंदा नानास सामोरा आला. थोड्याच वेळांत खलबताच्या निमित्तानें शिंदा, त्याचा कारभारी व फेलोज आणि नाना असे चौघे एका तंबूत गेले. तेथेंच ठरल्याप्रमाणें फेलोजनें नानास ३१ डिसेंबर १७९७ रोजीं कैद केलें. नानाबरोबर त्याचे विश्वासू मित्र शेलूकर, शिरवळकर वगैरे ५-६ लोक कैद करून त्या सर्वांस नगरच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें ठेवलें. नानांची अडचण याप्रमाणें दूर केल्यावर बाजीरावानें शिंद्यांस पुणें लुटण्याची मुभा दिली. शिंद्यानें आपला सासरा सर्जेराव घाटगे यांस ही कामगिरी सांगितली. सर्जेरावानें दिवसाढवळ्या पुण्याच्या श्रीमान् लोकांचीं घरें लुटलीं व त्यांज- कडून पैका निघेना, तेव्हां त्यांचे नानाप्रकारें हाल केले. त्यानें पुण्यांतील श्रीमान लोकांचीं अगणित घरें जाळून भस्म केलीं. कोणाच्या तोंडीं राखेचे तोबरे दिले; कोणाच्या अंगाचीं सालटीं काढलीं; कित्येकांना तापल्या तेलांत तळून काढलें; कित्येकांच्या हातापायांस सुया टोंचल्या; कांहीं जणांस तापलेल्या तोफांशीं गच्च आवळून त्यांचा प्राण घेतला; कित्येकांस तोफेच्या तोंडीं दिलें. त्यांतल्या त्यांत नाना फडणविसाचे संबंधी लोकांचे तर फारच हाल केले.

या अघोर कर्माबद्दल शिंद्याला व सर्जेरावाला भयंकर शासन करावें म्हणून बाजीरावाचा भाऊ अमृतराव ह्यानें पेशव्याचें सैन्य जमवून अगदीं गुप्त रीतीनें युद्धाची तयारी केली. अमृतरावानें ही युद्धाची तयारी बाजीरावाच्या संमतीनेंच केली होती. इकडे बाजीरावानें काय गम्मत केली पहा. त्यानें शिंद्यास गुप्तरीतीनें कळविलें कीं, माझा भाऊ अमृतराव तुझ्याशीं गुप्त रीतीनें लढाईची तयारी करीत आहे; तरी तूं हुशार रहा.

बाजीरावानें नाना फडणविसाला कैदेंत टाकल्यानंतर साताऱ्याच्या राजाला कळविलें कीं, बाबुराव कृष्ण नांवाचा जो कारभारी नाना फडणविसाच्यातर्फे साताऱ्यास आहे, त्यास कैद करून सातारचा किल्ला हस्तगत करून घ्यावा. असें कराल तर मीहि सातारच्या गादीचा बंदागुलाम असें वागून तुमच्याशीं नम्रपणानें पूर्वापार संबंध ठेवीन. त्याप्रमाणें सातारच्या राजानें सातारचा किल्ला हस्तगत केला व बाबुराव कृष्ण ह्यांस कैद केलें. पुढें योग्य वेळीं बाजीरावानें जेव्हां नारायणराव थत्ते यांस पाठविलें, तेव्हां छत्रपतीनें एकच खर्पूस उत्तर पाठविलें कीं, वचन दिल्याप्रमाणें पेशव्यानें सातारच्या गादीचा अंकित असें वर्तन दाखवून वचन पुरें करावें. सातारचा राजा नुसतें उत्तरच देऊन राहिला नाहीं. पेशव्यांच्या मुलखांत व त्यांच्या दरबारांत अंदाधुंदी माजल्याकारणानें आपला फायदा करून घेण्यास ही संधी फार चांगली आहे हें पाहून तो अधिकाधिक फौज ठेवूं लागला. त्यानें पेशव्यांशीं लढण्याची जय्यत तयारी चालविली. बाजीरावानें माधवराव रास्ते याजबरोबर सरकारी फौज देऊन त्यांस सातारच्या राज्यावर पाठविलें. माधवराव रास्त्याच्या व सातारच्या राजाच्या बऱ्याच चकमकी झडल्या. प्रत्येक लढाईंत सातारचा राजा विजयी होत असे. अखेरच्या लढाईंत सातारच्या राजानें माधवराव रास्त्यांचा पूर्ण पराजय करून त्यांस मालेगांवाकडे पिटाळून लावलें. पुढें सातारच्या राजाचा मोर्चा पुण्याकडे वळला.

छत्रपति अनावर झालेला पाहून बाजीराव अगदीं गर्भगळीत होऊन गेला. आतां या अरिष्टांतून आपणांस कोण सोडवील याच्याबद्दल तो वाटाघाटी करूं लागला. त्यानें दौलतराव शिंद्याकडे मदत मागितली. दौलतराव शिंद्यानें थाप दिली कीं, माझ्या जहागिरींत कांहीं दंगा उत्पन्न झाला आहे, या कारणानें मीं आपली सर्व फौज तिकडे पाठवून दिली. दौलतराव शिंदे सातारच्या राजालाच आंतून साह्य असून ब्राह्मणांनीं घेतलेलें राज्य तूं परत घे अशी सल्ला तो छत्रपतीला देत होता. इतकेंच नव्हे, पण

स्वतःच्या पलटणी तो भराभर तिकडे रवाना करीत होता. छत्रपतींनें पेशव्यांचा बराच मुलुख हस्तगत केला.

जुन्या मुत्सद्दी मंडळीनें परशरामभाऊस बंदींतून सोडविण्याविषयीं बाजीरावास सल्ला दिली. बाजीरावानें मांडवगण किल्ल्यांतून परशरामभाऊंची सुटका केली. सुटका होतांच त्यानें सैन्याची जमवाजमव चालविली. त्यांनीं वाईच्या आसपास आणि इतर ठिकाणीं मिळून दहा हजार फौज जमा केली. ते पावसाळ्याचे दिवस असून मुसळधार पाऊस सुरू होता. धुक्यानें दिशा धुंद होऊन गेल्या होत्या. वेण्या, कोयना आणि उरमोडी ह्या नद्या पाण्यानें तुडूंब भरून गेल्या होत्या. तरी भाऊंनीं उतार पाहून दहा हजार सैन्य वेण्या नदीच्या पलीकडे नेलें व सातारा शहराला वेढा घातला.

साताराचा राजा ह्या प्रसंगीं गैरसावध होता. रास्त्याचा पराभव केल्यामुळें व दौलतरावाची आंतून मदत असल्यामुळें व शिवाय धुव्वाधार पाऊस व नद्या तुडुंब भरलेल्या, यांच्या योगानें तो गैरसावध राहिला होता.

परशरामभाऊंचा अकल्पित घाला येतांच राजाची मंडळी गोंधळून गेली; परंतु राजेसाहेबांचे बंधु चतुरसिंग व त्यांचे दुसरे आप्त एलाजी मोहिते, सेनाजी मोहिते, कुशाबा राजे, दुर्गाजी राजे, महाडीक वगैरे मंडळींनीं फौजेची जमवाजमव केली, राजेसाहेबांस माणसांसह किल्ल्यावर पाठविलें आणि भाऊंच्या सैन्यावर चालून जाऊन कापाकापीस सुरवात केली. या वेळीं भाऊ वयानें जरी ६५ वर्षांचेवर होते, तरी त्यांच्या युद्धकौशल्यांत, लढवय्येपणांत व उत्साहांत केंसाइतकीसुद्धां न्युनता न पडून ऐन भरज्वानींत असलेल्या तरण्याबांडाप्रमाणें त्यांची तरवार शत्रूंचीं गर्दनें छाटीत होती. भाऊप्रमाणेंच त्यांचा अवांतर बंधुवर्ग फार हिय्यानें समशेर फेंकीत होता. माधवराव रास्ते हे भाऊबरोबर होतेच. त्यांनींहि जिवाकडे न पाहतां अत्यंत शौर्य गाजविलें. छत्रपतीकडील लोकहि मोठ्या मर्दुमकीनें

लढत होते. परंतु भाऊंनीं त्यांना दे माय धरणीं ठाय असें केलें. भाऊंच्या-पुढें ते अगदीं टेकीस आले. एलाजी मोहिते ठार झाला. कुशाबा राजे आणि दुर्गाजी महाडीक ह्यांना भयंकर जखमा लागून ते जमिनीवर विवळत पडले. सेनाजी मोहित्यानें बिलकूल धैर्य खचूं न देतां एकसारखा तो झुंजत होता. त्यानें माधवराव रास्त्यावर तुटून पडून त्याला ठार करण्याचा बेत आणला; परंतु भाऊंच्या तालमेंतील एकापेक्षां एक वरचढ मंडळी. रास्त्याच्या अंगावर मोहित्यांची तरवार पडते आहे तोंच त्याचा हात वरच्यावर उड-वून त्यांनीं मोहित्यांचे तुकडे तुकडे केले. आपल्या लोकांची अशी अवस्था झालेली पाहून तो समरांगणांतून गेला. तो मोठा शूर व आवेशाचा पुरुष होता. त्यानें वाटेनें ५०० लोक जमविले व चोरवाटेनें डोंगरांतून पालीस गेला. तेथें रात्रीं देवाची पुजा करून कपाळीं भंडार लाविला. मग आवेशानें खालीं आला आणि वारणा नदीच्या कांठीं असलेल्या रास्त्यांच्या ५,००० फौजेवर तुटून पडून त्यांच्याशीं भयंकर युद्ध केलें. रास्त्याकडील बहुतेक लोक कापून काढले व तरवार पेलीत पेलीत कोल्हापूरच्या राजाला तो जाऊन मिळाला.

साताऱ्च्या राजाचें बंड मोडून परशरामभाऊ पटवर्धन पुण्यास बाजी-रावाच्या भेटीस आला. बाजीरावानें परशरामभाऊंचें आदरातिथ्य कोणत्या प्रकारें केलें, तर भाउंना दहा लक्ष रुपये दंड! वाहावारे बाजीराव!

पाजी बाजीनें भाऊला १० लक्ष रुपये दंड खरोखरच केला होता. परंतु पुढें बाजीला भाऊपुढें लोटांगण घालण्याचा लौकरच प्रसंग आला. टिपुनें पेशव्यांच्या मुलुखांत धामधूम व दंगा चालविला. पेशव्यांचे सेनापति परशरामभाऊ पटवर्धन हे कैदेंत पडले आहेत व पेशव्याचे हुशार प्रधान नाना फडणवीस हेहि कैदेंत पडले आहेत ही संधि पाहून त्यानें कर्नाटक प्रांतांतील किल्ले व मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला. नंतर बाजी भाऊला म्हणाला कीं, मी तुम्हांस दहा लक्ष रुपये

दंड म्हणून जें म्हणालों तें थट्टेनें. तुमचें आमचें भांडण घरांतलें. बाजी परशरामभाऊपुढें पदर पसरून दिनवाणीनें म्हणाला कीं, ह्या वेळीं तुम्ही जर टिपूवर मोहीम केली नाहीं, तर मराठी राज्य ठार होईल. परशरामभाऊ भोळा सांभ. त्याचें अंतःकरण गंगेच्या पाण्याप्रमाणें निर्मळ. त्यांनीं बाजीला टिपूवर मोहिम करण्याचें वचन दिलें. मात्र त्यांनीं नाना फडणविसास बंधमुक्त करण्याबद्दल अति आग्रह केला. शिवाय पुण्यांत राजकारणांत पुरे मुरलेले राजकार्यधुरंधर पुरूष होतेच. त्यांनींहि नानांस बंधमुक्त करण्याबद्दल बाजीरावाला सल्ला दिली. बाजीरावानें नानांस लौकरच बंधमुक्त केलें.

भाऊनें टिपूवर स्वारी करण्याकरितां जय्यद तयारी चालविली. इतक्यांत असें झालें कीं, करवीकरकरांनीं पेशव्यांच्या राज्यांत दंगा माजविला व मुलूख काबीज केला.

आतां पूर्व संबंध करण्याकरितां करवीरकर पेशवे व पटवर्धन यांची थोडीशी पूर्वपीठिका कथन करतों. कोल्हापूरकर हे शिवछत्रपतीचे वंशज असून त्यांना पेशव्यांचें वर्चस्व प्रथमपासूनच सहन होत नसे. करवीरकरांनीं पेशव्यांच्या मुलखांतून धामधूम माजविली. शिवाय पटवर्धनांच्या जहागिरी तिकडल्याच प्रांतांत असल्यामुळें त्यांना कोल्हापूरकरांनीं जहागिरीचा उपभोग निर्वेधपणें कधींच घेऊं दिला नाहीं. पटवर्धन करवीरकर ह्यांच्या हरहमेष झटापटी होत असून ते परस्परांचे निरंतरचे शत्रु बनून राहिले होते. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर परशरामभाऊला पुढील राजकारणाकरितां नेहमीं पुण्यासच रहावें लागे. करवीरकरांनीं ही संधी साधून पटवर्धनाचा भुदरगड किल्ला काबीज केला. नंतर चिकोडी व मनोळी हे दोन तालुके भास्करराव निपाणकर यांजपासून हिसकून घेतले. कर्नाटकांतील हुबळी आणि नलमधी शहरें लुटून फस्त केलीं. संकेश्वराच्या जवळचा वल्लभगड किल्ला घेतला. संवदलग्याचा

किल्ला काबीज केला. इ. स. १७९७ सालीं गोकाकवर स्वारी करून त्या प्रांतांतून एक लक्ष वीस हजार रुपये खंडणी वसूल केली. कोण्णूर व त्याच्या आसपासचा मुलूख लुटून फस्त केला. तेथील देसायाला ठार केलें. तहत पाच्छापुरापर्यंत खंडण्या घेण्याचा सपाटा चालविला. इ. स. १७९९ मध्यें बाजीरावानें भाऊची रवानगी कोल्हापुरकरांवर केली. भर पावसाळ्यांत भाऊंनीं कोल्हापुरकरांवर स्वारी केली. भाऊंनीं कोल्हापुरकरांचा घटप्रभेपासून मलप्रभेपर्यंत सर्व प्रांत जिंकला. शिवाय कोल्हापूरकरांनीं पेशव्यांचे जे जे किल्ले व मुलूख काबीज केला होता तो सर्व परत घेतला. सर्व किल्ले पटवर्धनांनीं पुनः जिंकून घेतले. जागोजाग करवीरकरांचा पराभव केला. कोल्हापूरचा राजा स्वतः महान् शूर होताच. शिवाय त्यास साताऱ्च्या राजाचा भाऊ चतुरसिंग येऊन मिळाला होता. तोहि मोठा शूर असून परशरामभाऊ माझ्या सपाट्यांत कधीं येईल याची तो वाट पहात होता. निपाणीहून पट्टणकुडी गांवाजवळ भाऊचें सैन्य येतांच राजा शिवाजी व चतुरसिंग समोर थडकले. भाऊंनीं तितक्यांतल्या तितक्यांत आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळीवर भाऊंचे जेष्ठ पुत्र रामचंद्रअप्पा यांस, दुसऱ्या टोळीवर भाऊंचे दुसरे पुत्र हरीपंत बाबा व तिसऱ्या टोळीवर माधवराव दाजीसाहेब असे तीन टोळ्यांवर तीन अधिकारी नेमले. या तीन टोळ्यांवर भाऊ हे कांहीं निवडक लोक घेऊन देखरेख करीत होते. या तीन टोळ्या तिहींकडून शत्रूवर चालून जाऊन तुंबळ युद्ध झालें. भाऊंनीं रत्नाकरअप्पा ह्यांच्या फळीवर हल्ला करून एकदम कत्तल सुरू केली. रत्नाकरअप्पा दिवाणाचे नामांकित वीर रणांगणीं ठार झाले आणि कैक हत्ती, घोडे, निशाणें पटवर्धनांनीं हिसकावून घेतलीं. हें शिवाजीमहाराजांनीं पहातांच ते भाऊंचा समाचार घेण्यास सिद्ध झाले. तरवार पेलण्यांत दोघांचाहि हातखंडा होता. उभयतांकडील सरदार, सेनापति हरहर महादेव असा गंभीर शब्द करीत

जिवाची पर्वा न करितां एकमेकांवर तुटून पडत. एकच गर्दी होऊन जिकडे तिकडे धूळच धूळ माजली. सर्व वीर हातघाईवर आले. तोड, मार, काप ह्यांशिवाय गोष्ट नाहीं. हजारों सैनिकांचे तुकडे होऊन रक्ताचे पाट वाहूं लागले. परशरामभाऊ तुफान होऊन तो दोन्ही हातांतील पट्टयांच्या चौफेर फेकींनीं अनेक वीर ठार करूं लागला. इतक्यांत राजा शिवाजी, रत्नाकरपंत दिवाण, सेनापति चतुरसिंग, नारायणराव गायकवाड आणि विश्वासराव गायकवाड ह्या पांच जणांनीं परशरामभाऊला घेरून त्याच्यावर भयंकर शस्त्रप्रहार केले. भाऊसाहेब घायाळ होऊन धरणीवर पडला. रामचंद्रअप्पा, हरिपंत हे भाऊचे दोन पुत्र व माधवराव दाजी हे दूर अंतरांवर लढत होते. विनोबा आबा मात्र भाऊच्यानजकिच लढत होते. ‘ पडला ’ ‘ पडला ’ अशी गर्जना होऊन करवीर पक्षांत जयजयकार झाला. ही गर्जना ऐकून विनोबा आबा पटवर्धन धांवून भाऊपाशीं आला व भाऊला आपल्या स्वाधीन करून घेतलें. करवीरकराकडील जो योद्धा विनोबा आबावर चालून येई त्यास तो कंठस्नान घाली. तेव्हां शत्रुकडील पुष्कळ लोकांनीं मिळून विनायक आबावर हत्यार चालविलें. विनोबा आबाच्या अंगावर हत्यारांचे २७ वार लागले. तरी तितकेहि वार सहन करून धांवत जाऊन करवीरकराच्या गायकवाड सरदाराच्या बाहूवर त्यानें पट्टा मारिला. हें करवीर-कराकडील एका योद्धयानें पाहून विनोबा आबास ठार केलें. इकडे परशराम भाऊंस असह्य जखमा झाल्यामुळें त्यांनीं रणांगणीं देह ठेवला. सर्जेराव घाटग्यानें भाऊंच्या प्रेताचे तुकडे तुकडे केले. भाऊंच्या प्रेताचे तुकडे नारो हरि करंदीकर यांनीं महाराजांच्या परवानगीनें गोळा करून त्यांचें विधिपूर्वक दहन केलें. याबद्दल त्यांस कांहीं उत्पन्नहि मिळालेलें आहे. पट्टणकुडीच्या रणभूमीवर ज्या ठिकाणीं ह्या प्रतापी पुरुषानें देह ठेविला, त्या ठिकाणीं एक छत्री बांधिलेली आहे. भाऊंनीं स. १७९९च्या सप्टेंबर महिन्यांत समरांगणीं देह ठेविला.

इकडे भाऊंचे वडील पुत्र रामचंद्रअप्पा ह्यांसहि युद्धांत भयंकर जखमा झाल्या. त्यांस भाऊंची निधनवार्ता ऐकून अत्यंत दुःख झालें. भाऊंच्या निधनामुळें सैन्यांत चलबिचल झाली होती. शिवाय कांहीं सैनिकांस विसावा पाहिजे होता, म्हणून रामचंद्रअप्पानें कांहीं दिवस युद्ध बंद ठेवलें. पुढें रामचंद्रअप्पांनीं थोडक्याच दिवसांनीं शिंद्याकडील पलटणी मदतीस घेऊन व आपल्या सैन्याची जमवाजमव करून करवीरकरांशीं युद्धाची तयारी चालविली. इकडे कोल्हापूरकरांनींहि युद्धाची तयारी चालविली. पटवर्धनाचें सैन्य कोल्हापूरकरांवर चालून आलें. कोल्हापूरकरहि पटवर्धनावर चालून गेले. उभयपक्षीं भयंकर चकमकी होऊं लागल्या. नंतर एका रात्रीं रामचंद्रअप्पानीं सर्वत्र सामसूम असतां आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळीचें आधिपत्य आपण स्वीकारलें. दुसऱ्या टोळीचें आधिपत्य विनोबा आबाचे चिरंजीव गणपतराव यास दिलें. कवाईत शिकविलेल्या कंपूची तिसरी टोळी केली. एकीकडून रामचंद्रअप्पा व दुसरीकडून कवायती कंपू यांनीं हल्ला करून शत्रूला अगदीं जर्जर केलें. तिसऱ्या टोळीचे अधिकारी गणपत विनोबा यांनीं शत्रुकडील गोलंदाज ठार करण्याचा सपाटा सुरू केला. करवीरकरांनीं युद्ध बंद करून ते आपल्या राज्यांत निघून गेले. इकडे रामचंद्रअप्पांनींहि युद्ध बंद केलें. इ. स. १७९९ मध्यें रामचंद्रअप्पा साहेब यांस पुत्ररत्न झालें. मुलाचें नांव गोपाळ असें ठेविलें. बाजीराव मोठा कपटी, दुष्ट व कृतघ्न होता. ज्या परशरामभाऊंनीं वयाच्या चौदाव्या वर्षांपासून आपला जीव धोक्यांत घालून पेशव्यांच्या राज्यरक्षणार्थ वयाच्या ६५ वर्षांपावेतों युद्धें केलीं व अखेर आपला देह धारातीर्थीं अर्पण केला, त्यांचे चिरंजीव रामचंद्रअप्पा हे तेंच व्रत चालवीत असतां त्यांस प्रतिबंधांत ठेवण्याचा बाजीरावानें निश्चय केला.

हरिभटबाबांचा एकोप्याविषयीं पुत्रास जो उपदेश झाला होता तो त्यांचे नातु, पणतु यांनींसुद्धां मनांत वागविला होता. तेव्हां रामचंद्र आप्पास

कैद करावयाचें तर त्यांच्यांत प्रथम भेद केला पाहिजे असें अमृतराव वगैरेंच्या विचारें ठरलें व चिंतामण पांडुरंग पटवर्धन सांगलीकर यांस प्रेमानें आपल्या क्रीडामंडळांत घेतलें आणि नंतर कांहीं दिवसांनीं रामचंद्रआप्पास जरूर जरूर 'सडे भेटून जावें' म्हणून आज्ञापत्र पाठविलें. आज्ञापत्राप्रमाणें रामचंद्र आप्पासाहेबांनीं विघ्नहर्त्या गजाननास वंदन करून पांच सहा शूर मंडळीस बरोबर घेऊन ते पुण्यास जावयास निघाले. चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं गुप्त बातमीदारांकडून श्रीमंतांनीं केलेली मसलत समजून घेतली. नंतर पांचशें स्वार बरोबर घेऊन ते पुण्यास निघाले. इकडे रामचंद्रआप्पा पुण्यास दाखल होऊन शनवारवाड्यांत श्रीमंतांबरोबर बोलत बसले. लगेच चिंतामणराव आप्पासाहेब पुण्यास येऊन त्यांनीं गुप्त बातमीदारांकडून रामचंद्र आप्पासाहेब कोठें आहेत म्हणून चौकशी केली. गुप्त बातमीदारानें ते वाड्यांत श्रीमंतांपाशीं बोलत बसले आहेत म्हणून सांगितलें. तत्काळ चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं वाड्यास पांचशें स्वारांचा गराडा दिला. इकडे रामचंद्र आप्पासाहेब यांस कैदेची इशारत होणार, तों सांगलीकरांनीं सरबत्तीचा इशारा केला. तोफेचे व बंदुकीचे आवाज श्रीमंतांच्या कानीं पडतांच ते गर्भगळीत झाले. त्यांनीं सेवकांस विचारलें, ' हे बार कोणीं काढले ? सेवकांनीं चौकशी करून सांगितलें कीं, सांगलीकरांनीं वाड्यास स्वारांचा गराडा देऊन बंदुकी झाडल्या. श्रीमंत म्हणाले, त्याला येण्याची आज्ञा नसून तो काय निमित्त येथें आला ? सेवक म्हणाला, सरकारांनीं रामचंद्रआप्पास सडे बोलाविल्यामुळें त्याची पाठराखण करण्याकरितां सांगलीकर स्वतः आले. हें ऐकून श्रीमंतांनीं लगेच रामचंद्रआप्पास जाण्याविषयीं विडा देऊन सांगलीकरांस बंदुकींचा आवाज बंद करून आपल्याकडे येण्याची आज्ञा केली. सांगलीकर येतांच श्रीमंत म्हणाले, 'तुम्ही आज्ञेशिवाय कां आलांत ?' सांगलीकर म्हणाले ' आमच्या बंधूस सडे येण्याविषयीं आज्ञा झाली. वेळ बरी–वाईट असते. सबब त्याच्या रक्षणार्थ आम्ही आलों. ' तेव्हां श्रीमंत म्हणाले,

'तुम्ही विभक्त आहां ना ?' सांगलीकर म्हणाले 'आम्ही आपापल्या स्त्रियांचे मात्र विभक्त; परंतु सरकारचाकरीस एकत्र.' हें ऐकून श्रीमंतांनीं विचार केला कीं, हरिभट बाबांचा उपदेश अद्यापपावेतों या पटवर्धनांच्या हृदयांत जागृत आहे.

रामचंद्रपंत आप्पा हे प्रथम ज्या वेळीं जमखिंडीस रहावयास आले तेव्हां जमखिंडीच्या किल्ल्याचा अधिकारी भास्कर नाना सखदेव यांचा मुलगा पांडोबा हा किल्ला स्वाधीन करीना. आप्पासाहेबांनीं किल्ल्यावर तोफांचा मारा करून ते स्वतः चाल करून गेले. आतां आपला निभाव लागणें कठीण असें समजून आल्यामुळें पांडोबा किल्ला सोडून आप्पासाहेबांस शरण आला. आप्पासाहेबांनीं त्यास सोडून दिलें रामचंद्रराव आप्पासाहेब हे इ. स. १८१३ त स्वर्गवासी झाले.

नंतर रामचंद्रआप्पाचे पुत्र गोपाळराव हे जमखिंडीच्या गादीवर बसले. इ. स. १८१८ त पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य आलें. माधवराव परशराम ह्यांचे पुत्र गोविंदराव ह्यांनीं आपला हिस्सा मागितल्यावरून इ. स. १८२१ सालीं मे. चॅपलीनसाहेबबहादूर यांनीं जमखिंडी जहागिरीचे दोन भाग करून गोपाळरावाकडे २,४३,४७६ रुपयांचा सरंजाम ठेविला. गोविंद-राव याजकडे २,२५,१५३ रुपयांचा सरंजाम दिला. गोविंदराव हे पुढें चिंत्रणीस राहूं लागल्यामुळें त्यांस चिंचणिकर पटवर्धन असें नांव पडलें. पेशवाई बुडाल्यावर जमखिंडीकर गोपाळरावाशीं कंपनी सरकारचा तहनामा झाला. त्या तहांत नोकरीबद्दल स्वारांची संख्या तीनशें ठरविली. जातीची नवी तैनात तीस हजार रुपयांची कंपनी सरकारांनीं करून दिली. गोपाळ-राव पटवर्धन यांनीं वयाच्या १४ व्या वर्षापासून राज्यकारभार चालविला. हे बाजवी खर्च करण्यास मागें पुढें पहात नसत. रावसाहेब हुषार व मोठे दक्ष होते. यांनीं आपल्या प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करून आनंदांत दिवस

चालविले. याचा उत्तम लौकिक ऐकून, तासगांवकार भाऊसाहेब अज्ञान असतांना तासगांव जहागिरीचा राज्यकारभार चालविण्याकरितां इंग्रज सरकारानें तासगांव संस्थान श्रीमंत गोपाळराव आप्पासाहेब याच्या देखरेखीखालीं दिलें. रावसाहेबांस सर्व कांहीं अनुकूळ होतें; परंतु पुत्रसंतान नव्हतें. म्हणून इ. स. १८२६ सालीं दत्तकाबद्दल थैली लिहिली. त्याचा जबाब ता. १७ जुलै १८२६ रोजीं नेक नामदार माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन गव्हरनरसाहेब यांजकडून आला कीं, दत्तक घ्यावा. जहागीर चालवूं. दत्तकाची परवानगी मिळाल्यामुळें सर्वत्रांस आनंद झाला. नंतर रावसाहेबांनीं पूर्वी ठरलेल्या प्रसंगीं येथील अंताजी माधवराव उर्फ तात्यासाहेब पटवर्धन यादवडकर यांचे पुत्र गणपतराव यास १८नोव्हेंबर इ. स. १८४० इ० रोजीं दत्तक घेऊन त्यांचें नांव रामचंद्रराव आप्पासाहेब असें ठेविलें. इ. स. १८४० च्या डिसेंबर महिन्यांत गोपाळराव कैलासवासी झाले. श्री० राधाबाईसाहेब यांनीं आपल्या दत्तकपुत्राचें संगोपन फार चांगल्या प्रकारें केलें. मुलाचा व्रतबंध शके १७६४ माघ शु० १० स बापूसाहेब मंगळवेढेकर यांजकडून पुण्याहवाचन ठेवून मोठ्या समारंभानें केला. खर्च रु.५,५६५८५ झाला. नंतर चार वर्षांनीं तासगांव येथील हरी महादेव गोडबोले यांच्या मुलीबरोबर आप्पासाहेबांचा विवाह झाला. श्रीमंत भाऊसाहेब तासगांवकर यांनीं पुण्याहवाचन ठेविलें होतें. विवाहकार्यास पोलिटिकल एजंट यांनीं ५,००० रुपयांची मंजूरी दिली होती. श्रीमंत सरदार रामचंद्रराव आप्पासाहेब हे अज्ञान असल्यामुळें श्री. मातोश्री राधाबाई साहेब यांनीं खाजगी कारभारी आपटे व दौलतीकडील कारभारी जोशी या विश्वासूक व कार्यदक्ष कारभाऱ्यांच्या साह्यानें जमाखिंडी संस्थानचा राज्यकारभार आठ वर्षे उत्तम रितीनें चालविला. पुढें त्या वेळचे पोलिटिकल एजंट अँडरसनसाहेब यांनीं जमाखिंडी संस्थानावर इंग्लिश सरकारतर्फेंचा कारभारी असावा म्हणून मुंबई सरकाराकडे रिपोर्ट केला. मुंबई सरकारानें पो. ए. ची ही शिफारस मान्य केली.

पोलिटिकल एजंट यांनीं श्री. मातोश्री राधाबाईसाहेबांस कारभारांतून काढून सरकारतर्फें विनायक कृष्ण पंडीत यांस इ. स. १८४९ त कारभारी नेमलें. श्री. मातोश्री राधाबाईसाहेब यांस वर्षाची ६,००० रुपयांची नेमणूक करून दिली. श्रीमंत रामचंद्रराव आप्पासाहेब दत्तक झाले त्यावेळीं त्यांचें वय सात वर्षांचें होतें. सरकारानें रामचंद्ररावाच्या शिक्षणाची व्यवस्था उत्तज ठेविली होती.

श्रीमंत रामचंद्रराव आप्पासाहेब यांचें शिक्षण पूर्ण झाल्यावर व तें वयांत आल्यावर पो. ए. यांनीं ता. ७ जानेवारी १८५३ इ. रोजीं दरबार भरवून त्यांस राज्याची पूर्ण मुखत्यारी दिली. आप्पासाहेबांस उद्देशून इंग्रज सरकारचे प्रतिनिधि म्हणाले, " आजपासून आपण आपल्या संस्थानचे पूर्ण मालक झालांत. सर्व राज्यसुत्रें आपल्या हातीं आलीं. यास्तव आपण न्याय व नीति यांस अनुसरून आपल्या प्रजेचें संरक्षण उत्तम प्रकारें करावें. म्हणजे सार्वभौम सरकारास संतोष होईल. " नंतर आप्पासाहेब सरकारचे आभार मानून म्हणाले, " आपल्या उद्देशाप्रमाणें परमेश्वर मजकडून कार्य घडवून आणील. "

श्री० अप्पासाहेब यांचें राज्यरोहण होऊन चार वर्षें झालीं नाहींत तोंच श्री० आप्पासाहेबांवर व जमखिंडीच्या राज्यावर एक अकस्मिक अरिष्ट कोसळलें.

इ. स. १८५७ चें शिपायांचें भयंकर बंड उद्भवलें. या बंडासंबंधानें महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्रांत दररोज नानाप्रकारच्या नव्या नव्या कंड्या उठत असत. सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न झाली. अशा वेळीं चोर व दरवडेखोर यांस फार फावतें. तेव्हां आपल्या संस्थानास उपद्रव होऊं नये म्हणून श्री० आप्पासाहेब यांनीं संस्थानच्या संरक्षणार्थ कांहीं नवीन लोक चाकरीस ठेविले. या जगांत सर्वत्र हांजीहांजीखोर, चहाडखोर, स्वार्थसाधु,

हलकट, नीच अशा लोकांचा अति सुळसुळाट आहे. वरील लोकांनीं पो. ए. चे आप्पासाहेबांविषयीं कान भरले. तेव्हां आप्पासाहेबांस धरून प्रथम बेळगांवास व नंतर वेंगुर्लें येथें नजरकैदेंत ठेविलें. पुढें बंडाचा विध्वंस झाल्यावर व सर्वत्र शांतता झाल्यावर त्या वेळचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल नेक नामदार लॉर्ड कॅनिंग यांनीं निःपक्षपातानें श्री० आप्पासाहेब यांची चौकशी करून त्यांस मुक्त करण्याचा व संस्थानीं पाठविण्याचा पो. ए. यांस हुकूम पाठविला. सरकारानें आप्पासाहेब यांचा जप्त केलेला सर्व खजिना व डागडागिने परत केले. श्री. आप्पासाहेब १९ एप्रिल १८५९त आपल्या संस्थानचा कारभार पाहूं लागले.

श्री. आप्पासाहेबांच्या पश्चात जमखिंडीच्या किल्ल्याची सर्व पाडापाडी झाल्यामुळें त्या किल्ल्यांत रहाणें त्यांस अशक्य झालें.

तेव्हां त्यांनीं जमखिंडी गांवालगत एक ठिकाण शोधून काढलें. जमखिंडी गांवापासून सुमारें दीड मैलांवर मेलगिरी लिंगाप्पा या नांवाच्या डोंगरांत श्रीरामेश्वर या नांवाचें अनादि देवस्थान आहे. तेथें श्रीशंकर आंबेसह रहातात. श्रीरामचंद्रजी लक्ष्मणासह याच मार्गानें रावणवधार्थ गेले. श्री. आप्पासाहेबांनीं रहाण्यास हें स्थळ पसंत केलें. त्यांनीं तेथील जंगल कापून काढून, आसपासची जमीन साफसुफ करून व डोंगर फोडून मैदान करविलें. त्यानीं तेथें सर्वत्र लहान मोठ्या इमारती बांधविल्या. हत्तींकरितां ठाणीं, पाकशाळा, पागा, विहिरी, तलाव आणि सुंदर बागबगीचे करविले. त्याप्रमाणेंच त्यांनीं श्रीमदुमारामेश्वर, श्रीत्रिपुरसुंदरी, श्रीहरिहरेश्वर, श्रीकामेश्वर, श्रीसर्वेश्वर, दत्तमंदीर, हनुमान मंदिर इ० देवालयें त्या ठिकाणीं बांधविलीं. सर्व देवांच्या पुजा, नैवेद्य आणि नंदादीप सर्व व्यवस्थेशीर चालूं केले. अशा सुंदर जागेंत श्री. आप्पासाहेब राहूं लागले. त्यांस विद्येचा जबरा व्यासंग होता. त्यांस वाचनाचाहि फार नाद होता. श्री० आप्पासाहेब यांनीं एक मोठें ग्रंथालय स्थापिलें आहे. त्यांच्या ग्रंथालयांत ३,३०० संस्कृत

(हस्तलिखित व छापील मिळून), १,१०० मराठी, १०० कानडी, १०० गुजराथी, ३,००० इंग्रजी, १५० फारशी व उर्दू, आणि ५०० इतर भाषेंतलीं इतके ग्रंथ होते. या ग्रंथालयाची व्यवस्था त्यांनीं उत्तम प्रकारची ठेविली होती.

श्रीमंत आप्पासाहेब यांनीं राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें चालविली होती. विद्याखातें, पोलीसखातें, पब्लिक वर्क्सखातें, देवीखातें इ० खातीं स्थापन केलीं. जमखिंडी येथें दवाखाना स्थापन केला. जमखिंडी गांवांत व संस्थानांत पाण्याचें फार दुर्भिक्ष असे, म्हणून श्री० आप्पासाहेब यांनीं एक लक्ष वीस हजार रुपये खर्चून लकणकेरी तलाव व एक लक्ष रुपये खर्चून कड्डेगिरी तलाव असे दोन तलाव बांधले. इ. स. १८८७ पासून स. १८९६ पावेतों रस्त्यांच्या बाजूंच्या झाडांकरितां, दुष्काळांतील कामाकरितां, पाण्याच्या सोयीकरितां धर्मशाळा, सडका, शाळेच्या इमारती वगैरे लोकोपयोगी कामाकरितां ७,८६,००० रु० खर्च केले. राजनगरींत आपल्या मळ्यांत एक सुंदर हायस्कूल बांधवून त्यास परशरामभाऊ हायस्कूल असें नांव दिलें. श्री० आप्पासाहेब यांजकडे मराठी ग्रंथ छापवून पाठविला कीं, ते त्या ग्रंथकर्त्यास ग्रंथाच्या योग्यतेप्रमाणें चांगलें बक्षीस देत.

वडिलार्जित चालत आलेला श्रीगणपत्युत्सव पूर्वीं किल्ल्यांत मोठ्या थाटानें होत असे; परंतु किल्ल्याची पाडापाडी झाल्यामुळें तो उत्सव श्रीरामतीर्थावर होऊं लागला. या उत्सवास दूरदूरच्या देशांहून शास्त्री, हरिदास, वैदिक व विद्वान् ब्राह्मण, गवई वगैरे येत असत. या सर्वांची श्रीगणपतीपुढें हजरी होत असे व ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप श्री० आप्पासाहेब वाटखर्चीसुद्धां संभावना करीत असत. श्री० आप्पासाहेब यांस वेदश्रवणाचा फार नाद असे. ते वैदिक ब्राह्मणांचें रात्रौ जागरण करवीत. पेशवाई बुडाल्यामुळें वैदिक, शास्त्री इ० विद्वान् ब्राह्मणांचा आधार नाहींसा

झाला; परंतु ह्या राहिलेल्या पटवर्धन जहागिरदारांनीं वैदिकशास्त्री लोकांस बराच आश्रय दिला आहे.

श्रीमंत आप्पासाहेबांचा नियमितपणा. जमखिंडी संस्थानांतील नोकर व मजूरदार यांचा पगार पांच तारखेच्या आंत देण्याविषयीं आणि व्यापारी वगैरे लोकांचीं बिलें तावडतोब करून पैसा आदा करण्याविषयीं आप्पासाहेबांचा सक्त हुकूम असे. "रोखठोक जमखिंडीचे लोक" अशी म्हणच पडून गेली आहे.

श्रीमंत आप्पासाहेब यांनीं आपल्या मुखत्यारीनंतरच्या चव्वेचाळीस वर्षांच्या कारकिर्दींत सार्वजनिक कामें, दुष्काळी कामें, देवालयें, देवांच्या पुजाअर्चा, नैवेद्य व नंदादीप, दानधर्म व अन्नदान, प्राथमिक शिक्षणाचीं शाळागृहें यांकरितां लक्षावधि रुपये खर्च केले. त्यांत आश्चर्य हें कीं, श्रीमंत रामचंद्रराव आप्पासाहेब यांस पैशाची उणीव म्हणून कधींच भासली नाहीं. इतर कांहीं जहागीरदार कर्जबाजारी झाले, तसा प्रसंग त्यांजवर कधींच आला नाहीं. श्रीमंतांच्या अंतकाळीं त्यांच्या खाजगी खात्याकडे २,१३,४१३८८८५, देवस्थानाकडील ४३,०४४ रुपये, व दौलतीकडील ३,७९,१६६८१०८२ इतकी प्रत्येक खात्याकडे रोकड शिल्लक होती. शिवाय जडजवाहीर, सोनें, रुपें, मोतीं इत्यादिकांचे डागडागिने वगैरे होते.

श्रीमंतांनीं संस्थानांतील मोठमोठ्या गांवीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापून शाळागृहांपैकीं बहुतेक शाळागृहें नवीन बांधिलीं. शिक्षण खात्यावर लायक अधिकारी नेमून सर्व शिक्षणखातें त्यांजकडे सोंपविलें. स. १८५३ सालीं शिळेचा व १८५५ सालीं खिळ्याचा असे दोन छापखाने आणवून विद्याखात्याकडे दिले. शिळेवर साप्ताहिक "परशु" नांवाचें वर्तमानपत्र व इंग्लिश भाषेंत खिळ्यावर त्याची पुरवणी निघूं लागली. या छापखान्यांत लहानमोठीं भक्तिपर दुसरीं नाना तऱ्हेचीं पुस्तकें निघूं लागलीं. दौलतीकडील नोटिसा, समन्सें, हिशेबाचे नमुने वगैरे या छापखान्यांत छापून निघूं लागले.

श्रीमंत आप्पासाहेब महाबळेश्वरीं गेले म्हणजे तेथील अंध, पंगु वगैरे गोरगरिबांस वस्त्रें वांटीत असत व जेवणें घालीत असत. श्रीमंतांनीं १८९३ सालच्या जानेवारी महिन्यांत सर्व जातींस भोजन दिलें होतें. त्यास पंचवीस हजार रुपये खर्च आला.

श्रीमंतांची वडिलांबद्दल पूज्यबुद्धि. परशरामभाऊ व रामचंद्र आप्पासाहेब यांना युद्धप्रसंगामुळें दारूगोळा, स्वारशिबंदी वगैरेबद्दल अति कर्ज झालें होतें. तो धामधुमीचा काळ असल्यामुळें त्यांच्याकडून कर्जरोख्याची फेड झाली नाहीं. असे रोखे ज्यांच्याकडे होते ते आपले रोखे घेऊन आप्पासाहेबांकडे आले आणि म्हणाले, "आपल्या पूर्वजांनीं आमच्या पूर्वजांकडून कर्ज काढिलें. तें भरपाई झालें नाहीं. सदरहू कर्जरोखे पुष्कळ वर्षांपूर्वीं कायद्याबाहेर गेले असले तरी श्रीमंतांनीं आमच्या गरिबीकडे पाहून आपणांस परमेश्वरबुद्धि देईल त्याप्रमाणें द्रव्य द्यावें." तेव्हां आप्पासाहेबांनीं शक्य तितक्या थोड्या बहुत रकमा देऊन त्यांच्या संतोषानें वडिलार्जित कर्जरोखे परत घेतले.

देशोदेशींच्या लोकांच्या रीतिभाती काय आहेत, तेथील लोक आपापला व्यवहार कशाप्रकारें चालवीत आहेत, त्यांची स्थिति कशी आहे, तेथें व्यापारधंदा व शिक्षण कशाप्रकारें चालतें, हें सर्व समजून घेऊन अन्यत्र ज्या उत्तम रीतिभाती असतील त्या आपल्या परिजनांस लावाव्या, तसेंच योग्य व्यवहार व शिक्षण इकडे सुरू करावें, अशा प्रकारच्या स्तुत्य व लोकहितैक हेतूंनीं प्रेरित होऊन व मोठमोठीं नामांकित तीर्थें, स्थळें, शहरें व इमारती पहाण्याकरितां व त्याप्रमाणेंच महान् महान् पवित्र स्थानें व साधुसंत यांचें दर्शन घेण्याकरितां श्रीमंत आप्पासाहेबांनीं जलपर्यटन व देशाटन पायरस्त्यानें व आगगाडीनें पुष्कळ केलें.

सर परशरामभाऊ हायस्कुलांत गरीब विद्यार्थ्यांपासून फी वगैरे कांहीं एक घेत नसत. इतकेंच नव्हे, पण त्यांची जेवणाची सोयसुद्धां सरकारांतून केली जात असे.

श्रीमंतांस औरस संतति नसल्यामुळें दाजीसाहेब पटवर्धन चिंचणीकर यांचे नातु माधव यांस ता० १५ डिसेंबर १८९६ इ० रोजीं विधिपूर्वक दत्तक घेऊन त्याचें नांव परशरामभाऊ असें ठविलें. पुढें श्री० आप्पासाहेब ज्वर व बहुमुत्र रोग या दुखण्यानें पौष शु० १० शके १८१९ (१२।१।९७) या दिवशीं स्वर्गवासी झाले.

श्रीमंत आप्पासाहेबांचें निधन झालें त्या समयीं भाऊसाहेब वयांत आले नव्हते. म्हणून संस्थानचा राज्यकारभार इंग्रज सरकारानें चालविला. श्रीमंत भाऊसाहेब यांचें उच्च शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत व राजकोट येथील राजकुमार कॉलेजांत झालें. इ. स. १९०२ सालीं त्यांचा विद्याभ्यास पुरा झाला.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा विद्याभ्यास पुरा झाल्यानंतर त्यांनीं ठिकठिकाणचे रीतिरिवाज वगैरे पाहण्याकरितां सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. भाऊसाहेबांनीं आपला हिंदुस्थानांतील प्रवास पुरा केल्यानंतर कांहीं दिवस जमखिंडी येथें राज्यकारभाराची व कायदेकानूंची माहिती करून घेतली. इंग्रज सरकारानें भाऊसाहेब यांच्या अंगीं राज्यकारभार चालविण्याची पात्रता आल्याचें पाहून ता. ४ जून १९०३ इ० रोजीं श्रीमंतांस जमखिंडी संस्थानच्या गादीवर बसवून संस्थानची मुखत्यारी दिली. श्रीमंत भाऊसाहेब यांचा प्रथम विवाह इ. सन १९०० सालीं तालीकोटच्या घराण्यांतील पहिल्या वर्गाचे सरदार श्रीमंत बाळासाहेब रास्ते यांची कन्या ताईसाहेब यांच्याबरोबर रामतीर्थ येथें मोठ्या थाटानें झाला. ताईसाहेब यांचें नांव श्री. सौ. रमाबाईसाहेब असें ठेवण्यांत आलें. त्यांच्या पोटीं ता० ५ नोव्हेंबर सन



क्यापटन सर **परशुरामभाऊसाहेब पटवर्धन**
के. सी. आय. ई., जमखिंडी

बालोद्यान प्रेस, पुणें.

१९०६ इ. रोजीं श्रीमंत भाऊसाहेब यांस पुत्ररत्न झालें. पुत्राचें नांव श्री. शंकरराव उर्फ आप्पासाहेब असें ठेविलें. श्रीमंतांनीं पुत्रोत्सव मोठ्या थाटानें केला. सदर प्रसंगीं श्रीमंतांनीं आपल्या रयतेस सुमारें २ लाख रुपयांची सूट दिली व प्राथमिक शिक्षण मोफत केलें.

इतक्यांत एक दुःखाची गोष्ट घडून आली. ता. १ आक्टोबर स. १९०७ इ. रोजीं श्री. सौ. रमाबाईसाहेब कैलासवासी झाल्या. श्रीमंतांस व सर्व प्रजेस अत्यंत दुःख झालें. श्री० सौ० रमाबाईसाहेब यांचा स्वभाव फार थोर, उदार व मनमिळाऊ असा होता. त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा असून पतीच्या ठायीं निस्सीम प्रेम होतें. त्यांची रहाणी फार साधी असे. त्यांचें स्मारक म्हणून ' कै० श्री० सौ० रमाबाईसाहेब वाचनालय ' ही संस्था जमखिंडी येथें चालूं आहे.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा द्वितीय विवाह इ. सन १९०८ सालीं पुणें येथील सुखवस्तु गृहस्थ रा. गोपाळराव दामले यांची कन्या ठकुताई यांजबरोबर झाला. श्री० ठकुताई यांचें नांव रमाबाई असेंच ठेवण्यांत आलें. श्री० रमाबाई यांस एक कन्यारत्न आहे. इ० स० १९०९ त श्रीमंत भाऊसाहेब यांनीं युरोपखंडांत प्रवास केला व तिकडील कलाकौशल्य व हर-एक बाबींतलि सुधारणा पाहून आपल्या संस्थानांत तिकडील सुधारणांचा शक्य तो उपक्रम सुरूं केला. श्रीमंत भाऊसाहेब यांचा राज्यकारभार फारच चांगल्या प्रकारें चाललेला पाहून इ० स० १९१३ त सार्वभौम सरकारानें त्यांस के. सी. आय ई० हा बहुमानाचा किताब दिला. युरोप खंडांतील महायुद्धाचा वणवा भडकल्यावर इ. स. १९१५ त श्री. भाऊसाहेब हे सार्व-भौम सरकारच्या आज्ञेनें बरोबर मोटार अम्ब्युलन्स घेऊन फ्रान्समधील रण-भुमिवर गेले होते. युरोप खंडांतील महायुद्धावर प्रथम गेलेले दक्षिण महा-राष्ट्रांतलि हे पाहिलेच संस्थानिक होत. इ. स. १९१८ त श्रीमंत भाऊ-साहेब यांस साम्राज्य सरकारकडून ९ तोफांच्या सलामीचा मान व ऑनररी

क्याप्टनची रँक देण्यांत आली. याच सालीं हिंदुस्थान सरकारकडून मेसा-पोटेमियांतील ' रेडक्रॉस ' सोसायटीच्या कामाची पाहणी करून रिपोर्ट कर-ण्याबद्दल श्री. भाऊसाहेब यांची खास नेमणूक झाली. तेथील त्यांची काम-गिरी पाहून हिंदुस्थान सरकारनें आपला पूर्ण संतोष व्यक्त केला.

शिक्षणाच्या बाबतींत जमखिंडी संस्थान फारच पुढें आलें आहे. उच्च शिक्षणाची लालसा असणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्थानिकाकडून फारच चांगली मदत मिळते. श्रीमंत भाऊसाहेब यांना कलाकौशल्य व इमारती यांचा विशेष नाद असल्यानें ते गादीवर आल्यापासून त्यांनीं पुष्कळ सुंदर नवीन इमारती बांधाविल्या. त्यांत पोले प्यालेस व दरबार हॉल या दोन इमारती बऱ्याच खर्चाच्या व फार शोभिवंत झाल्या आहेत. श्रीमंत भाऊ-साहेब यांनीं सुमारें २५० नवीन इमारती बांधाविल्या. त्यांस सुमारें १४ लक्ष रुपये खर्च आला. जमखिंडी संस्थानांतील लोकांचा मुख्यत्वेंकरून शेतकी हा धंदा आहे. तथापि श्रीमंतांच्या उत्तेजनानें व द्रव्यादिकांच्या मद-तीनें इतर धंदेहि अस्तित्वांत येऊं लागले.

स्थानिक स्वराज्याच्या बाबतींत श्रीमंत उदारमतवादी असून त्यांनीं जमखिंडी येथील म्युनिसिपालिटीस स्वतः आपला अध्यक्ष निवडण्याचा अधि-कार दिला. जमखिंडी येथें लोकसभा नांवाची संस्था होती. ती लोकसभा श्रीमंत भाऊसाहेब यांना आपल्या सुधारणेच्या सूचना सुचवीत होती व श्रीमंतांना ज्या सूचना ग्राह्य वाटत त्यांचा ते स्वीकार करीत असत. श्रीमंत भाऊसाहेब यांच्या कारकिर्दींत संस्थानची भरभराट बरीच झाली होती. सार्व-भौम सरकारकडून राज्य सुधारल्याबद्दल बारंबार शिफारसी झाल्या होत्या. श्रीमंतांना शिकारीचा नादहि विशेष होता. श्रीमंत रामचंद्र आप्पासाहेब यांनीं देवस्थानाच्या नेमणुका, वेदविद्येस उत्तेजन, गणपत्युत्सव, विद्वान् ब्राह्मण, शास्त्री, पुराणीक, हरिदास, गवई इत्यादिकांस ज्या ज्या नेमणूकी चालू

केल्या होत्या, त्या त्या भाऊसाहेबांनीं तशाच चालू ठेवल्या. श्रीमंत आप्पासाहेब मराठी ग्रंथकारांस द्रव्यादि साह्य करून उत्तेजन देत होते. तोच क्रम श्रीमंत भाऊसाहेब यांनीं पुढें चालू ठेवला. देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्यामध्यें परस्पर शरीरसंबंध होण्यास खुद्द श्रीमंत जगद्गुरू शंकराचार्य यांचें आज्ञापत्र आहे. त्याप्रमाणें बावडा जहागिरिचे पंत अमात्य माधवराव मोरेश्वर यांनीं आपली कन्या श्रीमंत भाऊसाहेब यांचे चिरंजीव शंकरराव आप्पासाहेब यांस देण्याचें ठरविलें. उभयपक्षीं विवाहाचा पक्का निश्चय झाला. श्रीमंत भाऊसाहेब यांचा सदर लग्न फार बहारीचें करण्याचा विचार होता. म्हणून ते संस्थानांतील एका हत्तीस काम शिकवीत असतां हत्ती मस्त झाला व त्यानें श्रीमंतांस जोरानें फेकून दिलें. श्रीमंतास जबर दुखापत झाली. जवळ असलेल्या मंडळीस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आम्ही कांहीं आतां जगत नाहीं. जें लग्न ठरलें आहे तें करा. श्रीमंत ता० २५ फेब्रुवारी सन १९२४ रोजीं कैलासवासी झाले.

श्रीमंत भाऊसाहेब हे करारी, शिस्त पाळणारे, जिज्ञासू, धाडशी व पूर्वजांविषयीं अभिमान बाळगणारे होते.

पुढें श्रीमंतांच्या आज्ञेनुसार मंडळींनीं श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब यांचा विवाह श्रीमंत पंत अमात्य बावडेकर जहागीरदार यांच्या कन्येशीं केला. वधूचें नांव श्री० सौ० लिलावतीबाईसाहेब असें आहे. श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब हे जमखिंडीचे गादीवर बसले.

गेल्या सहा वर्षांत श्रीमंत आप्पासाहेब यांनीं जमखिंडी संस्थानचा राज्यकारभार उत्तम प्रकारें चालविला आहे. श्रीमंतांनीं जमखिंडीच्या ५० विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय केली. कुंदगोळ येथें हायस्कूल स्थापन केलें. बनहट्टीस अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल काढलें. धर्मार्थ व्हेटेरिनरी दवाखाना काढला. शेतकीप्रदर्शन भरविलें. हायकोर्ट बेंचाची स्थापना केली. जमखिंडींत पाणीपुरवठ्याची योजना केली. गोवधबंदीचा कायदा केला.

प्रभाबंदीचा कायदा रद्द केला जमखिंडी शहरास विजेचा प्रकाश देण्याची योजना आपल्या खाजगी उत्पन्नांतूनच ते करीत आहेत. त्यांनीं एका ठिकाणीं भाषण करतांना असे उद्गार काढले कीं, " अलीकडे लोकांच्या मनांत राजकीय हक्कांबद्दल जी जिज्ञासा जागृत झाली आहे त्याबद्दल आपणाला (म्ह० श्रीमंतांना) सहानुभूति वाटत आहे. प्रजेनें राज्यकारभारांत जबाबदारीनें भाग घेतल्यास त्यांत आपणांस आनंद वाटेल. श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब यांनीं आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ न्यु पूना कॉलेजास दोन लक्ष रुपये देणगी देऊन त्या कॉलेजास आपल्या वडिलांचें 'सर परशरामभाऊ कॉलेज' असें नांव देवविलें. त्या कॉलेजांत जमखिंडीच्या रहिवाशांच्या मुलांची मोफत उच्च शिक्षणाची सोय करविली. इतर ठिकाणच्या गरीब लोकांची सोय करविली. हल्लीं यांची कारकीर्द चालू आहे. ईश्वर श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब यांस पुष्कळ आयुष्य देवो !

१९२१ सालीं संस्थानची लोकसंख्या १,०१,१९४ होती. या संस्थानांत ८८ गांवें आहेत. गहूं व कापूस हीं मुख्य पिकें होत. दक्षिण महाराष्ट्रांतील पहिल्या प्रतीचे सरदार म्हणून येथील संस्थानिकांस मान आहे. संस्थानचें उत्पन्न (इनामी रक्कम सोडून) ७,१९,४५७ रुपये आहे. संस्थानिकास ब्रिटिश सरकारास २०,५१५ रु० खंडणी द्यावी लागते. संस्थानिक व त्यांचा परिवार यांच्या खाजगी खर्चास पृथक् तनखा ठरवून दिला असल्यानें संस्थानच्या बजेटांत घोंटाळा होत नाहीं. शिक्षणखात्याकडे सढळ हातानें खर्च होतो. शिक्षणाकडे ७७,०२९ रु० खर्च होतो. गरीब विद्यार्थ्यांना फीची माफी असून दोन वेळां पुरेल इतकी मधुकरी मिळते. मराठी प्राथमिक शिक्षण मोफत असून सक्तीचें आहे. इंग्रजी हायस्कूल व अंग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल यांत फी अगदीं थोडी घेतात. संस्थानचा जुना ग्रंथसंग्रह व अजबखाना अमोलिक आहे. येथील वाचनालयासहि सरकारी मदत आहे. शेतकीच्या उत्कर्षासाठीं दर साल शेतकी प्रदर्शन भरविलें जातें.

संस्थाननें पाण्याच्या सोयीसाठीं लक्षावधि रुपये खर्च केले आहेत. परंतु तें त्याबद्दल प्रजेकडून एक पैसुद्धां घेत नाहीं. संस्थानांत सर्वत्र दवाखाने आहेत; ६ म्युनिसिपालिट्या आहेत; एक हायस्कूल, तीन अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल्स, एक संस्कृत पाठशाळा, एक रात्रीची शाळा, ७४ प्राथमिक शाळा, (मुलांच्या, मुलींच्या व अस्पृश्यांच्या धरून) इतक्या शिक्षणसंस्था आहेत. शिक्षितांचें प्रमाण शेंकडा ६६ आहे. जमखिंडीस एक सरकारी ब्यांक आहे. संस्थानांत स्यानिटरी कमिट्या बऱ्याच आहेत.

मिरजकर पटवर्धन.

पटवर्धनांचा मूळ पुरुष हरिभटबाबा. यांच्या सात मुलांपैकीं चौथे पुत्र गोविंदराव. इचलकरंजीकरांतर्फे हरभटाच्या गोविंदराव या मुलास थोरल्या बाजीरावानें आपल्या ५२ पागांपैकीं इंद्रोजी कदम याच्या पागेची इ. स. १७३० त फडणविशी दिली. पुढें इंद्रोजी कदम थोड्याच दिवसांनीं वारला. त्यास मुलगा नव्हता म्हणून पेशव्यांनीं त्याची पागा गोविंदराव यास दिली. गोविंदरावानें कर्नाटकांत थोरले माधवराव साहेब यांच्या बरोबर हैदरअल्लीशीं मोठमोठ्या भयंकर लढाया केल्या. या लढायांत त्यांचे पुतणे परशरामभाऊ व निळकंठ त्र्यंबक यांनीं बऱ्याच लढाया मारल्या व मोठा पराक्रम गाजविला. म्हणून इ. स. १७६४ त थोरले माधवराव यांनीं ८,००० स्वार ठेवण्यासाठीं २५ लक्षांचा सरंजाम या तिघांच्या नांवें करून दिला. गोविंदरावाचा मुलगा गोपाळराव हाहि मोठा पराक्रमी निपजला. (याच्या पराक्रमाबद्दल जमखिंडी संस्थानच्या हकीकतींत पुष्कळ माहिती दिली आहे.) गोपाळरावानें राघोबादादाविरुद्ध थोरले माधवराव ह्यांचा

पक्ष स्वीकारला. या कारणास्तव राघोबानें पटवर्धनांकडून मिरज जबरीनें घेतलें, म्हणून गोपाळराव निजामास जाऊन मिळाला. पुढें माधवरावानें त्याची समजूत करून त्याचें मिरज गांव त्यास परत दिलें. गोपाळरावानें हैदर व भोंसले ह्यांच्या स्वाऱ्यांत प्रामुख्यानें भाग घेतला. कर्नाटकांत त्याचा विलक्षण दरारा असे. हैदरावरील एका स्वारींत त्याची प्रकृति बिघडली, म्हणून तो मिरजेस आपल्या जहागिरीच्या गांवीं आला. इ. स. १७७१ त तो तेथेंच आपल्या वयाच्या ४२ व्या वर्षी वारला. तो शूर, करारी व मुत्सद्दी होता. पुत्रशोकानें थोड्याच दिवसांत गोविंदरावीहि मरण पावले. नंतर गोपाळरावाचे कनिष्ठ बंधु वामनराव यांस इ. स. १७७३ त मिरजेची सरदारी मिळाली. वामनरावहि परशुरामभाऊबरोबर हैदराच्या स्वाऱ्यांत हजर असे. त्यानेंहि हैदराबरोबर पुष्कळ लढाया मारल्या. बारभाईच्या कारस्थानांत वामनराव हा त्यांच्या बाजूस होता. भोंसल्यावरील स्वारीस जात असतां १७७५ त खानदेशांतील वरणगांव येथें तो वारला. नंतर मिरजेची सरदारी त्याच्या पांडुरंग नांवाच्या धाकट्या भावास मिळाली. पांडुरंगरावांची स्वारी शिकारीवर जाई आणि त्यांचा धाकटा भाऊ गंगाधरराव हा मिरजेचा कारभार पाही. पांडुरंगराव ह्यांस एका लढाईत हैदरानें पकडलें व जन्मभर बंदींत ठेवलें. गंगाधरराव हा इ. स. १७९५ त निजामाबरोबर झालेल्या खर्ड्यांच्या लढाईत होता. या लढाईत यांनीं मोठा पराक्रम केला. ह्याबद्दल पेशवे सरकाराकडून ह्यास पालखी व बहुमोलाचीं वस्त्रें मिळालीं. पुढें गंगाधर गोविंद व पांडुरंगरावाचा सर्वांत धाकटा मुलगा चिंतामणराव ह्या चुलतेपुतण्यांत सरंजामाबद्दल भयंकर तंटे लागले. हे तंटे इतके विकोपास गेले कीं, इ० स० १८०१ त चिंतामणरावानें सैन्य जमवून मिरजेवर स्वाऱ्यांवर स्वाऱ्या केल्या. गंगाधरराव हा मुत्सद्दी असून नाना फडणविसाच्या मर्जींतला होता. अखेर अनेक मोठमोठ्या लोकांच्या मध्यस्तीनें सरंजामाची वांटणी होऊन ४,७९,७९८

रुपयांची मिरजेची जहागीर गंगाधररावास मिळाली. ६,३५,१७८ रुपयांची जहागीर चिंतामणरावाच्या वांट्यास आली. शिवाय सांगलीचा किल्ला बांधण्याकरितां चिंतामणरावास एक लक्ष रुपये मिळाले. ही गोष्ट इ० स० १८०८ त घडली. गंगाधर गोविंद पटवर्धन उर्फ बाळासाहेब पटवर्धन हे भोसले, हैदर नाईक, धोंडजी वाघ वगैरे शत्रूंबरोबर झालेल्या लढायांत होते. गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन यांनीं मिरज येथील कृष्णाबाईचा घाट, माधवजी व गणपती यांचीं देवालयें, तळीं, धर्मशाळा वगैरे लोकोपयोगी कामें केलीं. हे सन १८०९ त* मरण पावले. यांना केशवराव, नारायणराव, माधवराव, गोपाळराव, गोविंदराव व वामनराव असे सहा पुत्र होते. यांपैकीं केशवराव हे अल्पवयांतच मृत्यु पावले. स. १८१२ त नारायणराव हे मिरज जहागिरीचे गादीवर बसले. याच सालीं कंपनी सरकारच्या मध्यस्तीनें पेशवे सरकार व पटवर्धन सरदार मिरजकर ह्यांच्यामध्यें पंढरपूर मुक्कामीं तह झाला. हे सन १८१७ त मृत्यु पावले. यांना गणपतराव व मोरेश्वर आबा असे दोन पुत्र होते. गणपतराव तात्यासाहेब हे अल्पवयी असल्यामुळें यांचे चुलते माधवराव गंगाधर हे कारभार पहात होते. त्यांनीं तात्यासाहेबांच्या वतीनें स. १८१९ त गलगले मुक्कामीं कंपनी सरकारशीं तह केला. त्यांत ३०० स्वार चाकरीस ठेवण्याचा करार केला. तात्यासाहेबांचे चुलते गोपाळ गंगाधर यांनीं स. १८२० त इंग्रज सरकारास आपणास दौलतीचा हिस्सा मिळावा म्हणून थैल्या लिहिल्या. त्यावरून ता. ३ मे १८२१ रोजीं सरकारचा ठराव होऊन मेहेरबान चापलिनसाहेब बहादुर यांनीं किल्ला व त्याखालील ६५ हजारांचा सरंजाम वेगळा काढून बाकी राहिलेल्या दौलतीचे चार भाग केले. गणपतराव

---

* यांचे पुतणे चिंतामण पांडुरंग हे सांगली संस्थानचे मालक झाले. ती सांगली संस्थानची हकीकत निराळी देणार आहोंत.

नारायण यास मिरज दौलत, (२) माधवराव गंगाधर यास मिरजमळा, (३) कृष्णराव गोविंद यांस सोनी संस्थान (खालसा), गोपाळ गंगाधर यांस सुपारी बाग (खालसा), गणपतराव तात्यासाहेब यांस किल्ला व त्याखालील सरंजाम देऊन शिवाय वडीलपणाबद्दल २८ हजारांचा सरंजाम जास्त दिला. गणपतराव तात्यासाहेब सन १८३३ त स्वर्गवासी झाले. त्यांना पुत्र दोन– गंगाधरराव व नारायणराव. नंतर वडील पुत्र गंगाधरराव हे मिरजेच्या गादीवर बसले. गंगाधरराव उर्फ बाळासाहेब हे अल्पवयी होते, म्हणून दौलतीचा कारभार त्यांचे चुलते मोरेश्वर उर्फ आबासाहेब हे पाहूं लागले. कारभारी आबासाहेब हे १८३९ त वारले. नंतर गोविंदराव खाडीलकर व भास्करराव जोशी हे कारभारी झाले. यांनीं अवाच्या सवा खर्च करून दौलतीस अतोनात कर्ज केलें. मिरज संस्थानांत सर्वत्र अव्यवस्था माजली. नंतर इंग्रज सरकारनें वरील दोन कारभाऱ्यांस हांकून देऊन आपल्यातर्फे रा. ब. विनायक कृष्ण पंडित यांस स. १८४४ त कारभारी नेमलें. रा. ब. पंडित यांनीं संस्थानचें सर्व कर्ज फेडलें. तिजोरींत शिल्लक वाढविली, नोकरचाकर लोकांचे थकलेले पगार चुकते केले व संस्थानची चांगली व्यवस्था केली. श्रीमंत बाळासाहेब हे वयांत आले म्हणून ता. १ फेब्रु० स. १८४९ इ. रोजीं इंग्रज सरकारनें श्रीमंत बाळासाहेब यांस मुखत्यारी देऊन त्यांच्या स्वाधीन दौलत केली. स. १८५७ च्या बंडांत हे इंग्रज सरकारशीं चांगले वागले म्हणून इंग्रज सरकारांनीं बाळासाहेबांचे आभार मानले. स. १८५९ त इंग्रज सरकारनें यांस दत्तक घेण्याची मंजुरी दिली. श्रीमंतांनीं किल्ल्यांतील बाळंभटाच्या घराण्यांतील लिंबकराव पटवर्धन यांस ता० १४ आक्टो० स. १८६१ रोजीं दत्तक घेऊन त्यांचें नांव गणपतराव तात्यासाहेब असें ठेविलें. दत्तक घेतल्यानंतर ता. २२ डिसें० १८६१ इ. बाळासाहेब कालवश झाले. गणपतराव तात्यासाहेब हे अल्पवयी असल्या- मुळें इंग्रज सरकारनें संस्थानावर रा. ब. गणेश नारायण काळे यांस कार-



सर सरदार गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन
के. सी. आय. ई., मिरज.

बालोद्यान प्रेस, पुणें.

भारी नेमिलें. यांनीं जमिनीची सर्वे व तरम जमाबंदी करून तिजोरींत शिल्लक पाडिली. यांनीं मिरज शहरांत नळानें पाणी आणलें.

श्रीमंत तात्यासाहेब यांचा मराठी व इंग्लिश अभ्यास बेळगांव येथील सरदार हायस्कुलांत झाला. पुढें यांनीं कायद्याची माहिती करून घेतली. नंतर हे वयांत आल्यावर ता. २३ डिसें० १८७१ इ० रोजीं इंग्रज सरकारांनीं त्यांस मिरज संस्थानची मुखत्यारी दिली. यांनीं संस्थानांतील लहानमोठ्या कामगारांचे पगार वाढविले, बाहेरून येणाऱ्या मालावरील जकात माफ करून व्यापार वाढविला व मिरज शहरांत दवाखाना व लायब्ररी स्थापन केली. इंग्रज सरकारनें यांची विद्वत्ता व हुशारी पाहून त्यांना मुंबई इलाख्याच्या कायदे-कौन्सिलचे सभासद नेमिलें. यांनीं तीनच वर्षें राज्य करून ते ता० ८ नोव्हें० स. १८७४ इ० रोजीं परलोकवासी झाले. याच्या योगानें यांच्या प्रजेस फार दुःख झालें.

कै० तात्यासाहेब यांच्या थैलीवरून इंग्रज सरकारानें त्यांच्या कुटुंबाच्या मांडीवर सांगलीच्या घराण्यांतील गणपतराव विनायक उर्फ बाबासाहेब पटवर्धन यांचे द्वितीय पुत्र गोपाळराव यांस दत्तक देववून त्यांचें नांव गंगाधरराव उर्फ बाळासाहेब ठेविलें. श्रीमंत बाळासाहेब अल्पवयी असल्यामुळें रा. ब. गणेश मार्तंड बडवे यांस मिरज संस्थानचे कारभारी नेमलें. रा. ब. बडवे पेन्शनींत निघाल्यानंतर रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर यांस मिरज संस्थानचे कारभारी नेमलें. स. १८७७ सालच्या दुष्काळांत यांनी सर्व संस्थानभर दुष्काळी कामें काढून हजारों लोकांचे प्राण वांचविले. मिरज येथें टॉऊन हॉल ही इमारत बांधिली. रा. ब. केळकर यांची बढती होऊन ते इंग्रज सरकाराकडे गेले. पुढें इंग्रज सरकारानें रा. ब. कल्याण सीताराम चित्रे ह्यांस मिरज संस्थानचे कारभारी नेमलें. करवीर मुक्कामीं श्रीमंतांचा मराठी व इंग्रजी आभ्यास पुरा झाला.

श्रीमंत राजदरबारीं कामाच्या माहितीकरितां मिरजेस आले व त्यांनीं त्या कामाची माहिती करून घेतली. ता. ७ फेब्रु० स. १८८७ त श्रीमंतांच्या वयास २१ वर्षें पूर्ण झालीं. पुढें लवकरच मे० कर्नल रिव्हज्साहेब बहादूर, पो. एजंट, प्रांत कर्नाटक व करवीर, यांनीं मिरज मुक्कामीं मोठा दरबार भरवून मोठ्या समारंभानें श्रीमंतांस मिरज संस्थानची पूर्ण मुखत्यारी दिली. श्रीमंतांच्या हातांत राज्यकार येतांच पुष्कळ दिवसांपासून सायर बाब व जकात वगैरे रयतेस त्रासदायक असलेल्या ३३ बाबी माफ केल्या; मिरज शहरांत व संस्थानच्या मोठ्या गांवीं म्युनिसिपालिट्या स्थापन केल्या; संस्थानांत सार्वजनिक सडका नवीन करून जुन्या सडकांची दुरुस्ती केली. मिरजेस पाण्याचे नळ आणून पाण्याचे हाल बरेच दूर केले. मिरज टाऊन हॉलसभोंवतीं बाग होती, त्या बागेचा विस्तार करून त्यांत नाना तऱ्हेचीं सुंदर फुलझाडें व मधुर फळझाडें लावलीं. मिरज येथें इंग्रजी हायस्कूल स्थापन केलें. सदर हायस्कुलांतून हजारों विद्यार्थी मॅट्रिक परीक्षा पास होऊन पुढील व्यवसायास लागले आहेत. श्रीमंतांना तालमीचा मोठा व्यासंग आहे. मिरज येथें विजापूर वेशीजवळ हजारों रुपये खर्च करून एक सुंदर नाटकगृह बांधविलें आहे. सन १९०३ सालीं दिल्ली येथें जो बडा दरबार भरला होता, त्यावेळीं श्रीमंतांना ब्रिटिश सरकारांतून के. सी. आय. ई. ही बहुमानाची पदवी मिळाली. श्रीमंत बाळासाहेब यांनीं गरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय फार उत्तम केली आहे. अगदीं गरीब विद्यार्थ्यांस फीची माफी असून प्रत्येक गरीब विद्यार्थ्यास दोन वेळेस पुरेल इतकी भरपूर मधुकरी देतात. मिरजेंत पांथस्थांकरितां अन्नछत्र आहे. याशिवाय पांथस्थांकरितां नृसिंहवाडी येथें व औदुंबर येथें निरनिराळीं दोन अन्नछत्रें श्रीमंतांनीं चालविलीं आहेत. प्रातःकाळीं उठून स्नानसंध्या करून नमस्कार घालण्यास ते कधींच चुकत नाहींत. इतक्या उतार वयांत सुद्धां ते दररोज ४५० नमस्कार घालीत आहेत. ते नमस्कार घालूं लागले

म्हणजे एक कारकून नमस्कार मोजीत असतो. त्यांच्या गणेश कलागृहांत पुरुषभर उंचीच्या पेट्या तयार होत असलेल्या दिससील; घड्याळें तयार करण्याचें काम चाललेलें दिसेल. एका टांचणीपासून अवाढव्य लांबी-रुंदीच्या गालिच्यांपर्यंत सर्व तऱ्हेचें हुन्नरकलांचें काम ते करतात. गणेश कलागृहाची किंमत १० लक्ष रुपये होईल. त्यांचा खाजगी ग्रंथसंग्रह फार मोठा आहे. एन्सायक्लोपिडियापासून सामान्य दर्जाच्या पुस्तकांपर्यंत सर्व तऱ्हेचीं पुस्तकें त्यांच्या संग्रहीं आहेत. दर महिन्यास सरासरीं ते हजार रुपयांचीं पुस्तकें मागवितात. विलिंग्टन कॉलेजला त्यांनीं आपली लॅबोरेटरी व लायब्ररी दिली आहे. त्यांच्याकडे आश्रयार्थ येणारा गृहस्थ कधींच विन्मुख जात नाहीं. हिंदु-मुसलमान, ब्राह्मण ब्राह्मणेतर हे भेद त्यांच्याठायीं नाहींत. धार्मिक संस्था उपयोगी आहे अशी त्यांची खात्री झाली तर त्या संस्थेस ते देणगी देतात. मिरजेच्या देवस्थानाची व्यवस्था नीट चालावी म्हणून ४ लक्ष रुपयांचा नुकताच ट्रस्ट केला आहे. श्रीमंतांना नारायणराव उर्फ तात्यासाहेब व हरिहरराब उर्फ दादासाहेब नांवांचे दोन पुत्र आहेत. एक दुःखकारक हकीकत घडली. श्री. सौ० बहिनीसाहेब यांचें अकालीं निधन झालें. श्री० सौ० बहिनीसाहेबांची पतिनिष्ठा, त्यांचें पुत्रप्रेम, प्रजावात्सल्य व धर्मनिष्ठा इ० गुण अवर्णनीय होते. श्री० सौ० बहिनीसाहेबांच्या अकाली निधनानें श्रीमंतांना व सर्व महाराष्ट्राला अत्यंत दुःख झालें.

मिरज संस्थानास 'मोठी पाती' असें म्हणतात. या संस्थानांत ६२ गांवें आहेत. स. १९२१ सालीं लोकसंख्या ८२,५८० असून वसूल दरसाल रु. ३,८६,९६२ असतो. इंग्रज सरकारांस दरसाल १२,५५८ रुपये खंडणी द्यावी लागते.

मिरज किल्ल्यांतील पटवर्धन

हरभटबाबांचे द्वितीय चिरंजीव बाळंभट आण्णा यांच्या वंशाची माहिती.

बाळंभट आण्णा आपले परमपूज्य तीर्थरूपासन्निध कुरुंदवाड येथें रहात असत. आण्णांची सुशील पत्नि सौ० काशीबाई हिला पुष्कळ दिवसांत मूल झालें नव्हतें. म्हणून तिनें श्रीमयुरेश्वराची आराधना केली. श्रीच्या कृपेनें तिजला पुत्र झाला म्हणून त्याचें नांव मयूरेश्वर असें ठेविलें. तो आपला चुलता गोविंद हरि याजबरोबर पुण्यास आला. गोविंद हरि यांनीं आपला मुलगा गोपाळ याजबरोबर त्यास त्या कालानुरूप योग्य तें शिक्षण देऊन मुत्सद्दीपणा, मुलूखगिरी वगैरे कामाची माहिती करून दिली व त्यांस हिशेबी कामांतहि तरबेज केलें. गोपाळराव व मोरोबा हे जिवश्च कंठश्च स्नेही होते. ते राजकारणांत व लष्करी कामांत एकमेकांच्या विचारानें वागत. नंतर लवकरच पुण्यांत श्रीमंतांशीं त्यांचा परिचय झाला. या बंधुद्वयास श्रीमंतांनीं आपल्या खास दिमतींत घेऊन महाल मुलुखगिरीच्या स्वारीवर नेलें. तेथें त्या उभयतांची एकनिष्ठ सेवा व शौर्य पाहून श्रीमंत पुण्यास आल्यावर त्यांना मोठें बक्षीस देऊन खास पागेंत कारकुनी काम दिलें.

स. १७४६ त दमाजी गायकवाड याजबरोबर जी पेशव्यांची लढाई झाली, त्या लढाईंत गोविंद हरि व त्यांचा मुलगा गोपाळराव व पुतण्या मोरोबा हे पेशव्यांतर्फे गायकवाडाशीं लढत होते. या लढाईत पटवर्धनांनीं गायकवाडांचा पराभव करून त्यास कैद केलें. त्याचप्रमाणें स. १७५६ त त्यांनीं सावनूरकर नबाबाशीं युद्ध करून त्याचा पराभव केला. याच्या योगानें सावनूरकर नबाबानें श्रीमंतांशीं मोठ्या मिनतवारीनें तह केला. स. १७६३-६४ मध्यें हैदरानें सावनुरास वेढा दिला. वरील तहाप्रमाणें सावनूरकर नबाबास साह्य करण्याकरितां पेशव्यांनीं गोविंद हरि, गोपाळराव व मोरो

आबा ह्यांस पाठविलें होतें. सावनूरकर नबाब व पटवर्धन मंडळीं यांनीं हैदराशीं लढाई करून त्यास वेढा उठविणें भाग पाडलें. त्यांच्याच मदतीनें नबाबावरील संकट दूर झालें. ह्या मदतीचा व स्नेहभावाचा मोबदला म्हणून सावनूरकर नबाबानें स. १७६५ त गोपाळ गोविंद यास ठाणें दोदवाड आणि मोरो बल्लाळ यांस गुडदहुली, कट्टीमहाल व करजगी हे गांव वंश-परंपरेनें इनाम करून दिले. त्या सनदेअन्वयें श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनीं स. १७७० त नवीन सनद करून देऊन तीं इनाम गांवें पुढें चालविलीं.

श्रीमंत थोरले माधवरावसाहेब यांनीं कर्नाटकांत हैदर व इतर संस्था-निक यांजवर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांत गोपाळराव व मोरोबा आबा हे पटवर्धनबंधुच प्रमुख होते. गोपाळराव अघाडीवर रहात व मोरोबा आबा तळावर श्रीमंतांच्या सन्निध राहून लष्करी डावपेंच व स्वारीच्या हालचालींची सल्लामसलत देत व इतर सूत्रें संभाळीत. अशा रितीनें नेहमीं दरबारच्या कामीं व मुलुखगिरींत संस्थानिकांची खंडणी, ठराव वगैरे प्रकरणीं मोरोबा आबाच्या चातुर्याचा फारच उपयोग झाला. म्हणून पुणें दरबारीं त्यांचें वजन होतें. गोविंद हरी व इतर पटवर्धन सरदारांप्रमाणें मोरो बल्लाळ यासहि साडेतीन वस्त्रांचा मान मिळून जातीचा सरंजामहि मिळाला. इ. स. १७५१ त पट-वर्धनांस पेशवे सरकारांनीं तैनात जाबता करून दिला. त्यांत गोविंद हरीस ४०,००० रुपये, व मोरो बल्लाळ यांस ४,००० रुपये तैनात जाबता करून दिला. नंतर इ. स. १७६३।६४ मध्यें सर्व पटवर्धन सरदारांच्या वतीनें गोविंद हरी यांच्या नांवें बेहडा करून २५ लक्षांचा मुलूख लावून दिला. या वेळीं १,००० रुपयांचा जात सरंजाम दिला. एकंदर ५,००० रुप-यांचा जात सरंजाम मोरो बल्लाळ यांच्या नांवें स्वतंत्र नमुद आहे. त्याच-प्रमाणें इ. स. १७७२।७३ च्या बेहड्यांतहि मोरो बल्लाळ यांचे चिरंजीव श्रीपतराव मोरो याच्या नांवें नमुद आहे. त्याबरहुकूम सुरू अर्बासितैन

मया व अलफ ह्या सालच्या गोविंद हरी, परशराम रामचंद्र व निळकंठ त्र्यंबक यांजमधील भाऊबंदांच्या तैनाती पेशजीच्या असतील त्या चालवावयाच्या असा करारांतहि उल्लेख आहे. यांखेरीज गोविंद हरी व गोपाळराव यांस ज्या ज्या वेळीं पेशव्यांकडून इनाम जमिनी व कुरणें वगैरे मिळत असत, त्या त्या वेळीं मोरोबा आबा यासहि मिळत असत. गोविंद हरीस कुटुंब ठेवण्याकरितां मिरजेचा किल्ला दिला. त्याच किल्ल्यांत मोरोबासहि घर बांधण्यास जागा देण्यांत आली. मोरोबांनीं किल्ल्यांत निराळा वाडा बांधिल्यामुळें त्यांच्या वंशजास किल्ल्यांतील पटवर्धन असें म्हणतात. वेहेड्यांतील ५,००० रुपये सरंजामाखेरीज मोरोबास हरिभट बाबांनीं संपादन केलेले कोतवडे आणि गणेशवाडी येथील इनाम आणि श्रीमंत पेशवे यांच्याकडून मिरज, सांगली, बाटेगांव, कवठे एकंद, कवठे गुळंद, जुगुळ वगैरे ठिकाणीं इनाम जमिनी मिळाल्या. यांखेरीज गोविंद हरी यांनीं स्वतः प्रेमाचें द्योतक म्हणून आपल्या बरोबरीनें खास शिबंदीचे चौकीदार, उंट, घोडेस्वार व चंदीसामानासुद्धां खर्चाची एक आदा चालवणूक दिली होती. अशा रीतीनें मोरोबाचें वैभव दिवसेंदिवस वाढून त्यांनीं कित्येक सरदार, सरंजामदार वगैरेस कर्ज देऊन ऋणी केलें होतें. त्यांच्या कर्तृत्वाची व वैभवाची दरबारी लोकांवर मोठी छाप होती. मोरो आबा नेहमीं पुणेंदरबारीं राहून कारभाराचीं व कारस्थानाचीं सुत्रें संभाळीत व गोपाळ गोविंद स्वारीवर असत. गोविंद हरी व मोरोबा आबा यांच्याच तालमींत तयार झालेले नारायणराव कृष्ण हे गोपाळरावाचे कारभारी होते. हे इ० स० १७६५ त वारले. पुढें गोविंद हरी इ० स० १७७१ त वारले. यामुळें पटवर्धन दौलतीचा कारभार मोरोबा आबाच पाहात असत. इ. स. १७७३ त मोरोबा आबाची प्रकृति बिघडल्यामुळें ते नृसिंहवाडीस जाऊन राहिले, अनुष्ठानें कराविलीं व क्लेशनिवाणार्थ सुवर्णाची तुला करून दानधर्म केला. ते १७७४ त वारले. यांनीं लोकोपयोगी पुष्कळ कामें केलीं. मिरज

येथें श्री काशीविश्वेश्वराचें देवालय बांधिलें. देवालयानजीकच धर्मशाळा बांधिली. कुरुंदवाड येथें मयुरेश्वराचें देवालय बांधिलें. पुळ्याच्या गणपतीपुढे दीपमाळ बांधिली.

त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव श्री० श्रीपतराव हे मिरज किल्ला संस्थानचे अधिपति झाले. श्रीपतराव यांचें सर्व शिक्षण वडिलांच्या हाताखालीं पांडुरंग गोविंद व गंगाधर गोविंद यांच्याबरोबर झालें. पांडुरंगराव व गंगाधरराव हे मुत्सद्दीपणांत व कारभारांत तरबेज झाले. श्रीपतराव हे लष्करी डावपेंच व स्वाऱ्या शिकारींत तरबेज झाले. इ. स. १७७६च्या श्रीरंगपट्टणच्या लढाईंत पटवर्धनाच्या छावणीवर हैदरानें अकस्मात् छापा घालून पांडुरंगराव व श्रीपतराव यांना धरून नेऊन कैदेंत ठेविलें. श्रीरंगपट्टणाच्या किल्ल्यांत कैदेंत असतां पांडुरंगरावतात्या अतिसाराच्या बिकारानें मृत्यु पावले.

श्रीपतराव व त्याच्याबरोबर असलेल्या मंडळींनीं हैदराचा दरोगा अंची शामय्या म्हणून कामगार होता, त्याच्यामार्फत कांहीं राजकारण करून खंड भरून सुटका करून घेण्याची खटपट चालविली. हैदरानें मुख्य खासे श्रीपतराव याजबद्दल एक लक्ष ऐशीं हजार रुपये खंडणी मागितली. एवढी मोठी रक्कम परमुलखांत शत्रूच्या ताब्यांत असलेल्यास कोण देणार ? तथापि श्रीपतराव याची आजी काशी काकी फार खटपटी बाई होती. तिनें कर्नाटकांतील कोणी राघवेंद्र नाईक नकाते नांवाच्या सावकाराकडे हमी देऊन, त्याच्याकडून एक लक्ष ऐशीं हजार रुपये घेऊन व हैदराकडे भरपाई करून श्रीपतराव याची सुटका करविली. श्रीपतराव तीन वर्षें पट्टणच्या किल्ल्यांत कैदेंत होता. श्रीपतरावानें आपणास हैदरास द्यावा लागलेला दंड एक लक्ष ऐशीं हजार रुपये पुणें दरबारास मागितला. पुणें दरबार राघोबाच्या कारस्थानामुळें अगदीं काहून गेलें होतें. त्यास हैदराकडे पहाण्यास राघोबामुळें सबड होती कोठें ? त्या वेळीं पेशव्याच्या फौजेचे मुख्य सेनापति प्रसिद्ध

परशरामभाऊ पटवर्धन हे होते. त्यांच्याबरोबर प्रत्येक स्वारींत श्रीपतराव हजर असत. श्रीपतराव हे शूर व धाडसी असल्यानें परशरामभाऊंची व यांची चांगली मैत्री जडली. ती मैत्री अखेरपर्यंत कायम होती. पट्टणकुडीच्या लढाईंत परशरामभाऊ ठार झाले. पटवर्धनी फौजा सैरावैरा घांवत सुटल्या. सर्व फौजेंत चलबिचल झाली. श्रीपतराव ह्यांस शत्रूच्या स्वारांनीं वेढलें. एका स्वारानें त्यांच्या पाठींत जोरानें भाल्याची फेंक केली. भाल्याचें टोंक पाठींत घुसलें. तेव्हां श्रीपतरावांनीं कमरेच्या तेग्यानें भाल्याची काठी छाटली व ते पाठींत घुसलेल्या भाल्याच्या पात्यासह दौड करून कृष्णानदीच्या उतारानें आपल्या हद्दींत आले व पाठींत घुसलेलें भाल्याचें पातें उपसून काढविलें. नंतर ते जखमेवर तावडतोब उपचार करवून मिरजेंत आले. यांना यांच्या वडिलांप्रमाणें पुणें दरबारांत साडेतीन वस्त्रांचा मान होता.

यांनीं संपादन केलेलें उत्पन्न. गोडी कोप व हलकल या गांवांच्या इनामाच्या सनदा; वसगडे येथील इनाम जमीन; मुळगुंद येथील फडणविसी; कर्नाटक प्रांतांतील जकात, औरंगाबाद अमदाबाद व मंदोसर इत्यादि प्रांतांची कमाविसी वगैरे हक्कहि बरेच काळपर्यंत यांनीं उपभोगिले व सांगली, ऐनापूर व मिरज येथें वाडे बांधिले. यांनीं दुसरीं पुष्कळ कामें केलीं. स्थळसंकोचास्तव तीं येथें देतां येत नाहींत. इतक्यांत एक दुःखकारक गोष्ट घडून आली. श्रीपतराव यांचा मुलगा मोरेश्वर हा वयाच्या सविसाव्या वर्षीं वारला. पुत्रशोकाच्या योगानें पुढें थोड्याच दिवसांनीं श्रीपतराव मृत्यु पावले. श्रीपतरावाच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधु यांनीं सरंजामाची व्यवस्था आपल्या हातीं घेतली. इ. स. १७८८ त बळवंत मोरेश्वर यांनीं आपल्या सरंजामाची मागणी केली. त्यावेळीं मिरज-कुल सरंजामाचा कारभार गंगाधरराव पहात होते. त्यांनीं श्रीपतराव ह्याच्या सरंजामापैकीं २,८०० रुपये वसुलाचे दोन गांव दहिवडी व वायफळे सन १८१३ त बळवंतराव मोरेश्वर यांच्या स्वाधीन केले व बाकीची रक्कम २,२००

रुपये नक्त देण्याची हमी घेतली. इ. स. १८३० च्या अखेर गंगाधर-रावाकडे बळवंत मोरेश्वर यांचें ५८,८०० रु० येणें होतें. याच सुमारास गंगाधरराव याच्या सरंजमामाचे ४ पोटविभाग झाले. सदरहू विभाग होण्याच्या सुमारास बळवंतराव मोरेश्वर यांनीं कंपनी सरकारच्या अधिकाऱ्या-कडे तक्रार केली. ता० ३ मे १८२१ रोजीं कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं हुकूम केला कीं, बळवंतराव मोरेश्वर यांच्या स्वाधीन गांवगन्ना जमिनी व गांव अमलासुद्धां करावेत. ता० ४ जानेवारी १८२७ इ० रोजीं श्रीमंत बळ-वंतराव मोरेश्वर पटवर्धन यांचें नांव दक्षिणेंतील पटाच्या यादींत दुसऱ्या वर्गांत दाखल केलें. मुलगे वयांत येऊन कर्तेसवर्ते झाले. इतक्यांत बळवंत मोरे-श्वर यांच्या पत्नी काशीताई वारल्या. त्यामुळें मनास विरक्तता उत्पन्न होऊन हे काशीक्षेत्रीं मातोश्रीसह गेले व काशीस आपल्या खर्चाकरितां नेमणूक करून घेतली. बळवंतराव मोरेश्वर हे इतर पटवर्धन मंडळीप्रमाणेंच शूर, करारी व स्वाभिमानी होते. काशीक्षेत्रीं यांच्या मातोश्री वारल्या. नंतर यांनीं सन्यासा-श्रम स्वीकारला. इ० स० १८६० त हे काशीक्षेत्रीं समाधिस्थ झाले. बळ-वंतराव काशीक्षेत्रीं जाण्यापूर्वीं त्यांच्या व पोलिटिकल एजंटाच्या सल्ल्यानें सरंजाम गांवचे अधिकार त्यांचे पुत्र मोरेश्वर व गणपतराव हे चालवूं लागले. मोरेश्वरराव फार शांत व सुशील होते. ते बंधुवर्गाच्या संमतीनें सर्व कारभार पहात असत. मोरेश्वरराव यांना पुत्र संतान नसल्यामुळें त्यांनीं गोविंदराव ह्यांचे पुत्र केशवराव यांस दत्तक घेऊन त्यांचें नांव श्रीपतराव असें ठेविलें. मोरेश्वररावाच्या पत्नि लक्ष्मीबाई ह्यांनीं मिरज गांवांतील काशीविश्वेश्वराच्या देवालयाच्या आवारांत लोकोपयोगाकरितां पाण्याचे हौद बांधिले.

मोरेश्वरराव यांचे दत्तक चिरंजीव श्रीपतराव हे जुन्या खानदानी चालीचे बाणेदार, मानी व करारी होते. पूर्वीच्या वहिवाटीस अनुसरून व आपले बंधुवर्गाचे योग्य हक्क संभाळून ते त्यांशीं मिळून वागत असत. श्रीपत-

राव इ. स. १९१५ त मधुमेहाच्या आजारानें वारले. यांना नारायणराव उर्फ आबासाहेब नांवाचे पुत्र आहेत.

निळकंठराव यांचे चिरंजीव बळवंतराव उर्फ आण्णासाहेब ह्यांना वाडिलांप्रमाणें अश्वविद्या, गाणेंबजावणें वगैरेचा फार शोक होता. आजोबा-प्रमाणें ते घराण्याचे अभिमानी असून बंधुवर्गाशीं स्नेहानें वागत असत. यांनींहि आपल्या आजोबाप्रमाणें कागदपत्रांचा संग्रह व बहुतेक अलीकडील सर्व भाऊबंदांचे फोटो (त्यांत कांहीं बायकांचेसुद्धां) संग्रहास ठेविले आहेत. हे इ. स. १९१० त संधीवाताच्या विकारानें वारले. दुःखाची गोष्ट ही कीं, ७२ वर्षांच्या त्यांच्या मातोश्री त्यावेळीं हयात होत्या. आण्णासाहेबांचीं दोन लग्नें झालीं होतीं. पहिल्या कुटुंबास निळकंठराव उर्फ रावसाहेब व दुसऱ्या कुटुंबास गणपतराव व रामचंद्रराव असे दोन पुत्र मिळून तीन अपत्यें आहेत. निळकंठराव उर्फ रावसाहेब ह्यांनीं आपला अभ्यास पुणें व मुंबई येथील कॉलेजांत केला. त्यांना मुंबई विश्व-विद्यालयाची बी. ए. ही पदवी मिळाली आहे. यांना प्रवासाचा नाद असून वाचनाचा व्यासंग विशेष आहे. यांचा स्वभाव दिलदार असून ते घरा-ण्याचे अभिमानी आहेत. सातारचे प्रसिद्ध वकील श्रीयुत दादासाहेब करंदी-कर यांचे श्रीमंत रावसाहेब पटवर्धन हे जामात होत.

हरिभटबाबांचे दुसरे चिरंजीव बाळंभट आण्णा यांचे नातू श्रीपतराव ह्यांच्या घराण्याची हकीगत झाली. या घराण्याकडे हल्लीं जहागिरीचे (सरं-जामाचे) दिवाणी, फौजदारी, दारू, अबकारी, स्टॅांप वगैरे सर्व हक्कांसुद्धां दहा हजार रुपये व इनाम गांव, जमिनी बारा हजार रुपये मिळून बावीस हजार रुपये आहे.

सांगली संस्थान

मिरजकर व सांगलीकर हे हरभटबाबांचे तिसरे पुत्र गोविंद हरी यांचे वंशज होत. गोविंद हरीचा तिसरा मुलगा पांडुरंगराव ह्यास हैदरानें पकडून बंदींत टाकल्यावर इ. स. १७७८ त पेशव्यांनीं त्याची जहागिरी त्याचा मुलगा हरिहरराव याजकडे चालू ठेविली. हरिहरराव हा इ. स. १७८२ त मरण पावला. नंतर पांडुरंगरावाचा धाकटा मुलगा चिंतामणराव उर्फ आप्पासाहेब यांच्या नांवें जहागीर चालू झाली. चिंतामणराव आप्पासाहेब हे अज्ञान असल्यामुळें परशरामभाऊ पटवर्धन जहागिरीची व्यवस्था पहात असत. इ. स. १७७३ त चिंतामणराव जन्मले. इ. स. १७९५ त इतिहासप्रसिद्ध खर्ड्यांची लढाई पेशवे व निजाम यांच्यामध्यें झाली. इतर पटवर्धन सरदारांप्रमाणें चिंतामणराव आप्पासाहेब हे आपलें सैन्य घेऊन ह्या लढाईंत होते. निजामाच्या एका सुभेदारानें परशरामभाऊच्या खबाऱ्यावर व कपाळावर तरवारीचे वार करून त्यांस जखमी केलें. यावेळीं चिंतामणराव आप्पासाहेबांनीं धांवून जाऊन परशरामभाऊस लागेल ती मदत केली. निजामाबरोबर तह झाल्यानंतर पुढें बक्षिसें वांटलीं गेलीं. चिंतामणरावांना एक मौल्यवान् कंठा बक्षीस देण्यांत आला. इ.स. १७९९च्या आरंभीं कर्नाटक प्रांतात धोंड्या वाघानें दंगा माजविला. कर्नाटक प्रांताचा सर सुभेदार धोंडोपंत गोखले हा धोंडी वाघावर चालून गेला. धोंडी वाघानें त्यास दाद दिली नाहीं. तेव्हां पेशव्यांच्या हुकुमानें चिंतामणराव आप्पासाहेब आपलें सैन्य घेऊन सुभेदार धोंडोपंत गोखले ह्यांच्या मदतीस गेले. सर सुभेदार धोंडोपंत गोखले यांच्या सैन्याशिवाय पेशव्यांनीं आपल्या खाजगीपैकीं कांहीं सैन्य धोंडोपंत गोखले यांजकडे पाठविलें. धोंडोपंत गोखले व चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं कित्तुराजवळ दावणगिरी येथें धोंडीबा वाघास गांठलें. तेथें उभयतांची

भयंकर लढाई झाली. चिंतामणराव आप्पासाहेब धोंडी वाघाच्या सैन्याबरोबर मोठ्या शौर्यानें लढले; परंतु या लढाईंत गोखले व पटवर्धन यांस फारसें यश मिळालें नाहीं. धोंडीबा वाघानें पेशव्याच्या मुलखांत जास्तच दंगा सुरू केला. धोंडीबा वाघानें लुटालूट करणें, गांवचे गांव जाळणें असा क्रम चालविला. पुढें धोंडीबा वाघानें इंग्लिशांच्या मुलखांतहि लुटालूट व जाळपोळ चालविली. नंतर धोंडोपंत गोखले, इंग्लिश व पटवर्धन या त्रयीनें एक होऊन धोंडीबा वाघाशीं लढाई केली व त्याचा भयंकर पराभव करून त्यास पळावयास लाविलें. या लढाईंत पटवर्धनांनीं फार शौर्य दाखविल्यामुळें चिंतामणराव आप्पासाहेबांस बराच मुलूख पेशव्यानें बक्षीस दिला. स. १८०० त चिंतामणराव आप्पासाहेब व त्यांचे चुलते गंगाधर गोविंद यांच्यामध्यें तंटे सुरू झाले. हा अंतःकलह स. १८०८ पावेतों चालू होता. गंगाधर गोविंद व चिंतामणराव आप्पासाहेब यांना मुलूख वांटून दिला. आप्पासाहेबांनीं आपलें रहाण्याचें ठिकाण सांगली केलें. गंगाधर गोविंद मिरजेंत राहिले. मिरज व सांगली अशीं दोन निरनिराळीं संस्थानें झालीं. आप्पासाहेबांनीं सांगलींत किल्ला बांधिला व किल्ल्यांत रहाण्यास वाडा बांधिला आणि कृष्णाकांठीं श्रीगजाननमहाराजांचें देवालय बांधिलें. मिरज व सांगली यांचें उदाहरण पाहून जमखिंडी, कुरुंदवाड व खालसा झालेलीं तासगांव, चिंचणी, कागवाड वगैरे संस्थानांनीं आपापला सवता सुभा केला.

काय कारण असेल तें असो, पटवर्धन सरदार व दुसरा बाजीराव ह्यांच्यामध्यें सख्य असें कधींच नव्हतें. शिंदे व भोसले यांच्याविरुद्ध इंग्लिशांचें युद्ध चालूं होतें. या युद्धांत पटवर्धन सरदारांनीं तटस्थ वृत्ति धारण केली. यामुळें तर पेशव्यांची पटवर्धनावर फारच खप्पा मर्जी झाली. पेशव्यांनीं पटवर्धनाचा मुलूख जप्त करून तो बापू गोखल्यास सैन्याच्या खर्चाकरितां देण्याचा हुकूम केला. स. १८१२ सालीं इंग्रजांच्या मध्यस्तीमुळें पेशवे व पटवर्धन यांच्यामध्यें तह झाला. पुनः स. १८१७ त बाजी-

रावाचें पटवर्धनाशीं संशयीत धोरण दिसल्यावरून इंग्लिशांनीं पेशव्यांकडून पटवर्धनाचे हक्क पुनः कायम करून घेतले.

स. १८१८ त पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य झालें. कंपनी सरकारांनीं असें ठरविलें कीं, पेशव्यांच्याप्रमाणें जे आमची नौकरी करतील त्यांची जहागीर आम्ही पूर्ववत चालवूं. आप्पासाहेबांनीं आम्ही परधर्मियांची नौकरी करणार नाहीं म्हणून कंपनी सरकारांस कळविलें. पुढें कंपनी सरकार व सांगलीकर यांच्यामध्यें बरीच वाटाघाट होऊन अखेर असें ठरलें कीं, सांगलीकरांनीं १,३९,००० रुपयांचा मुलूख कंपनी सरकारास तोडून देऊन नोकरी न करण्याबद्दल ठराव करून घेतला. आप्पासाहेबांनीं कंपनी सरकारास स. १८३० त कित्तुरकर देसायाचें व स. १८४४ त कोल्हापूरकरांचें बंड मोडण्यास चांगली मदत केली. ठग लोकांचा नायनाट करण्यास त्यांनीं इंग्लिशांस मदत केली. याबद्दल कंपनी सरकारानें आप्पासाहेबांस यळवत्ती व होळलापूर हे दोन गांव इनाम करून दिले. शिवाय या कामगिरीबद्दल कोर्ट आफ् डायरेक्टर्सकडून आप्पासाहेबांस एक मौल्यवान् तरवार बक्षीस आली होती. त्या वेळच्या मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांनीं बेळगांवास दरबार भरवून ती तरवार त्यास नजर करण्यांत आली. त्या काळांत चाललेलीं बंडें मोडण्यांत यांनीं पुढाकार घेतला होता. ते उत्साही, मोकळ्या मनाचे व अत्यंत निःपक्षपाती असून क्षात्रवृत्तीच्या राजाच्या अंगीं लागणारे सर्व गुण त्यांजमध्यें वसत होते. प्रजेच्या कल्याणाविषयीं ते फार दक्ष असत. खाणी खोदण्याच्या धंद्याकडे त्यांचें विशेष लक्ष असे. कमलगड डोंगरांतील सोन्याच्या खाणी खणण्याला त्यांनीं बरेंच उत्तेजन दिलें. संस्थानांत त्यांनीं रेशमाचा धंदा सुरू करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. चिंतामणराव कलाकौशल्याचे व वाङ्मयाचे भोक्ते होते. त्यांच्याच आश्रयाखालीं प्रसिद्ध मूर्तिकर्मकार भिवा सुतार यानें सांगली येथील गणपतीची सुंदर संगमरवरी मूर्ति तयार केली. चिंतामणरावांनीं कुमारी नांवाचा कारागीर सांगलीस आणिला.

तो चांदीपितळेचीं भांडीं उत्तम करीत असे. चांदीपितळेच्या भांड्यांविषयीं सांगलीची फार प्रसिद्धि आहे. सर्व धर्मांच्या लोकांना त्यांनीं धर्मकार्यार्थ जमिनी दिल्या. एके सालीं हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत त्यांनी गरीब लोकांस धान्य, द्रव्य, वस्त्रप्रावरण देऊन हजारों लोकांचे प्राण वांचविले. हिंदुस्थान देश आपला आहे म्हणून त्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांस साह्य केलें, ह्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं; परंतु एकदां आयर्लंड देशांत दुष्काळ पडला असतां तेथेंसुद्धां द्रव्याची मदत केली. आप्पासाहेबांनीं दौलतीचा कारभार चांगल्या रीतीनें केला. सांगलीस बाजाराची नवी पेठ वसविली. कारागीर व गुणी लोक पदरीं ठेविले. यांनीं मोठमोठ्या विहिरी बांधविल्या. सांगलीस बागा व मळे केले. विशेषेंकरून नारळीचीं पुष्कळ झाडें लावविलीं. मिरज येथें मालगांव वेशीजवळ आप्पासाहेबांचा मोठा मळा असून या मळ्यांत बारा मोटांची एक विस्तीर्ण विहीर आहे. स. १८२६ सालीं त्यांचा मुलगा गणपतराव वारला. पुढें आप्पासाहेबांच्या सुनेनें स. १८३४ सालीं कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स यांच्या परवानगीनें मिरज किल्ल्यांतील बाळंभट या घराण्यापैकीं श्रीपतराव यास दत्तक घेऊन त्याचें नांव विनायकराव ठेविलें. पुढें स. १८३८ सालीं त्यांस पुत्र झाला. त्याचें नांव धुंडिराज तात्यासाहेब असें ठेवलें व दत्तकास २४०० रुपयांचें पेन्शन देऊन गप्प बसविलें. आप्पासाहेब १५ जुलै १८५१ सालीं कैलासवासी झाले.

आप्पासाहेब वारले त्यावेळीं धुंडीराज तात्यासाहेब तेरा वर्षांच्या वयाचे होते. संस्थानचा कारभार गोविंद हरि बिनिवाले चालवीत होते. श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब यांचा अभ्यास बेळगांव येथील हायस्कुलांत सरकारी देखरेखीखालीं चालू होता. शिवाय यांना घोड्यावर बसणें, बोथाटी, भाला, दांडपट्टा इ० खेळांचा फार शोक होता. स. १८५७ सालीं ते वयांत आले म्हणून त्यांस राज्याची पूर्ण मुखत्यारी दिली. त्याच

खालीं बंड उद्भवलें. तात्यासाहेबांनीं बंडाच्या वेळीं इंग्लिशांस चांगली मदत केली. सांगलींत ८ मैलांवरून नळानें पाणी आणिलें. दुष्काळांत दुष्काळी कामें काढून प्रजेचें रक्षण केलें व प्लेगाच्या वेळीं पुष्कळ द्रव्य खर्चून लोकांचे प्राण वांचविले. हे निःपक्षपातानें न्याय करीत असत. हे मोठे धाडशी होते. इचलकरंजीकरांचा एक हत्ती मोठा मस्त झाला होता. या हत्तीनें आपल्या महंतास ठार मारिलें. तात्यासाहेबांनीं त्या हत्तीस भाल्याच्या कैचींत इचलकरंजीहून सांगलीस आणिला. श्रीमंत तात्यासाहेबांस हत्तीचा फार शोक होता. यांच्या संग्रहास १४ हत्ती होते. त्यांत एक देखणा एकदंती हत्ती होता. त्यांची वागणूक, पेहराव, व दरबार जुन्या पद्धतीचा असे. हे मोठे धर्मनिष्ठ होते. ते श्रीगजानन महाराजांचा उत्सव मोठ्या समारंभानें करीत असत. श्रीमंत तात्यासाहेबांस ताराअक्का नामक एक कन्या व एक पुत्र होता. तो पुत्र अल्प वयांतच मृत्यु पावला. ताराअक्काची माहिती प्रसंगानुसार देऊं. श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब १९०१ च्या डिसेंबर महिन्याच्या १२ व्या तारखेस मृत्यु पावले. त्यावेळीं त्यांचें वय ६३ वर्षांचें होतें. यांनीं ४२ वर्षें राज्य केलें.

श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब यांच्या मरणानंतर कारभारी मंडळींनीं मिरज किल्ल्यांतील बाळंभट हरभट यांच्या वंशांतील चिंतामणराव ह्यांचे पुत्र विनायकराव यांस सांगलीच्या गादीवर बसविण्याकरितां निवड केली. कै० श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब यांचें कुटुंब बुद्धिबाईसाहेब यांच्या मांडीवर विनायक यास बसवून त्यांचें नांव श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब असें ठेवलें व ता० १५ जून १९०३ रोजीं मे० पोलिटिकल एजंटसाहेब यांनीं दरबार भरवून सरकारतर्फे त्यांस जहागिरीचीं वस्त्रें दिलीं. ह्या वेळीं श्रीमंत आप्पासाहेब यांचें वय तेरा वर्षांचें होतें.

ह्यास शिक्षण देण्याकरितां राजकोट येथील कॉलेजांत ठेवण्यांत आलें. इ. स. १९०१ दिसेंबरच्या ता. १२ ते इ. स. १९१० जून च्या २ तारखे-

पर्यंत सांगली संस्थान इंग्रज सरकारच्या अधिकारी वर्गाच्या ताब्यांत होतें. प्रथम रा. ब. अच्युत भास्कर देसाई हे संस्थानचे कारभारी झाले. यांनीं खाजगी व पागा या खात्यांचे खर्च कमी केले. नंतर १९०५ च्या फेब्रुअरी महिन्यांत कॅप्टन बर्क अॅडमिनिस्ट्रेटर नेमून आले. यांनीं सर्व खात्यांत सुधारणा केल्या. रयतेच्या गरजा संस्थानास कळण्याकरितां रयतसभा स्थापिली. सांगली ते मिरजपर्यंत रेलवे करविली व स्टेशनाजवळ श्रीमंतांच्या नांवाची नवी पेठ बसवून व्यापारास उत्तेजन दिलें. श्री० सौ० कां० तारा आक्कासाहेब यांचा विवाह पुण्यनगरींतील श्रीमंत सरदार खंडेराव चिंतामण उर्फ तात्यासाहेब मेहेंदळे यांचे पुत्र श्रीमंत बळवंतराव खंडेराव उर्फ रावसाहेब मेहेंदळे बार अॅट लॉ यांच्याशीं मोठ्या थाटानें करविला.* इ. स. १९०९ एप्रिल अखेर श्रीमंतांचें राजकोट येथील शिक्षण पुरें झाल्यावर श्रीमंतांनीं हिंदुस्थान, सीलोन, ब्रह्मदेश या देशांत फिरून बरीच माहिती मिळविली. नंतर कॅप्टन बर्क यांजबरोबर आपल्या सर्व संस्थानांत फिरून त्यांनीं संस्थानची माहिती करून घेतली. नंतर तारीख २ जून १९१० रोजीं मे. पोलिटिकल एजंट यांनीं सांगली येथें दरबार भरवून श्रीमंत आप्पासाहेब यांस सांगली संस्थानची पूर्ण मुखत्यारी दिली.

श्रीमंतांस संस्थानचा पूर्ण अधिकार मिळतांच त्यांनीं प्रत्येक खातीं निरनिराळीं केलीं. रेव्हिन्यु, पब्लिक वर्क्स, पोलीस, दिवाणी, विद्या, इत्यादि खातीं निरनिराळीं केलीं. प्रत्येक खात्यावर एक एक

---

* येथें एक खेदजनक हकीकत लिहिण्याचा प्रसंग आला आहे. सुमारें सात आठ वर्षें झालीं. श्री० सौ० ताराबाई आक्कासाहेब स्वर्गवासी झाल्या. श्रीमंत रावसाहेब मेहेंदळे यांचा द्वितीय विवाह मिरज किल्ल्यांतील श्रीमंत सरदार दाजीसाहेब पटवर्धन यांच्या भागिनीबरोबर झाला. श्रीमंत सौभाग्यवती पद्मावणीबाईसाहेब असें त्यांचें नांव आहे.



श्री. सरदार चिंतामणराव उर्फ आप्पासाहेब
पटवर्धन, सांगली.

बालोद्यान प्रेस, पुणें.

अनुभविक जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक केली. सर्व खात्यांवर श्रीमंत जातीनें देखरेख करतात, रयतेच्या तक्रारी शांतपणें ऐकून घेतात, रयतेच्या अर्जांची दाद घेतात व निःपक्षपातपणानें न्याय करितात. महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र येथील संस्थानिकांनी यांस आपल्यातर्फे गोलमेज परिषदेस प्रतिनिधि नेमलें आहे. गोलमेज परिषदेच्या कामाकरितां हे विलायतेस गेले होते. श्री० सौभाग्यवती राणीसाहेब ह्या चांगल्या सुशिक्षित आहेत. श्रीमंत विलायतेस गेल्यावर त्यांच्या गैरहजरींत यांनीं सांगली संस्थानच्या रीजंटचें काम केलें आहे. हल्लीं श्रीमंत गोलमेज परिषदेस गुंतल्यामुळें श्री० सौ० राणीसाहेबच रीजंटचें काम करीत आहेत.

सांगली संस्थानचें क्षेत्रफळ १,१३६ चौरस मैल आहे. लोकसंख्या सुमारें अडीच लक्ष आहे. वार्षिक उत्पन्न सुमारें बारा लक्ष रुपये आहे. इंग्रज सरकारास एक लक्ष पस्तीस हजार रुपये खंडणी द्यावी लागते. प्राथमिक व दुय्यम शाळांची संख्या सुमारें दोनशें आहे. संस्थानांत वीस वाचनालयें व ६ म्युनिसिपालिट्या आहेत. सांगलींत सोन्याचांदीचे दागिने सुंदर घडावाचे तयार होतात. सांगली येथें तांब्यापितळेचीं भांडीं फार नक्षीदार होतात. सांगलीचें तूप फार चांगलें असतें. पुण्यांत मंडई, शनिवार पेठ, बुधवार पेठ, सदाशिव पेठ येथील दुकानांच्यापुढें सांगलीचें तूप म्हणून जाहिराती लाविलेल्या असतात. शिरहट्टी व त्याच्या आजुबाजूच्या गांवांत देशी कांबळी तयार होतात. कवठेमहंकाळ येथें बुरणूस व गालिचे होतात. शहापूर तालुक्यांत मारिहल व बालेकुंद्री आणि शिरहट्टी तालुक्यांत बान्निकोप येथें कांचेच्या बांगड्यांचे लहान लहान कारखाने आहेत. खुद्द सांगली शहरांत वेलणकर यांची गजानन मिल असून तींत पातळें, चिटें, लुगडीं वगैरे फार चांगला माल तयार होतो.

कुरुंदवाडकर पटवर्धन.

म० भ० हरिभटबाबा यांचे तृतीय पुत्र त्रिंबकपंत आप्पा हे प्रथम अक्कलकोटकर भोंसले यांच्या पदरीं होते. पुढें इ. स. १७६६ त कापशीकर राणोजी घोरपडे यानें त्रिंबकपंत आप्पाकडून कर्ज घेतलें आणि कर्जाच्या फेडीस कुरुंदवाड गांव लावून दिला. तेव्हां कुरुंदवाड येथें त्रिंबकपंत राहूं लागले. तसेंच सन १७५० पर्यंत बाबाचे सर्व पुत्र कुरुंदवाड येथेंच रहात होते. इ. स. १७५० व १७५१ त कृष्णंभट बाप्पा हे मंगळवेढ्यास राहूं लागले. तसेंच इ. स. १७६२ त गोविंदपंत नाना हे मिरजेस राहूं लागले.

त्रिंबकपंत आप्पाचे दोन पुत्र–निळकंठराव व कान्हेरराव–हे दोघे बंधु मोठे पराक्रमी व धाडशी होते. निळकंठराव त्रिंबक हे हैदरावरील तिसऱ्या स्वारींत ठार झाले. (इ. स. १७७१ नंतर कान्हेरराव त्रिंबक हे सावशीच्या लढाईत ता० ९।१।१७७७ त ठार झाले.) निळकंठरावाचे पुत्र रघुनाथराव व शिवराव हे दोघेही पुष्कळ लढायांत होते. रघुनाथरावदादा हे परशरामभाऊबरोबर प्रत्येक स्वारींत हजर होते. यांना अनेक वेळां जखमा झाल्या होत्या. रघुनाथ निळकंठ उर्फ दादासाहेब यांनीं इ. स. १७९९ त कुरुंदवाड येथें विष्णुमंदीर बांधलें. कुरुंदवाडचा घाटहि यांनींच बांधिला. हीं दोन्ही कामें लाखों रुपये खर्चून केलीं असून तीं फार प्रेक्षणीय झालीं आहेत. शिवराव सुभेदार हेहि बहुतेक स्वारींत होतेच. पुढें रघुनाथरावाचे पुत्र त्रिंबकराव, कान्हेररावाचे पुत्र गणपतराव आणि शिवरावाचे पुत्र तीन. यांच्यांत निरनिराळे ठराव होऊन त्रिंबकराव रघुनाथराव कुरुंदवाडकर, गणपतराव कान्हेरराव कागवाडकर व शिवरावाच्या पुत्रास वाडीकर असें म्हणूं लागले. पुढें कुरुंदवाडकरांत थोरली पाती व धाकटी पाती असे दोन भाग झाले.

कुरुंदवाड घराण्याची माहिती
(थोरली पाती)

हरभटजीचे तिसरे पुत्र त्रिंबकराव यांचा वंश कुरुंदवाड घराणें होय. त्रिंबकरावास निळकंठराव व कान्हेरराव असे दोन पुत्र. पुढें वांटण्या होऊं लागल्या तेव्हां कुरुंदवाडचा सरंजाम निळकंठ रावजीचे पुत्र रघुनाथराव आणि कान्हेरावांचे पुत्र गणपतराव या उभयतांमध्यें सारखा वांटला गेला. रघुनाथराव ह्यांस कुरुंदवाडकर म्हणतात. रघुनाथरावास एक कनिष्ठ बंधु शिवराव होते. ते वाडीस रहात म्हणून त्यांस वाडीकर म्हणतात. गणपतराव कागवाडास राहूं लागले म्हणून त्यांस कागवाडकर म्हणूं लागले. कुरुंदवाडकरांकडे सरंजाम १,२७,९८९ रुपयांचा आहे. कागवाडकरांकडे सरंजाम १,००,६९१ रुपयांचा होता. नौकरीस्वारांची संख्या २८० होती. कुरुंदवाडकरांकडे तितकीच संख्या होती. पेशवाई बुडाल्यावर मिरजकराप्रमाणेंच कुरुंदवाडकरांशीं कंपनी सरकारचा स. १८१९त तह झाला. स. १८२१ सालीं कृष्णराव शिवराव वाडीकर, निळकंठरावाचे नातु, यांनीं आपणांस हिस्सा मिळावा म्हणून सरकारास थैली लिहिली; परंतु तपासांतीं असें कळलें कीं, केशवरावाचे वडील त्रिंबकराव यांशीं शिवरावाचे पुत्र कृष्णराव आणि निळकंठराव यांनीं करार करून खुषीनें नेमणुका तोडून घेतल्या आणि सरंजामावरील आपल्या हक्काची सोडचिठी दिली. या कारणासाठीं हिस्सा मिळणार नाहीं असा ठराव झाला. स. १८२७ सालीं केशवराव वारले. त्यास रघुनाथराव दादासाहेब, हरिहरराव भाऊसाहेब, विनायकराव आप्पासाहेब आणि त्रिंबकराव आबासाहेब असे चार पुत्र होते. हे अज्ञान होते. यांची मातोश्री श्री० लक्ष्मीबाईसाहेब हुषार, शहाणी व दक्ष होती. ती व दुसरे तीन असामी कारभारी यांनीं सरंजामाचा कारभार चालवावा, आणि पोलिटिकल एजंट यांनीं हिशेब तपासून साधारण देखरेख ठेवावी

असें ठरलें. ही व्यवस्था चांगली चालली; गोंधळ वगैरे झाला नाहीं. १८३७ सालीं रघुनाथराव वयांत आले. कुरुंदवाडचा सर्व सरंजाम त्यांच्या स्वाधीन करण्यांत आला. संस्थानाला कर्ज वगैरे नसून खजिन्यांत बरीच शिल्लक होती. या चांगल्या व्यवस्थेबद्दल रघुनाथरावाची मातोश्री लक्ष्मीबाई यांची सरकारानें फार स्तुति केली.

रघुनाथरावांनीं संस्थानची व्यवस्था चांगली ठेवली नाहीं. फाजील खर्च वाढविला. ते आईचें कांहीं ऐकेनात. सर्व शिल्लक उधळून कर्ज केलें. अशी ही अव्यवस्था कांहीं दिवस चालल्यावर आपणांस कारभार रेटत नाहीं असें पाहून त्यानें सर्व कारभार आपले बंधू हरिहरराव उर्फ भाऊसाहेब यांच्या स्वाधीन करून आपण स्वस्थ एकीकडे राहूं लागले. पुढें कांहीं काळानें हिस्से घेण्याचें भय दाखवून सर्व कारभार विनायकराव व त्रिंबकराव यांनीं बळकाविला. त्यांनीं सर्व अव्यवस्था नाहींशी केली व राज्याची सुधारणा केली. नंतर हिस्से घेण्याची आणखी भीति दाखवून विनायक-रावांच्या हातीं सर्व कारभार दिल्याचे व पुढें न जमल्यास हिस्से देण्याचे या उभयतांनीं भोळसर रघुनाथरावाकडून करार करून घेतले. ही व्यवस्था रघुनाथरावांचे ज्येष्ठ चिरंजीव केशवराव ह्यांस आवडली नाहीं; परंतु रघुनाथ-रावांच्या भोळसर व धरसोडीच्या स्वभावामुळें व आपल्या चुलत्याच्या धूर्ततेपुढें त्याचें कांहीं चालेना. तेव्हां त्यानें कंटाळून कुरुंदवाड सोडलें व इचलकरंजीस आपल्या मामाच्या येथें तो जाऊन राहिला. हा कलह पुढें जास्तच वाढत चालला. तेव्हां स. १८४९ सालीं हिस्से करण्याविषयीं पोलिटिकल एजंट यांनीं सरकारास विचारिलें. सरकाराकडून लिहून आलें कीं, हिस्से करण्याविषयीं अनुमोदन देतां येत नाहीं. राज्यकारभारांतून कनिष्ठ बंधूंचा हात काढावा. नंतर तिघा कनिष्ठ बंधूंनीं सरकारांत थैल्या पाठविल्या कीं, पेशवे सरकारच्या वेळेपासून हिस्से देण्याची वहिवाट असून त्या शिरस्त्याप्रमाणें इतर पटवर्धन घराण्यांत हिस्से झाले असतां आम्हांसच

हिस्से न मिळण्यास कांहीं कारण नाहीं. सरकारानें आम्हांस हिस्से द्यावे. तेव्हां पोलिटिकल एजंटास लिहून आलें कीं, हिस्सा घेण्याचा तिघा भावांचा फारच आग्रह असेल तर हिस्से करून द्यावे. परंतु हिस्से फार लहान होतील म्हणून हिस्सेदारास जमेदार समजले जाऊन सरंजामाच्या मुलखा-वरील सर्व दिवाणी, फौजदारी अंमल सरकारांत घ्यावा. यावर त्रिवर्गांनीं पुनः सरकारांत थैल्या पाठविल्या. अखेर स. १८५४ सालीं कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स यांनीं हिस्से करून देण्याचा ठराव केला. त्यांत वडील भावाकडे मोठा हिस्सा रहावा आणि त्यांजकडे सर्व नोकरीबद्दलचा ९,६१८ रुपये बारा आणे रुपयांचा मुलूख रहावा. फक्त वडील भावाकडे दिवाणी व फौजदारी वगैरे अधिकार रहावा आणि बाकी त्रिवर्गास जमेदाराप्रमाणें समजावें. याअन्वयें मेजर इनव्हेरारिटीसाहेबांनीं वडीलकीबद्दल वडील भावा-कडे १०,००० रुपयांचा मुलूख निराळा काढिला. ते साहेब जाऊन त्यांच्याजागीं बेलसाहेब पोलिटिकल एजंट आले. त्यांपुढें हें हिश्शाचें प्रकरण आलें. त्यांनीं वरील वांटण्या नापसंत करून कांहीं नवीन शिफारसी सरकारा-कडे केल्या. गेल्या दहा वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून हिस्से करावे. सर्व कर्ज वडील भावानें फेडावें. कारण कर्ज वडिलार्जित नाहीं. तिघा हिस्सेदारांच्या जहागिरीवरील दिवाणी–फौजदारी अधिकार तिघांपैकीं एकाच्या हातीं द्यावा आणि सर्व सरंजामाचे पांच विभाग करून त्यांपैकीं दोन विभाग वडील भावास द्यावे. बाकी तीन त्रिवर्गास द्यावे. ह्याप्रमाणें भाग होऊन हिस्से झाले ते असेः—त्रिवर्ग बंधूंनीं बिनायकरावास दिवाणी–फौजदारी अधिकार देण्याविषयीं नमूद केल्यावरून त्यांजकडे फौजदारी अधिकार मात्र दिला. दिवाणी अधिकार वडील भावाकडे राहिला. त्रिवर्ग बंधूंच्या हिश्शांवरील दिवाणी अधिकार बिनायकरावास द्यावा. त्रिवर्ग लहान भावांचीं नांवें पहिल्या प्रतीच्या सरदारांत घालावीं. वाडा वडील भावाच्या नांवाचा असला तरी धाकट्या त्रिवर्गास रहाण्यास जागा द्यावी.

स. १८५५ सालीं वांटण्या झाल्या. दादासाहेब स. १८७५ त निवर्तले. हे सशक्त होते. यांस शिकारीचा फार शोक होता. दौलतीच्या कारभारांत यांचें कुटुंब सीताबाईसाहेब मदत करीत. **यांचा जन्म १८१२ सालीं झाला.** यांचे वडील चिरंजीव हे हयात असतांनाच वारले. कनिष्ठ चिरंजीव चिंतामणराव उर्फ बाळासाहेब स. १८४९ त जन्मले. यांचा मराठी व इंग्रजी अभ्यास रघुनाथराव दादासाहेबांनीं खाजगी शिक्षक नेमून बराच करविला होता. पुढें त्यांस श्री. रघुनाथराव दादासाहेब यांनीं कोल्हापूर येथील हायस्कुलांत शिक्षणार्थ ठेविलें. पुढें त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यांचा मनोदय कॉलेजांत जाण्याचा फार होता; परंतु वडिलांच्या मृत्युमुळें व संस्थानचा अधिकार हातीं आल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला; परंतु त्यांना कॉलेजांत जाण्याची प्रबळ इच्छा असल्यामुळें संस्थानावर कारभारी नेमून ते डेक्कन कॉलेजांत अभ्यासास गेले. तेथें त्यांनीं लिट्लगोपर्यंत अभ्यास केला; परंतु राज्यकारभाराची कैची मागें असल्यामुळें त्यांचा मनोरथ जागच्याजागीं राहिला.

यांनीं आपल्या कारकिर्दींत संस्थानांत प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा फैलाव केला. कुरुंदवाड व तिकोटें येथें दवाखाने उघडले. इंग्रजी राज्याच्या धर्तीवर पोलीस, न्यायखातें व जमीनमहसूल या खात्यांची रचना केली. इंग्रजी कायद्यांत योग्य ते थोडेसे फेरफार करून ते कायदे आपल्या संस्थानास लागूं केले. आपल्या देशांत उद्योगधंदे वाढावेत याबद्दल त्यांना फार कळकळ असे. कुरुंदवाड येथें साखरेचा कारखाना काढण्याबद्दल त्यांनीं फार खटपट केली; परंतु अनेक अडचणींमुळें कारखाना निघाला नाहीं. श्रीमंत बाळासाहेबांनीं आपले दुसरे चिरंजीव मिरज मळा संस्थानांत दत्तक दिले. बाळासाहेब बुद्धीचे खोल, हुशार व मनमिळाऊ होते. यांचें दातृत्व वाखाणण्यासारखें होतें. बाळासाहेब प्रथम इ. स. १८९५ त व पुनः इ. स. १९०३ त असे दोन वेळां मुंबई कायदेमंडळाचे सभासद होते. श्रीमंत



श्री. सरदार भालचंद्रराव उर्फ आप्पासाहेब
पटवर्धन, कुरुंदवाड सीनिअर.

बालोद्यान प्रेस, पुणें.

बाळासाहेब सर्वांचे चहाते होते. यांना तालमीचा व्यासंग विशेष होता. ह्यांच्या शरिराचा बांधा ठेंगणा होता. शरीर पिळदार होतें. यांची रहाणी जुन्या पद्धतीची असून हे मोठे स्नानसंध्याशील होते. हे गणेशचतुर्थीचा वार्षिक उत्सव मोठ्या थाटाचा करीत. या उत्सवांत अन्नसंतपर्ण व विद्वान् ब्राह्मणांस देकार होत असे. बाळासाहेब ता० १६ फेब्रुवारी १९०८ त कैलासवासी झाले. यांना पुत्र दोन–वडील भालचंद्र उर्फ आण्णासाहेब व कनिष्ठ रघुनाथराव उर्फ बाबासाहेब. बाबासाहेब हे मिरज मळा संस्थानांत दत्तक गेले हें वर लिहिलेंच आहे.

आण्णासाहेब यांचा जन्म इ. स. १८७३ त झाला. यांचा इंग्रजी अभ्यास मिरज हायस्कुलांत झाला. यांचा कॉलेजचा अभ्यास अलहाबाद कॉलेजांत झाला. हे इ. स. १८९८ त ग्रॅज्युएट होऊन संस्कृतांत पहिले आल्याबद्दल यांना पदक मिळालें आहे. हे इ. स. १९०३ पासून वडिलांच्या हातांखालीं त्यांच्या हयातीपर्यंत कुरुंदवाडच्या राज्यकारभाराची माहिती घेत होते.

श्रीमंतांच्या हातीं राज्यकारभार येतांच कुरुंदवाड येथील कारभारी ऑफिस, अनगोळ येथील मामलेदार ऑफिस, कुरुंदवाड येथील घाट व इतर सरकारी इमारती ह्या अगदीं नादुरुस्त झाल्या होत्या, त्या सर्व दुरुस्त केल्या. रेकार्ड ऑफीस १८,००० रु. खर्च करून नवीन बांधलें. संस्थानांत परस्परसाह्यकारी पतपेढ्या अस्तित्वांत आणल्या. श्रीमंत आण्णासाहेब यांनीं आपल्या संस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत केलें. एक हजार वस्तीच्या गांवांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा, दोन हजार वस्तींच्या गांवीं मुलांची व मुलींची प्राथमिक शाळा व पांच हजार लोकवस्तीच्या गांवीं इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षणाच्या शाळा स्थापन केल्या. कुरुंदवाड येथें मराठी सात इयत्तांपर्यंत व इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत शिक्षण मिळतें. प्रत्येक

शाळेस स्वतंत्र इमारत करण्याचा यांनीं उपक्रम सुरू केला. उचगांव, ता. अनगोळ, येथें दवाखाना काढण्यांत आला. लोकलफंडाच्या वसुलांतून $\frac{1}{3}$ वसूल शिक्षण व आरोग्य या बाबींकडे खर्च करण्याची वहिवाट ठेविली. बाकीच्या $\frac{2}{3}$ वसुलाचा विनियोग होण्याकरितां लोकलबोर्ड अस्तित्वांत आणिलें. संस्थानच्या अधिकाऱ्याच्या जागीं संस्थानच्याच प्रजेपैकीं इसम शिकवून नेमणें या गोष्टीकडे श्रीमंतांचें फार लक्ष होतें. प्रत्येक गांवीं पिण्याकरितां व शेतकीकरितां लागणाऱ्या पाण्याची व संस्थानच्या हद्दींतील रस्त्याची व्यवस्था चांगली करण्याकडे श्रीमंतांनीं अतिशय लक्ष दिलें होतें. संस्थानांतील नौकरलोकांचे पगार अगदीं कमी होते ते त्यांनीं वाढविले. कुरुंदवाड गांवास महापुराच्या पाण्यापासून उपद्रव होत होता, तो होऊं नये म्हणून गांवच्या कांहीं भागाची लेव्हल वाढविली व नवीन वसाहत कराविली. सव्वादोन लक्ष रुपये खर्च करून कुरुंदवाड गांवांत लोकांस पिण्याकरितां नदीचें पाणी आणिलें. कुरुंदवाड गांवच्या आग्नेय दिशेस नवीन प्रकारचा कुस्तीचा आखाडा तयार केला असून त्या आखाड्यास त्यांनीं आपले चुलते कै० गणपतराव बापुसाहेब यांचें नांव दिलें व सार्वजनिक लायब्ररीकरितां ५,००० रुपयांची नवी इमारत बांधून दिली. १ फेब्रुवारी १९१६ रोजीं श्रीमंतांस अर्धांग वायुचा झटका झाला. त्यांतून ते ईशकृपेनें पार पडले. या प्रसंगाचें स्मरण रहावें म्हणून संस्थानच्या प्रजेनें वर्गणीनें नऊ हजार रुपये जमवून ही रक्कम श्रीमंतांना नजर केली. श्रीमंतांनीं आणखी त्यांत वीस हजार रुपये भर घालून कुरुंदवाडांत ' भालचंद्र मेमोरियल हॉल ' बांधला.

ग्रंथकारांस व विद्वानांस त्यांचा चांगला आश्रय असे. श्रीमंत भालचंद्रराव उर्फ आण्णासाहेब पटवर्धन हे इ. सन १९१२ ते १९१६ पर्यंत मुंबई सरकारच्या कायदे मंडळाचे सभासद होते.

श्रीमंत आण्णासाहेब हे इ. स. १९२८ त दुर्दैवानें मरण पावले. यांस श्रीमंत बाळासाहेब नांवाचे अल्पवयी पुत्र आहेत. ते सांप्रत कुरुंदवाड हाय-

स्कूलमध्यें शिक्षण घेत आहेत. इंग्रज सरकारानें राणीसाहेब यांस संस्थानचे रीजंट नेमून राज्यकारभार त्यांजकडे दिला आहे.

कुरुंदवाड संस्थानचें क्षेत्रफळ १८५ चौ. मै. असून एकंदर वसूल अडीच लाख रुपये आहे. इंग्रज सरकारास वार्षिक ९,६१२ रुपयांची खंडणी द्यावी लागते. संस्थानांत ३७ गांवें आहेत व हातमागाचे कारखाने मोठ्या प्रमाणावर चालतात.

धाकटी पाती

कुरुंदवाड संस्थानची वांटणी हरीहरराव भाऊसाहेब यांनीं भगीरथ प्रयत्न करून मिळविली. परंतु तिचा उपभोग घेण्यापूर्वींच हे इ. स. १८५१ त स्वर्गवासी झाले. नंतर त्यांच्या हिश्शाची मालकी त्यांचे चिरंजीव बापुसाहेब यांजकडे आली. देशी मालांस व कारागिरांस उत्तेजन द्यावें व देशी कला सुधाराव्या असे त्यांनीं प्रयत्न चालविले. ते स्वतः देशी कापड वापरूं लागले. कुरुंदवाडास पैठणी, चंदेरीसारखीं पागोटीं विणण्याचे माग ठेविले होते. तसेंच धोतरजोडे, लुगडीं, पंचेजोड्या वगैरे कापड विणण्याचे माग ठेविले होते. यांनीं संस्कृत भाषेचें अध्ययन केलें असून, त्यांचें संस्कृत ग्रंथांचें नित्य अवलोकन चालू होतें. यांनी संस्कृत ग्रंथांचा मोठा संग्रह केला, त्याचप्रमाणें उपलब्ध प्राकृत ग्रंथांचाहि केला आहे. यांना पाहिल्यापासून कविता करण्याचा फार नाद होता. यांची आर्या बहुतेक मोरोपंताच्याच तोडीची होती. त्यांच्या अंगीं प्रास, यमकें, अलंकार आणि कविविशिष्ट कल्पनाशक्ति व वर्णनशक्ति मुळापासूनच होती. त्यांनीं गंगा-वर्णन व गणेशपुराण हीं आर्याबद्ध केलीं. इंग्रजींतील शेक्सपियर व मिल्टन या महाकवींची गुरूद्वारें यांनीं चांगली माहिती करून घेतली होती. यांनीं शेक्सपियरकृत मॅकूबेथ नाटकाचें कवितावद्ध मराठी भाषांतर केलें असून तें द०

प्रा० कमिटीनें पसंत केलें. बापुसाहेब स्वभावानें मनमिळाऊ व बुद्धीनें खोल होते. त्यांनीं कुरुंदवाडास एक ज्योतिष शाळा स्थापन केली होती. पुढें रावबहादूर केरोपंत नाना छत्रे यांनीं ज्योतिष शिकविण्याचें अभिवचन दिल्यावरून ती शाळा मोठ्या आनंदानें पुण्यास ठेविली. पुणें-मुंबईकडे वारंवार जाऊन विद्वानांच्या गांठी घेऊन त्यांजबरोबर ते संभाषण करीत असत. यांना माधवराव भाऊसाहेब उर्फ गणेशदास द्या नांवाचे पुत्र होते. पुढें बापूसाहेब लौकर स्वर्गवासी झाले. नंतर कुरुंदवाड ज्युनियरचे अधिकार त्यांच्या पुत्राकडे आले.

आतां धाकट्या पातीचे दुसरे मूळ पुरुष विनायकराव आप्पासाहेब यांच्या वंशाची हकीकत सांगतों. यांचा जन्म इ. स. १८२२ सालीं झाला. यांना दौलतीची वांटणी व दिवाणी फौजदारी अधिकार मिळाले ते यांच्या हुशारीनें व कर्तृत्वानें मिळाले. सर्व सरदार व राजेरजवाडे लोकांत यांचें मोठें वजन व प्रतिष्ठा असून इकडील सरदारांत ते प्रमुख असत. सरदारलोकांप्रमाणें साहेबलोकांतहि त्यांचें वजन असे. जेव्हां कुरुंदवाड दौलतीच्या वांटण्या झाल्या, तेव्हां वडील भावाखेरीज बाकीच्यांस फारच लहान हिस्से म्ह० २०।२५ हजारांचे येऊं लागले. म्हणून त्रिवर्ग बंधूंनीं एकत्र रहाण्याचें करून आपला बोज जाऊं दिला नाहीं, हें केवळ यांच्या कर्तृत्वाचें फळ होय. त्र्यंबकराव आबासाहेब हे वडील बंधूंच्या विचारें वागत असत. यांनीं आपला हिस्सा दोघा बंधूंस द्यावा असा मृत्युलेख करून ठेवला होता. त्र्यंबकराव आबासाहेब इ. स. १८६८ सालीं वारले. तेव्हां त्यांनीं करून ठेवलेल्या लेखान्वयें व त्रिवर्गबंधूंचा एकोपा मनास आणून सरकारांनीं त्यांचा हिस्सा दोघा बंधूंस दिला. विनायकराव आप्पासाहेब यांची हुषारी पाहून इ. स. १८६८ सालीं मुंबई सरकारानें यांस आपले कायदे मंडळाचे सभासद नेमिलें. यांस कुस्त्या करविण्याचा फार शोक होता. म्हणून त्यांनीं आपल्याजवळ चांगले मल्ल बाळगिले होते. यांस अर्धांगवायूचा झटका येऊन

त्यांतच ते इ. स. १८७६ त वारले. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र दाजीसाहेब यांजकडे सरकारानें त्यांचा हिस्सा स्वाधीन केला. दाजीसाहेब यांचा प्रपंच फार मोठा होता. त्यांची वागणूक व्यवस्थेशीर होती. यांनीं संस्थानचें काम उत्तम प्रकारें चालविलें होतें. हे इ. स. १९११ च्या ऑगस्ट महिन्याच्या २८ तारखेस स्वर्गवासी झाले. यांना पांच पुत्र आहेत. वडील पुत्र विनायकराव उर्फ नानासाहेब हे संस्थानचे मालक झाले. यांनीं संस्थानची व्यवस्था फार उत्तम ठेविली. यांनीं आपल्या बंधूंची व्यवस्था अगदीं आपल्याप्रमाणें ठेविली. यांचें शिक्षण मिरज हायस्कुलांत मॅट्रिकपर्यंत झालें. यांना घोड्याचा फार शोक आहे. हे दररोज दोन तास पागेंत घालवितात. कुरुंदवाड येथें उत्तम घोडे असतात असा त्यांचा लौकिक आहे.

बुदगांवकर पटवर्धन.

श्री० गणपतराव नारायण मिरजकर यांच्या वेळीं गोपाळ गंगाधर यांनीं आपणास हिस्सा मिळण्याकरितां सरकारांत थैली लिहिली. इ० स० १८२१ मे च्या तिसऱ्या तारखेस ठराव होऊन मे० चापलीनसाहेब बहादूर यांनीं किल्ला व त्याखालचा ६५ हजारांचा सरंजाम वेगळा काढून बाकी राहिलेल्या दौलतीचे चार हिस्से केले ते येणेंप्रमाणें—पहिला हिस्सा गणपतराव नारायण; दुसरा हिस्सा कृष्णराव गोविंद; तिसरा हिस्सा माधवराव गंगाधर व चौथा हिस्सा गोपाळ गंगाधर.

मळेकर पटवर्धन

(कनिष्ठ शाखा)

श्री० माधवराव गंगाधर मिरजेनजिक मळ्यांत जाऊन राहिल्यामुळें यांना मळेकर पटवर्धन असें नांव मिळालें. आपल्या संस्थानचा राज्यकारभार चालवून शिवाय ते मिरज संस्थानचा राज्यकारभार पहात असत. यांनीं

मिरज संस्थानचें दप्तर शिस्तवार लावून ठेवलें. माधवराव गंगाधर यांचा हिस्सा इ. स. १८३३ सालीं कांहीं कारणावरून जप्त करण्यांत आला होता. पुढें तो हिस्सा त्यांचे पुत्र लक्ष्मणराव उर्फ आण्णासाहेब ह्यांस इ० सन १८४८ त देण्यांत आला. इ. स. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं ह्यांनीं इंग्रज सरकारास चांगली मदत केली होती. त्याबद्दल इंग्रज सरकारानें त्यांचे आभार मानले आहेत. हे इ. स. १८६० त मरण पावले. श्री. लक्ष्मणराव उर्फ आण्णासाहेबानंतर त्यांचे पुत्र हरिहरराव हे गादीवर आले. परंतु हेहि इ० स० १८७७ त मरण पावले. नंतर त्यांचे पुत्र लक्ष्मणराव हे गादीवर आले. लक्ष्मणराव आण्णासाहेब अज्ञान असल्यामुळें मिरजमळा संस्थानचा राज्यकारभार इंग्रज सरकारच्या देखरेखीखालीं चालला. परंतु हे अल्प वयांतच निर्वतले. नंतर बाळासाहेब कुरुंदवाडकर ह्यांचे द्वितीय चिरंजीव रघुनाथराव ह्यांस मिरज मळा संस्थानास दत्तक देऊन व त्यांचें नांव माधवराव ठेवून त्यांस ता० २५ डिसेंबर १८९९ त गादीवर बसविलें. श्रीमंत माधवराव उर्फ बाबासाहेब यांचें शिक्षण राजकोट येथील राजकुमार कॉलेजांत झालें. नंतर बाबासाहेब हे वयांत आल्यानंतर ता० १७ मार्च १९०९ त त्यांना मिरज मळा संस्थानचा पूर्ण अधिकार मिळाला. यांनीं संस्थानचा राज्यकारभार फारच उत्तम प्रकारें चालविला आहे. यांनीं आपलें रहाण्याचें ठिकाण बुदगांव करून तेथील वाड्याची उत्तम दुरुस्ती करून शोभा आणिली आहे व बुदगांवांत निरनिराळ्या शोभिवंत इमारती बांधविल्या आहेत. श्रीमंतांनीं मिरजमळा संस्थानचें दप्तर सालवार लावून ठेवलें आहे. पूर्व वयांत श्रीमंतांना तालमीचा फार शोक होता. हे घोड्यावर बसण्यांत तर फारच पटाईत आहेत. हे टेनीस व क्रिकेट हे खेळ चांगले खेळतात. यांना वाचनाचा फार नाद आहे. हे स्वभावानें शांत, मनमिळाऊ व विनोदी आहेत.

मिरजमळा संस्थानचें क्षेत्रफळ १९६ चौरस मैल आहे. एकंदर उत्पन्न ३,२७,४०३ रुपये आहे. इंग्रज सरकारास ७,३८९ रुपये खंडणी

द्यावी लागते. या संस्थानचीं ४० गांवें असून तीं धारवाड, सातारा, सोलापूर व पुणें जिल्ह्यांत पसरलेलीं आहेत. या संस्थानचे कवठे, कुरोली व गुडगेरी असे तीन तालुके आहेत. बुदगांव व गुडगेरी येथें पुष्कळ हातमाग असून कापड तयार होतें.

संस्थानचा सर्व राज्यकारभार राजधानी बुदगांव येथें चालतो. मिरजेपासून बुदगांव पांच मैल आहे. खुद्द राजधानीच्या गांवीं व संस्थानच्या इतर गांवीं श्रीमंतांनीं शिक्षणाची व्यवस्था फार चांगली ठेवली आहे.

मिरजमळा संस्थानांत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असून तीन अँग्लो-व्हर्न्याक्युलर शाळा आहेत. त्यांत १८७५ मुलें व २३० मुली शिक्षण घेत आहेत. निव्वळ प्राथमिक शिक्षणावर १४,००० रुपये खर्च झाला. अँग्लो-व्हर्न्याक्युलर शाळांत १०७ मुलें शिक्षण घेत असून त्याप्रीत्यर्थ १३,५३१ रुपये खर्च झाला. बुदगांव येथें एक विणण्याची गिरणी चालू आहे.

या संस्थानास न्याय करण्याचे, कायदे करण्याचे व राज्यकारभार चालविण्याचे पूर्ण स्वतंत्र अधिकार आहेत.

चिंचणीकर पटवर्धन.

परशरामभाऊसाहेब यांच्या पांच पुत्रांपैकीं माधवराव परशराम यांनीं हिस्सा घेतला नाहीं. परंतु त्यांचे पुत्र गोविंदराव पटवर्धन यांनीं हिश्शाची मागणी केली. त्यांचा हिस्सा त्यांस मिळाला. त्यांनीं आपलें राहण्याचें ठिकाण चिंचणी येथें केलें. म्हणून त्यांस चिंचणीकर पटवर्धन म्हणूं लागले. गोविंदरावास मुलगा नव्हता. म्हणून त्यांनीं शिळकर पटवर्धन घराण्यापैकीं एक मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव माधवराव उर्फ दाजीसाहेब असें ठेविलें. सरकारानें दत्तक पुत्राकडे जहागीर न चालवितां ती इ. स. १८३६ त

खालसा केली. दाजीसाहेबाकडे फक्त रयताबा जमिनी व इनाम जमिनी राहिल्या. दाजीसाहेबांस पांच पुत्र झाले. खर्च वाढला. शेते, मळे वगैरे सर्व गहाण पडले. सावकारांचा तगादा बसला. या राजघराण्याची ही दैन्यावस्था पाहून श्रीमंत आप्पासाहेब जमखिंडीकर यांस फार वाईट वाटलें. त्यांनीं आपला एक कारकून चिंचणीस पाठवून एकंदर देण्याचा हिशोब आणविला. सावकार लोकांचें देणें २७,००० रुपये निघालें. १३,५०० रुपयांस रयताबा जमिनी दाजीसाहेबाकडून खरेदी देववून व १३,५०० रुपयांस इनाम जमिनी व वाडा गहाण लावून घेऊन सावकाराचें सर्व देणें दिलें. सावकारी कर्जाखेरीज दुसऱ्या लोकांचें २,००० रु. देणें होतें ती रकम दाजीसाहेबांच्या नांवें बक्षिसांत टाकून त्यांना लोकांचें देणें चुकतें केलें व दाजीसाहेब यांस कुटुंबासह जमखिंडीस आणवून नजीक असलेल्या आलपूर गांवीं रहाण्यास वाडा व सालीना १,२०० रुपयांची नेमणूक करून दिली. ते दाजीसाहेबांच्या मुलांबाळांच्या कार्यांस वेळोवेळीं मदत करीतच असत. इ० स० १८६९ त दाजीसाहेब आलपूर येथेंच वारले. त्यावेळीं श्री० आप्पासाहेब यांनीं खर्चास देऊन पुढील विधि करविला व मुलांस व कुटुंबास नेमणुका करून दिल्या. आप्पासाहेबांनीं दाजीसाहेबांच्या अंतकाळीं इनाम जमिनी व वाडा गहाण लावून घेतला होता तो दस्तऐवज फाडून त्यांच्या स्वाधीन केला.

तासगांवकर पटवर्धन.

परशरामभाऊचे वडील पुत्र रामचंद्रराव आप्पासाहेब यांनीं त्यांचे धाकटे बंधु गणपतराव यांच्या नांवें तासगांव जहागीर करून दिली. इ. स. १८६३ त ही जहागीर सरकारानें खालसा केली. श्रीमंत रमाबाईसाहेब यांचे पुत्र गणपतराव हे इ. स. १८९६ त वारले. यांना दोन पुत्र झाले



श्री. सरदार माधवरावसाहेब पटवर्धन
मिरज, ज्युनिअर.

बालोद्यान प्रेस, पुण.

होते. वडील परशरामराव हे वयाच्या तिसऱ्या वर्षी वारले. दुसरे पुत्र विनायकराव बाबासाहेब यांस त्यांच्या मातोश्री सिद्धीबाईसाहेब यांनीं लहानाचें थोर करून सुशिक्षित केलें आहे. श्रीमंत बाबासाहेबांनीं अत्यंत परिश्रम करून स्वतःच्या हक्काच्या उत्पन्नाची बाब वाढवून इनाम गांवें व इनाम जमिनी सोडविल्या. यांनीं आपलें उपाध्येपणाचें उत्पन्न आपल्या यजमानावर काम चालवून अदमासें ९० वर्षांचें वसूल केलें. यांना एक पुत्र आहे. त्याचें नांव परशराम भाऊसाहेब.

शेडसाळकर घराणें.

हरिभटबाबाचे सातवे पुत्र भास्करपंत. भास्करपंतास चार पुत्र होते. हे सर्वच पराक्रमी होते. त्यांचीं नांवें धोंडोबा, विनोबा, हरबा व रामचंद्र. धोंडो भास्कराच्या वंशजांपैकीं कोणी राहिलें नाहीं. विनोबा भास्करच्या वंशापैकीं, भालचंद्र चिंतामण ह्यांनीं मुंबई विश्वविद्यालयाची पदवी मिळविली आहे. केशवराव गोविंद हे सांगली संस्थानांत दोदवाडच्या वहिवाटदारच्या जागेवर होते. माधवराव हरिहर हे मिरज संस्थानचे पेनशनर मामलेदार असून ते आपल्या घरीं मिरज येथें राहतात. बळवंतराव आबाजी हे बडोदें संस्थानांत मोठ्या हुद्यावर होते. हल्लीं त्यांनीं पेनशन घेतलें असून बडोदें येथेंच ते रहातात. पुरुषोत्तम नारायण हे सांगली येथें रहातात. हरबाआण्णांच्या वंशजांपैकीं गंगाधरराव शिवराव, हरीपंत गंगाधर व भास्करराव गंगाधर हे हरबाआण्णांनीं बांधिलेल्या वाड्यांत मिरज येथें रहतात. भास्करराव हरिहर व निळकंठराव हरिहर हेहि मिरज येथेंच आहेत. वासुदेव भास्कर यांच्या वंशापैकीं विनायक निळकंठ हे नोकरीवर आहेत. धोंडो निळकंठ हे गणेश-

वाडी येथें शेती करून असतात. हरिहर धोंडो, मोरेश्वर धोंडो, व वासुदेव धोंडो हे नोकरी व शेती करतात. रामचंद्र भास्कर यांच्या वंशापैकीं गोविंदराव गोपाळ हे मिरज येथें वकिली करीत आहेत. वासुदेवराव गोपाळ हे बी. ए. एल् एल् बी. असून नाशिक येथें वकिली करीत आहेत. हरिपंत गोपाळ हे इंजिनियर खात्यांत हुद्याचे जागेवर आहेत.

वाडीकर पटवर्धन.

त्रिंबक हरीचे नातू शिवराव निळकंठ हे वाडीस रहात, म्हणून त्यांस वाडीकर म्हणतात. पुत्र तीन-कृष्णराव, निळकंठराव व कोन्हेरराव. धारवाडचे कलेक्टर यांनीं शिवरावाच्या जहागिरीच्या तीन वांटण्या सारख्या करून तिघा मुलांस दिल्या. १८३७ त निळकंठराव निपुत्रिक वारले, तेव्हां सरकारानें त्यांचा २,१७८ रुपयांचा हिस्सा खालसा केला व त्यांच्या बायकोस कांहीं नेमणूक करून दिली. पुढें स. १८४० त कृष्णराव वारले. त्यांची नेमणूक त्यांचे पुत्र चिंतामणराव ह्यांजकडे चालू झाली. तेहि स. १८४८ त वारले. तेव्हां त्यांची नेमणूक खालसा झाली. त्यांच्या दोघी बायकांकडे इनाम गांवें चालविलीं व तिसरे पुत्र कोन्हेरराव ह्यांजकडे कायम राहिलीं. हे नेहमीं मिरजेंतच रहात असत. स. १८८२ त कोन्हेरराव स्वर्गवासी झाले. यांना गणतराव, निळकंठराव व विनायकराव असे तीन पुत्र होते. गणपतराव दत्तक गेले. स. १८८४त निळकंठराव वारले. त्यांचे पुत्र गंगाधरराव नानासाहेब हे संस्थानचे अधिकारी झाले. हे स. १९१४ त निर्वतले. यांना गणपतराव नांवाचा एक अज्ञान पुत्र आहे. संस्थान मे. पोलिटिकल एजंटसाहेब ह्यांच्या देखरेखीखालीं चालू आहे. श्रीमंत गणपतराव दाजीसाहेब यांचा विद्याभ्यास चालू आहे. ह्या वाडीसंस्थानचें उत्पन्न अगदींच कमी आहे. संस्थानिक मिरजेंतच आपल्या वडिलार्जित वाड्यांत रहातात. वाडीकर ह्यांना दिवाणी-फौजदारीचा अधिकार आहे.

श्रीमंत विनायकराव कोन्हेरराव उर्फ बाबासाहेब यांचा जन्म इ. स. १८५८ त झाला. स. १८८६ त कर्नल जे. डब्ल्यू. वाटसन पो. ए. यांनीं बाबासाहेबांस काठेवाडांत वाकानेर संस्थानांत ट्रेझरी ऑफिसर नेमिलें. नंतर स. १८९७ त पुणें येथें ते रहावयास आले. त्यांनीं पुणें येथें माजिस्ट्रेट व स्पेशल माजिस्ट्रेट इ. कामें केलीं आहेत.